पत्रक नं. १

# करन्सी कमिशनच्या शिफारसी

लेखक

प्रो. वामन गोविंद काळे, एम्. ए.

अनंत सखाराम गोखले, 'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें यांनीं छापिलें
तें दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम्. ए. सेक्रेटरी, इंडियन करन्सी
लीग–महाराष्ट्र शाखा, यांनीं पुणें, पेठ नारायण,
गायकवाडवाडा येथें प्रसिद्ध केलें.

## आभार

प्रस्तुत लेख 'रत्नाकर' मासिकाच्या सप्टेंबर १९२६ च्या अंकांत प्रसिद्ध झाला होता. तो स्वतंत्रपणें प्रसिद्ध करण्याची आम्हांस परवानगी दिल्याबद्दल आम्ही मासिकाचे चालक रा० अ. स. गोखले यांचे अत्यंत ऋणी आहोंत.

# करन्सी कमिशनच्या शिफारसी

# करन्सी कमिशनच्या शिफारसी

हिंदुस्थानांत कोणत्या प्रकारची चलनपद्धति असावी आणि तिची व्यवस्था कशी चालवावी ह्यासंबंधानें गेल्या चाळीस पन्नास वर्षें वाद माजून राहिला असून हिल्टन यंग कमिशनचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यानेंही सदरहू वादाचा निकाल लागलेला नाहीं. चलनपद्धतीचा प्रश्न इतका गुंतागुंतीचा आणि अवघड आहे कीं, त्या बाबतींत मतांची एकवाक्यता होणें जवळजवळ अशक्य असतें. त्यांत हिंदुस्थानांतील मतभेदाचा हा विशेष आहे कीं, वाद केवळ तज्ज्ञ आणि निरनिराळ्या हितसंबंधांचे पुरस्कर्ते ह्यांचे दरम्यान नसून तो मुख्यत्वेंकरून सरकार आणि प्रजा ह्यांच्या दृष्टींमधील भिन्नतेपासून उत्पन्न झाला आहे. ह्या कारणानें कमिशनच्या शिफारशींचा विचार करतांना चलनपद्धतीच्या मुळाशीं असलेल्या आद्य तत्त्वांकडे आणि त्याचप्रमाणें हिंदी चलनव्यवस्थेच्या पूर्वेतिहासाकडे लक्ष देणें आवश्यक आहे. महायुद्धाच्या पूर्वीच्या काळांत जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं चलनांचा प्रश्न आपल्यापुरता तरी निदान जवळजवळ सोडविल्यासारखा होता. परंतु महायुद्धाच्या घडामोडींमुळें त्यांच्यामध्येंही चलनपद्धतीची घडी विस्काळित झाली असून ती पुन्हा नीट बसवितांना महत्त्वाचे फेरफार करणें अपरिहार्य झालें आहे. पुढारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांची अशी अवस्था झाली असतां हिंदुस्थाननें त्यांचें पूर्वीचें ध्येय आपल्या डोळ्यांसमोर ठेवून आचरण करणें किती श्रेयस्कर आहे ह्याविषयीं संशय उत्पन्न झाला आहे आणि त्यांची सध्यांची परिस्थिति व तीमधून बाहेर निघण्याचा त्यांनीं अंगिकारलेला मार्ग ह्यांपासून आम्हीं बोध घेणें जरूर आहे अशी समजूत प्रादुर्भूत झाली आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांची आर्थिक अवस्था आणि तिच्या योगानें नवीन विचारांस मिळालेलें चालन ह्यांमुळें हिंदी चलनपद्धतीच्या चर्चेमधील घोंटाळ्यांत भर पडल्यासारखी झाली आहे.

लोकव्यवहाराच्या सोईसाठीं सोनें आणि चांदी या मूल्यवान् धातूंचीं ठराविक वजनाचीं, किंमतीचीं आणि स्वरूपाचीं नाणीं टांकसाळींतून पाडून देणें हा राजसत्तेचा अधिकार आणि कर्तव्य आहे अशी प्राचीन काळापासून आजतागाईत सार्वत्रिक समजूत आहे. धातूंचीं नाणीं आणि त्यांमध्यें ज्यांचें परिवर्तन खात्रीनें होईल असे रोखे व कागद हीं देवघेवीचीं तशींच पदार्थांच्या मूल्यमापनाचींही साधनें आहेत. चलन हें एक प्रकारचें माप असल्याकारणानें तें सोन्याचांदीचें केल्यानें थोडीफार अडचण उत्पन्न होण्याचा संभव असतो. शेर, फूट किंवा तोळा असलीं वजनेंमापें कोणत्याही पदार्थांचीं बनविलीं तरी बिघडत नाहीं. फूट लोखंडी असला काय किंवा

लांकडी असला काय सारखेच; त्यांच्या कार्यक्षमतेंत फेर पडत नाहीं. धातूंच्या नाण्यांचें मात्र असें नाहीं. तीं इतर पदार्थांचें मूल्य दर्शविण्याचें काम करीत असतां म्हणजे दुसऱ्या जिनसांच्या मूल्याची नाण्याच्या मूल्याशीं तुलना होत असतां खुद्द त्या नाण्याचें मूल्य कमीजास्त होण्याचा संभव असतो. सोनें आणि चांदी या धातूंचा दागिने, भांडीं वगैरे जिन्नस करण्याकडे उपयोग होत असल्यानें त्यांचा पुरवठा आणि त्यास मागणी असेल त्या मानानें त्यांच्या मूल्यांत चढउतार होत असतो आणि त्या फरकाचा परिणाम त्यांपासून बनविलेल्या नाण्यांच्या मूल्यांत होणें अपरिहार्य आहे. तथापि नाण्यांचा पुरवठा लोकांच्या गरजेप्रमाणें बिनहरकत कमीजास्त होऊं दिला असतां वरील अडचण सहज नाहींशी करतां येते. लोकांनीं ठराविक वजनाचें सोनें किंवा चांदी दिली असतां सरकारनें आपल्या टांकसाळींतून त्या धातूंचीं ठराविक नाणीं बिनतक्रार पाडून देणें आणि बाजारांत सदरहू धातूंस ज्यास्त भाव आला असतां नाणीं वितळण्याचा हक्क पूर्णत्वानें लोकांस असणें या दोन प्रकारच्या योजनेनें नाण्यांचें मोल कायम राखतां येतें. रुपया, शिलिंग, एक आणा हीं नाणीं जरूरीप्रमाणें मर्यादित प्रमाणांत पाडण्याचा हक्क सरकारनें सर्वस्वी स्वतःकडे ठेवल्यामुळें असल्या दुय्यम नाण्यांतील धातूंची बाजारी किंमत कितीही थोडी असली तरी त्यांचें दर्शनी म्हणजे कायद्यानें ठरलेलें मूल्य कमीजास्त होऊंच शकत नाहीं.

चलनपद्धतीच्या इतिहासांत फार खोल न जातां येथें इतकें सांगितलें कीं पुरें आहे कीं, गेल्या शतकाच्या चतुर्थपादांत बहुतेक सर्व पाश्चात्त्य राष्ट्रांनीं सोन्यास अग्रपूजेचा मान देऊन मूल्यमापनाच्या सिंहासनावर त्याची स्थापना केली आणि चांदीला तांबें, ब्रॉंझ् वगैरे दुय्यम प्रतीच्या धातूंच्या परिचारक वर्गांत ढकलून दिलें. हिंदुस्थानांत मात्र ( चीन देशांत अजूनही चांदीचें साम्राज्य कायम आहे ) ईस्ट इंडिया कंपनीनें सुवर्णचलनास अर्धचंद्र देऊन चांदीला मूल्यमापनाच्या प्रतिष्ठेच्या कामगिरीवर कायम केलें. ही स्थिति येथें १८९३ सालापर्यंत अव्याहत रीतीनें चालली. सुवर्णमूल्यमापनपद्धति इतरत्र चोहींकडे अमलांत होती आणि ती व्यक्तिशः राष्ट्रास सोयीची वाटली; इतकेंच नव्हे तर राष्ट्राराष्ट्रांमधील घडणाऱ्या देवघेवींतही श्रेयस्कर ठरली. इंग्लंडचें प्रमुख नाणें सॉव्हरिन्, फ्रान्सचें फ्रँक्, अमेरिकन संयुक्त संस्थानांचें डॉलर व जर्मनीचें मार्क, ह्यांचीं वजनें आणि किंमती भिन्न होत्या तरी त्यांमधील सुवर्णाचा ऐवज निश्चित असल्याकारणानें त्यांचें मोलाचें परस्पर प्रमाणही निश्चित व सर्वश्रुत होतें. ह्यामुळें एका राष्ट्रास दुसऱ्याचें देणें द्यावयाचें असल्यास किंवा पेढीवाले आणि व्यापारी त्यांस कर्जफेडी करावयाच्या असल्यास वाहतुकीचा व व्याजाचा तेवढा खर्च सोसून सोनें पाठवून त्या सहज करतां येत. ह्याचाच अर्थ असा कीं, हुंडणावळीचा दर राष्ट्राराष्ट्रांत स्थिर राहून व्यापार, उद्योगधंदे सुरळीत चालण्यास सुवर्णचलनपद्धतीनें साहाय्य होत असे.

पाश्चात्य देशांत सुवर्णमूल्यमापनपद्धति यशस्वी रीतीनें चालू असतांना हिंदुस्थानांतील रौप्यैकचलनपद्धति मात्र ठेंचा खात खडत होती. येथेंही सुवर्णचलनपद्धति सुरू करण्यांत यावी अशी लोकांनीं कित्येक वर्षें केलेली मागणी फेंटाळण्यांत आली होती. परंतु युरोपांत चांदीचे पदरीं दुय्यमपणा बांधण्यांत आल्याकारणानें तिला तिकडे मान्यता उरली नाहीं आणि अर्थातच ती स्वस्त झाली. हिंदुस्थानचें निर्गतमालाचे बाबतींतलें देणें व्यापारी लोक चांदी इकडे आणून तिचे सरकारी टांकसाळींत रुपये पाडवून घेऊन देऊं लागले. ह्याचा परिणाम असा झाला कीं, चांदीचे रुपये आणि परराष्ट्रांतील सोन्याचीं नाणीं ह्यांचा परस्पर मूल्यसंबंध सारखा बदलत जाऊन हुंडणावळीचा भाव हळुहळू उतरत चालला. एका काळीं प्रचलित असलेलें १ रुपया= २४ पेन्स हें प्रमाण जाऊन त्याच्या जागीं १ रुपया = १३ पेन्स हें प्रमाण आलें. उतरती हुंडणावळ अर्थातच जास्त रुपये देऊन परराष्ट्रीय नाणीं खरेदी करणारांस म्हणजे ज्यांस परदेशांत पैसे पाठविणें जरूर असे अशांसच नुकसानकारक होती. परंतु अशा लोकांत खुद्द हिंदुस्थानसरकार व युरोपियन अधिकारी आणि व्यापारी हेच मुख्य असल्यानें त्यांनीं नेटानें चळवळ करून अखेर विलायतसरकारास ह्या देशांतील रौप्यमूल्यमापनपद्धति बंद करावयास भाग पाडलें. १८९३ सालीं लोकांचा चांदीचे रुपये पाडून घेण्याचा हक्क नष्ट करण्यांत आला आणि रुपयाची सुवर्णानें मापलेली किंमत म्हणजे हुंडणावळीचा दर व्यवहारांत खेळणाऱ्या रुपयांची संख्या कृत्रिम रीतीनें मर्यादित करून, हळुहळू १६ पेन्सांपर्यंत चढविण्यांत आला. सोन्याचांदीची दुहेरी मूल्यमापनपद्धति पूर्वींच अव्यवहार्य ठरली होती आणि रौप्यचलनपद्धति तर आतां अशक्य झाली. तेव्हां पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणें हिंदुस्थानांतही सुवर्णपद्धति पूर्णत्वानें अमलांत येणें क्रमप्राप्तच झालें. फौलरकमिटीच्या शिफारशीप्रमाणें १८९९ सालीं ब्रिटिश सुवर्णचलन म्हणजे सॉव्हरिन् हिंदुस्थानचें मुख्य नाणें मुक्रर करण्यांत येऊन त्याचा व रुपयाचा परस्परमूल्यसंबंध म्हणजे हुंडणावळीचा दर १६ पेन्स कायम झाला. त्याचप्रमाणें सोन्याची टांकसाळ सुरू करण्याच्या पूर्वतयारीला सरकार लागून हिंदी चलनाचा प्रश्न एकदांचा कायमचा सुटला असें सर्वांस वाटूं लागलें.

पण—थोड्याच अनुभवांतीं सरकारी अधिकाऱ्यांच्या असें लक्षांत आलें कीं, हिंदुस्थानांत सोन्याची टांकसाळ चालू न करतांही भागण्यासारखें आहे. व्यापाराच्या ओघांत जरूरीपुरतें सॉव्हरिन् प्रतिवर्षी देशांत येतच होते आणि अंतर्गत व्यवहाराचें काम रुपये आणि कागदी नोटा ह्यांवर सुरळीत रीतीनें चाललें होतें. एका दृष्टीनें रुपया हें " खुल्या " टांकसाळीच्या अभावीं दुय्यम दर्जाचें नाणें असलें तरी त्याचा उपयोग व्यवहारांत मर्यादित केलेला नव्हता आणि म्हणून 'रुपया' लंगडा असला तरी सॉव्हरिनच्या बरोबरीनें समाजांत वावरत होता. सॉव्हरिनच्या मोबदला ठराविक दरानें रुपये आणि नोटा देण्यास सरकार बांधलें गेलें होतें, पण त्याच्या उलट

रुपये आणि नोटा घेऊन सोनें देण्याची जबाबदारी त्यानें अंगिकारिली नव्हती. ह्याचा अर्थ असा झाला कीं, रुपया हेंच हिंदुस्थानचें प्रमुख नाणें बनून त्याचें सॉव्हरिनशीं प्रमाण कायम ठेवणें हेंच एक सरकारचें कर्तव्य उरलें. हुंडणावळीचा दर अशा रीतीनें कायम ठेवण्यास सरकारला दोन गोष्टी करतां आल्या म्हणजे काम भागण्यासारखें होतें. एक, विलायतेंत पेढीवाले व व्यापारी ह्यांनीं सोनें दिलें असतां त्यांस सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांनीं हिंदुस्थानसरकारावर रुपयांच्या हुंड्या देणें आणि दुसरें, जरूर पडेल तेव्हां येथील सरकारनें रुपये घेऊन त्यांच्याबद्दल स्टेट सेक्रेटरीवर सॉव्हरिनच्या हुंड्या विकणें हें होय. परराष्ट्रीय व्यापाराच्या देवघेवींत शेवटीं कोट्यवधि रुपयांचें येणें प्रतिवर्षीं हिंदुस्थानास घ्यावयाचें असल्यामुळें आणि हिंदुस्थानसरकारला लंडनला दरवर्षीं तीसचाळीस कोटि रुपये पाठवावयाचे असल्यानें हा व्यवहार सुरळीत चालणें कठिण नव्हतें. रुपये घेऊन सोनें किंवा परराष्ट्रीय हुंड्या देण्याचा प्रसंग क्वचितच येत असे आणि महायुद्धापूर्वीच्या चवदा वर्षांत अशी जरूर १९०७-०८ सालींच काय ती एकदां भासली. ह्या दिव्यांतून बाहेर पडतांच आपली नवीन चलनपद्धति यशस्वी आणि टिकाऊ ठरली ह्याविषयीं सरकारास विश्वास आणि अभिमान वाटूं लागला आणि ह्या 'सुवर्ण-विनिमय मापक-पद्धती'चा चोहोंकडे बोलबाला झाला.

फौलरकमिटीच्या शिफारशी सरकारनें जाहीर रीतीनें मान्य केल्या असतांही सात-आठ वर्षांच्या अवधींत त्यांचें धोरण भलत्याच दिशेनें वाहत जाऊन शेवटीं त्याचें वर वर्णिलेल्या नवीन व्यवस्थेंत पर्यवसान झालें. कित्येक अर्थशास्त्रज्ञांस ही अभूतपूर्व पद्धति मागसलेल्या दरिद्री पौरस्त्य देशांत योग्य आणि सोयीची आहे ह्या विचारानें कौतुक वाटून त्यांनीं हिंदी सरकारचें अभिनंदन केलें. पुढारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांनीं सुवर्णचलन वापरावें आणि हिंदुस्थानासारख्या देशांनीं चांदीचा उपयोग करावा ही विभागणी त्यांस सरळ आणि हितकर भासली. परराष्ट्रीय व्यापारांत असलेलें सोनें सरकार पुरविण्यास तयार असतांना तें सोन्याच्या नाण्यांतही फुकट अडकवून ठेवण्याचा अडाणी आणि हानिकारक हेका हिंदी लोकांनीं चालविणें वेडेपणाचें आहे आणि जगाच्या आर्थिक स्वास्थ्यास, सोन्याची बचत करून तें पेढ्यांच्या गंगाजळींत शिलकी ठेवणें अगत्याचें आहे असें प्रतिपादन करण्यास त्यांनीं सुरवात केली. " हिंदी रुपयाचें लग्न सोनेरी सॉव्हरिनशीं कायदेशीर रीतीनें लावून दिलें आहे; मूल्यमापनाचें साधनही सुवर्णच आहे; तेव्हां ही पद्धति वस्तुतः सुवर्णमूल्यमापनात्मकच आहे, किंबहुना, सर्वमान्य सुवर्णपद्धतीची सुधारलेली आवृत्ति आहे. पाश्चात्य देशांत मूल्यमापन, सरकार सोनें घेऊन आणि सोन्याचीं नाणीं देऊन स्थिर ठेवतें आणि हिंदुस्थानांत सरकार रुपये देऊन आणि जरूर पडेल तेव्हां सोन्याच्या हुंड्या देऊन तो कार्यभाग करतें एवढाच दोहोंमध्यें भेद आहे. म्हणूनच केवळ हिंदी पद्धतीस सुवर्णमूल्यमापनपद्धति न म्हणतां सुवर्ण-विनिमयमूल्यमापनपद्धति म्हणतात." ही

विचारसरणी सरकारास व त्यांच्या मताच्या पुरस्कर्त्यांस पटली; आणि पाश्चात्य राष्ट्रांच्या सध्यांच्या आर्थिक स्थितींत ती वळावूं पहात आहे. १९१३ सालच्या चेंबर्लेन कमिशननें ह्याच विचारसरणीचा अवलंब केला आणि हिंदुस्थानास सुवर्ण-चलन आवश्यक नाहीं असें प्रतिपादन केलें. महायुद्धाच्या काळांत चांदीची अनपेक्षित रीतीनें बेसुमार महर्घता झाली आणि सरकारास ठराविक दरानें रुपये किंवा सोनेरी हुंड्या लोकांस देणें अशक्य झालें ह्यामुळें प्रचलित हिंदी चलनपद्धतीचा डोलारा जमीनदोस्त झाला. तरीही बॅबिंग्टन स्मिथ कमिटीच्या सल्ल्याप्रमाणें हुंडणावळीचा दर २४ पेन्स ठरवून त्याचें स्थिरस्थावर करण्याची सरकारनें पराकाष्ठा केली असतांही तीमध्यें देशाचें कोट्यवधि रुपयांचें नुकसान होऊन त्यांच्या पदरीं अपयश आलें. पन्नाससाठ कोटि रुपये किंमतीच्या विलायती हुंड्या विकूनही हुंडणावळ कल्पित दरावर स्थिर करतां येत नाहीं असें पाहून सरकार हताश झालें आणि हुंडणावळ जाईल तिकडे जाऊं दे असें म्हणून स्वस्थ बसण्याचा त्यांनीं निश्चय केला.

व्यापाराच्या व आर्थिक घडामोडींत रुपयाचा भाव १९२४ मध्यें १६ पेन्सांवर आला आणि सरकारला आपल्या चलनपद्धतीची पूर्ववत् घडी बसविण्याची संधि मिळाली. परंतु हुंडणावळीच्या दरांत आणखी चलबिचल होऊन युरोपांत शेवटीं स्थिरस्थावर झालें म्हणजे १८।२० पेन्सांवर जाऊन तेथें तो स्थिर होईल असें सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांस वाटत होतें. एक तर, दुधानें तोंड भाजलें म्हणजे मनुष्य ताकही फुंकून पिऊं लागतो, त्याप्रमाणें येथील सरकारची स्थिति झाली आणि हुंडणावळीचा दर कायद्यानें कायम करण्यांत घाई उपयोगी नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें. दुसरे असें कीं, त्याच्या मतें १६ पेन्सांपेक्षां १८ पेन्सांचा दर स्वतःच्या तिजोरीस आणि एकंदर आर्थिक परिस्थितीस सोइस्कर झाला असता. १९२४ व १९२५ ह्या सालांत रुपया हळुहळू वर चढत होता आणि सरकारनें चांदीचें आणि कागदाचें चलन मर्यादित परिमाणांतच व्यापाऱ्यास पुरविण्याचें धोरण स्वीकारल्यामुळें ह्या रुपयाच्या प्रगतीस साहाय्य झालें. सॉव्हरिनचे कायदेशीर रीतीनें फक्त १०च रुपये मिळत असल्यामुळें आणि सरकारनें चलन पुरविण्याच्या बाबतींत हात आंखडता घेतल्यामुळें बाजारांत पैशाची टंचाई झाली आणि वाढत्या हुंडणावळीच्या दरांस अनुसरून हिंदुस्थानांतील अंतर्गत पदार्थांच्या किंमती बाहेरील देशांतील किंमतींच्या अनुरोधानें उतरूं लागल्या. देशांतील धारण आणि परदेशांतील धारण ह्यांची सांखळी जोडणारा हुंडणावळीचा दर हा दुवा असतो. हिंदुस्थानांत अन्य राष्ट्रांच्या मानानें स्वस्ताई व्हावी आणि शक्य तर हिंदी धारण स्थिर रहावी ह्या हेतूनें सरकारनें सुमारें एक वर्षपर्यंत हुंडणावळीचा दर कृत्रिम रीतीनें १८ पेन्सांच्या सान्निध्यांत राखला. आतां सर्वत्र पुष्कळ स्थिरस्थावर झालें आहे, हुंडणावळीच्या दरांत व हिंदी धारणींमध्यें यापुढें म्हणण्यासारखा चढउतार होण्याचा संभव नाहीं आणि पैशाच्या टंचाईचें व रुपयाचा कायदेशीर दर एक तर बाजारभाव भलताच,

असला प्रकार कायम ठेवण्याचें धोरण ह्याउप्पर चालू ठेवणें अशक्य आहे. असा युक्तिवाद करून हिंदुस्थानसरकारनें नवीन करन्सी कामिशन नेमण्याबद्दल स्टेट सेक्रेटरींचें अनुकूल मत बनविलें. चौकशी करण्याच्या बाबतींत नेमण्यांत येणाऱ्या कमिशनचें कार्यक्षेत्र मर्यादित करून त्याचे हातपाय बांधून टाकूं नका अशी स्पष्ट मागणी हिंदी लोकमतानें केली होती आणि तीस अनुसरून, हिल्टन यंग कमिशनकडे सोंपविलेल्या प्रश्नांची योजना करण्यांत आली.

कमिशनला मुख्यत्वेंकरून दोन महत्त्वाच्या बाबींसंबंधानें आपलें मत बनवावयाचें होतें. पहिली बाब, हिंदुस्थानांत सुवर्णचलनपद्धति पूर्णत्वानें चालू करणें इष्ट व शक्य आहे किंवा नाहीं आणि दुसरी मूल्यमापनाचें परिमाण म्हणजे हुंडणावळीचा दर कोणता असावा ही होय. पहिल्या प्रश्नाचें कमिशननें असें उत्तर दिलें आहे कीं, सध्यांची अर्धबोबडी सुवर्णपद्धति सोडून देणें तर आवश्यक आहे; तथापि सुवर्ण-मूल्यमापन आणि सुवर्णचलन यांची सांगड असलेली बाळबोध व्यवस्था सुरू करणें अनिष्ट आणि अहितकारक आहे. दुसऱ्या बाबीचा निकाल कमिशननें १८ पेन्स दराच्या बाजूस आपलें ठाम मत देऊन केला आहे. आतां, परंपरागत शुद्ध अशी सुवर्णचलनपद्धति नाहीं, त्याचप्रमाणें सध्यां चालू असलेली घेडगुजरीही पद्धति नाहीं, तर मग त्यांच्याऐवजीं दुसरी कोणती योजना अमलांत आणणें शक्य आहे ? ह्याला उत्तर म्हणून कमिशननें 'मुरारेः तृतीयः पंथाः' सुचविला आहे; आणि हा मार्ग जरी अगदीं नवीन तरी खऱ्याखुऱ्या सुवर्णमूल्यमापनाचाच आहे; असें त्यानें ठांसून सांगितलें आहे ! चालू व्यवस्थेंत रुपयाची सोन्याशीं संगत घातलेली असली तरी ती वस्तुतः परदेशांत द्यावयाच्या हुंडीच्या स्वरूपांत घातली गेल्यामुळें सामान्य बुद्धीच्या व माहितीच्या माणसास तींत सोनें प्रत्यक्ष कोठें दिसत नाहीं.

"हिंदुस्थानांत अर्थशास्त्र जाणणारे आणि आधुनिक व्यापारपद्धतीची तात्त्विक माहिती असलेले लोक फारच थोडे आहेत, ह्या कारणानें हिंदी लोकमत सामान्यतः 'चक्षुर्वै सत्यम्' वरच काय तो विश्वास ठेवणारें आहे. म्हणून आम्हीं, सरकारनें लोकांपासून सोनें ठराविक भावानें विकत घ्यावें व त्यांस तें तसेंच विकावें अशी कायद्यानें जबाबदारी त्यावर टाकीत आहों. ह्याचा अर्थ असा कीं, आज रुपये किंवा नोटा घेऊन सोनें देण्यास हिंदी सरकार बांधलेलें नाहीं ती बेजबाबदारपणाची स्थिति नाहींशी करून तिच्याऐवजीं सोनें घेण्याचा व देण्याचा निर्बंध त्यावर कायद्यानें घालीत आहों. टांकसाळींतून सोन्याचें नाणें पाडून देणें म्हणजे सुवर्णाचा अपव्यय करण्यासारखें असल्यानें आणि तसें करावयाचें ठरविलें तरी तें मोठ्या खर्चाचें व दुःसाध्य ध्येय असल्यानें नाण्यांच्याऐवजीं सोन्याच्या लगडी व विपा देण्याची व्यवस्था झाली असतां सुवर्णपद्धतीचा मुख्य हेतु सिद्धीस जाऊन लोकांचेंही समाधान होईल." वरील अर्थाचें वर्णन देऊन कमिशननें आपल्या चमत्कृतीचें समर्थन केलें असून तिला "सुवर्णखंडमूल्यमापन" असें नांव दिलें आहे. जेंत

शुद्धसुवर्णपद्धतींतले दोष नसून गुण मात्र आहेत अशी जी ही नवी व्यवस्था ती काय आहे ह्याचा आतां थोडा विचार करणें जरूर आहे.

सोन्याच्या नाण्यांचा उपयोग दोन तऱ्हांनीं करतां येण्यासारखा असतो. सोयीप्रमाणें ते सुवर्णचलन म्हणून वापरलें जाईल किंवा केवळ सोन्याच्या धातूचा तुकडा ह्या नात्यानें त्याचा उपयोग होईल. सरकार अथवा मध्यवर्ती बँक ह्यांस व्यापाराची जरूरी आणि हुंडणावळीच्या दराची स्थिरता ह्या दोन दृष्टींनीं देशांत खेळणाऱ्या सर्व प्रकारच्या चलनाचें नियमन करतां येतें. चांदीचे रुपये किंवा नोटा सांठवून ठेवण्यापेक्षां सोन्याचीं नाणीं शिल्कीं ठेवणें लोकांस ज्यास्त सोयीचें आणि फायद्याचें असल्यानें सुवर्णचलनाच्या परिमाणावर सरकारचें किंवा बँकेचें नियंत्रण चालत नाहीं. व्यापाराच्या जरूरीच्या मानानें खेळतें चलन ज्यास्त झाल्यास तें मर्यादित करण्याच्या कामीं सोन्याच्या नाण्यांची संख्या कमी करणें सरकारास किंवा बँकेस अशक्य होतें. परंतु सोन्याच्या नाण्यांच्या ऐवजीं सोन्याच्या लगडी किंवा चिपा लोकांस देण्यांत आल्यास सुवर्णमूल्यमापनपद्धतीचा मुख्य उद्देश साध्य होऊन हुंडणावळीचा दर कायम ठेवण्याचें सरकारचें किंवा मध्यवर्ती बँकेचें काम सुकर होईल. वरील विचारसरणीचा अवलंब करूनच कमिशननें आपल्या नवीन सुवर्णपद्धतीचें समर्थन केलें आहे. त्यांत एकच समाधानाची गोष्ट आहे कीं, कमिशननें सध्यां चालू असलेल्या चलनपद्धतीचा निषेध करून ज्या व्यवस्थेनें हिंदी लोकांस रुपये किंवा नोटा ह्यांचा सोन्याशीं असलेला संबंध प्रत्यक्ष दिसत नाहीं, किंवा जीमध्यें रुपये आणि नोटा देऊन लोकांस सोनें मोबदला मिळण्याची तरतूद नाहीं असली पद्धति हिंदुस्थानास गैरलागू आहे असें स्पष्ट मत त्यानें नमूद केलें आहे. हिंदी लोकांनीं पेढ्यांमध्यें सोनें व्याजीं लावण्याऐवजीं तें दागिन्यांत फुकट अडकवून ठेवूं नये असें कितीही कंठरवानें सांगितलें तरी तें व्यर्थ आहे. तेव्हां निदान सोनें नाण्याच्या स्वरूपांत सांठवून न ठेवतां लोकांनीं तें लगडी किंवा चिपा ह्यांच्या स्वरूपानें बाळगल्यास चलनपद्धतीच्या दृष्टीनें तें इष्टच आहे. ह्या मुद्द्यावर कमिशननें, लोकांस कायदेशीर हक्कानें सरकारापासून, ठराविक दरानें सोनें विकत घेतां यावें (म्हणजे रुपयांचें आणि नोटांचें सोन्यांत सहज रूपांतर व्हावें) आणि तें तसेंच सरकारास विकतांही यावें अशी योजना सुचविली आहे. सदरहू व्यवस्थेंत, खऱ्याखुऱ्या सुवर्णचलनपद्धतीप्रमाणें पदार्थांचें मोल सोन्याच्या भावानें आकारण्याची तजवीज आहे; तशीच लोकांस चांदीचें नाणें आणि नोटा ह्यांचा सोन्याशीं विनिमय करण्याचीही सोय आहे. म्हणूनच ह्या पद्धतीस कमिशननें निर्भेळ सुवर्णमूल्यमापनपद्धति असें म्हटलें आहे.

परंतु ह्या व्यवस्थेंत एक गोम आहे ती ही कीं, लोकांस दर तोळ्यास २१ रुपये ३ आणे १० पै ह्या भावानें सोनें विकण्याची जी जबाबदारी सरकारावर टाकली आहे, ती ४०० औंस वजनाचें सोनें एकदम घेणारासंबंधानेंच फक्त आहे. शिवाय, ह्या दरानें सरकार किंवा मध्यवर्ती पेढी सोनें विकूं लागल्यास देशांतले सोन्या-चांदीचे

घाऊक व्यापारी धरून सरकार किंवा पेढी ह्यांस फार मोठ्या प्रमाणावर सराफी धंदा करावा लागेल. वर नमूद केलेला दर हुंडणावळीच्या कायदेशीर दराचा निदर्शक आहे आणि त्या भावानें सोनें बिनतक्रार नेहमीं विकावयाचें म्हणजे सरकारचें त्यांत नुकसान होण्याचा संभव आहे. एवढ्याकरितां हा सराफीचा धंदा करण्याचें सरकारनें टाळलें पाहिजे आणि त्याची जबाबदारी फक्त हुंडणावळीकरितांच सोनें देण्यास मर्यादित झाली पाहिजे असें कमिशननें निक्षून सांगितलें आहे. तसेंच, लंडनहून सोनें आणल्यास त्यास जी किंमत पडेल तीस अनुसरून, विकावयाच्या सोन्याचे भाव वेळोवेळ ठरविले जावयाचे आहेत. म्हणजे सध्यांच्या पद्धतीप्रमाणेंच कमिशननें सुचविलेल्या योजनेंत, विवक्षित परिस्थितींत हुंडणावळीचा दर उतरेल,त्याच वेळीं सरकारनें लोकांस सोनें पुरवावयाचें आहे. जुन्या व्यवस्थेंत निदान सॉव्हरिन् हें नाणें तरी कायदेशीर चलन होतें. त्याचें कमिशनच्या म्हणण्याप्रमाणें उच्चाटन व्हावयाचें असून त्याच्याऐवजीं मिळावयाच्या लगडी आणि चिपा ह्या केवळ कल्पनेमध्येंच रहाणार. आज नाहीं उद्यां, सोन्याची टांकसाळ देशांत सुरू होऊन सोन्याचें नाणें चालू होणार अशी लोकांस आशा तरी होती. हिल्टन यंग कमिटीनें आहे तेंही नाणें काढून टाकून नवीन सुवर्णचलन कांहीं वर्षेंपर्यंत तरी मुळींच पाडूं नये अशी शिफारस केली आहे. चलनपद्धतीच्या यशस्वीपणाचें अधिष्ठान लोकविश्वासावर आहे आणि म्हणून लोकांस सामान्य चलनाच्या मोबदला सोनें सरकारनें दिलेंच पाहिजे अशी प्रस्तावना करून शेवटीं कमिशननें आपली योजना नुसत्या कागदाच्या चलनावर आणून ठेविली आहे! इंग्लंडांत असलीच पद्धति आतां अमलांत आली आहे हें कारण कमिशनच्या शिफारशीस फारसें समर्थनकारक नाहीं. इतर युरोपियन राष्ट्रांत लोकांस सोन्याचें आजमितीस दर्शनही होत नाहीं ह्याही मुद्द्यांत कांहीं अर्थ नाहीं. रुपये आणि नोटा देऊन लोकांस आजही खुल्या बाजारांत सोनें विकत घेतां येतें, आणि सरकार बाजारभावानें सोनें विकणार; मग कमिशनच्या शिफारशींत विशेष काय राहिला!

हिंदुस्थानांत सुवर्णचलन सुरू करण्याच्या मार्गांत त्यांच्या मतानें असलेल्या सतरा अडचणी कमिशननें पुढें मांडिल्या आहेत. उदाहरणार्थ, सोन्याचें नाणें चालू करावयाचें म्हणजे मोठ्या खर्चाचें काम आहे; त्यास लागणारें सोनें मिळावयाची मारामार पडणार आहे; अमेरिकेंत पुष्कळ सोनें आहे, परंतु तें राष्ट्र व इंग्लंडची मध्यवर्ती पेढी ह्या बाबतींत प्रतिकूल आहे, आणि म्हणून त्यांची मदत किंवा सहानुभूति हिंदुस्थानास मिळणें अशक्य आहे; युरोपांतलीं राष्ट्रें महायुद्धामुळें झालेल्या आर्थिक आपत्तींमधून बाहेर पडण्याची व आपापल्या चलनव्यवस्था सुधारण्याची खटपट करीत आहेत, त्यांच्या कार्यांत हिंदी सुवर्णचलनानें भयंकर व्यत्यय येऊन, जगाच्या आर्थिक प्रगतीच्या गाड्यास खीळ घातल्याचें पातक हिंदुस्थानच्या माथीं पडणार आहे! हिंदुस्थाननें रुपयाचा, मुख्य नाणें ह्या नात्यानें त्याग करून सोन्याच्या नाण्याचा अंगीकार केल्यास अमेरिकेंतील चांदीच्या खाणीचे मालक आणि सराफ

चिडून जातील आणि चीनमध्यें असंतोष उत्पन्न होईल आणि ह्या सर्व घडामोडींचे दुष्परिणाम खुद्द हिंदुस्थान देशास भोगावे लागतील अशा तऱ्हेच्या अपवादांवर जोर देऊन कमिशननें हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें चालू करणें सर्व दृष्टींनीं अनर्थावह आहे असा आपला अभिप्राय दिला आहे. सध्यांच्या पोस्टल कॅश सर्टिफिकिटां-सारखीं सेव्हिंग्ज् सर्टिफिकिटें सरकारनें काढावीं आणि मुदत भरल्यावर त्यांचे पैसे परत देण्याचा प्रसंग येईल तेव्हां एकेक किंवा अधिक तोळे वजनाच्या सोन्याच्या चिपा लोकांस द्याव्या म्हणजे हिंदुस्थानांत सुवर्णपद्धति चालू झाल्याचें त्यांच्या अनुभवास येईल अशी तोड कमिशननें सुचविली आहे. हा सर्व द्राविडी प्राणायाम झाला तरी त्यानें ह्या देशांत खरी सुवर्णमूल्यमापनपद्धति अस्तित्वांत आली असा लोकांचा विश्वास बसणें अशक्य आहे. सध्यांच्या रुपयांत आणि सध्यांच्या रुपयांत ज्यांचें परिवर्तन झालेंच पाहिजे अशा नोटा, यांत ढवळाढवळ करूं नये असें कमिशनचें म्हणणें आहे. परंतु ह्यापुढें ज्या नोटा काढावयाच्या त्यांच्या मोबदला दुसऱ्या लहान व विशेषतः एक रुपयाच्या नोटाच देण्याची जबाबदारी सरकारनें घ्यावी. चांदीचा भाव वाढून ती वितळली जाण्याची जी नेहमीं भीति असते ती दूर व्हावी म्हणून रुपयाचें चलन हळुहळू कमी करीत जावें आणि शेवटीं हिंदुस्थानचें चलन कागदाचेंच रहावें अशी व्यवस्था व्हावी हा कमिशनचा उद्देश आहे !

अंतर्गत व्यवहाराचें काम कागदी चलनानें आणि हलक्या नाण्यांनीं भागण्यासारखें असतांना सोन्याच्या नाण्यांचा उपयोग लोकांनीं करीत रहाणें अडाणी-पणाचें आहे ही गोष्ट तात्त्विक दृष्टया खरी असली तरी खुद्द कमिशननें कबूल केल्याप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांची परिस्थितीच अशी आहे कीं, सोन्याचीं नाणीं सहज मिळण्याची सोय असल्यावांचून त्यांचा कोणत्याही सुवर्णचलनपद्धतीवर विश्वास बसावयाचा नाहीं. म्हणून सुधारलेल्या चलनपद्धतीचें ध्येय आम्हांस गांठावयाचें असल्यास त्याचा मार्ग सुवर्णचलनपद्धतीमधूनच काढला पाहिजे, त्यास कांहीं इलाज नाहीं. व्यापाराच्या ओघांत या देशांत प्रतिवर्षी कोट्यवधि रुपयांचें सोनें येत रहाणार; तें सरकारनें किंवा दुसऱ्या कोणीं कांहीं केलें तरी कमी होत नाहीं. मग लोकांच्या हातीं सोनें आलें असतां त्याचा उपयोग नाण्यांच्या स्वरूपांत केल्यास फारसें बिघडणार नाहीं; उलट थोडेंबहुत हितच होणार आहे. ह्या दृष्टीनें सदरहू प्रश्नाकडे कमिशननें पाहिलें असतें तर त्यास व्यवस्थित रीतीनें आणि योग्य निर्बंध घालून सुवर्णपद्धति सुरू करण्याविषयींच्या शिफारशी करतां आल्या असत्या. परंतु हिंदुस्थानांतील परिस्थिति व हिंदी लोकांच्या गरजा ह्यांपेक्षां युरोपियन आणि इतर राष्ट्रांची सद्यःस्थिति आणि त्यांचें भवितव्य ह्यांकडेच कमिशननें विशेष लक्ष पुरविल्या-मुळें त्यांनीं सध्यांच्या असमाधानकारक शिफारशी केल्या आहेत. त्यांची योजना कदाचित् अगदीं प्रामाणिक मतावर आधारलेली असेल; परंतु तीमध्यें हिंदी दृष्टि योग्य प्रमाणांत नाहीं, ही गोष्ट मात्र अगदीं खरी आहे. हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें

सुरू करण्याची कल्पना आज नवीनच निघाली असती तर गोष्ट वेगळी. करोबर पंचवीस वर्षें सुवर्णपद्धतीचें ध्येय हिंदी सरकार आणि लोक ह्यांनीं आपल्यापुढें ठेवलेलें आहे. असें असतां तें झुगारून देण्यास कमिशननें पुढें केलेलीं कारणें पुरेशीं आहेत असें कोणाही विचारी माणसास वाटावयाचें नाहीं. आज प्रत्येक युरोपियन राष्ट्र, आर्थिक परिस्थिति प्रतिकूल असतांनाही, सुवर्णपद्धतीच्या आणि चलनाच्या जितकें जवळ येतां येईल तितकें त्यास चिकटण्यास पहात आहे. असें असतां हिंदुस्थाननें मात्र त्या पद्धतीचा एकदम त्याग करावा ह्यांत काय अर्थ आहे ! हिंदुस्थानसरकारनें कमिशनच्या शिफारशी मान्य केल्यास लोकांच्या विश्वासापेक्षां अविश्वासच संपादन केल्याचें श्रेय त्यास येणार आहे. मध्यवर्ति कायदेमंडळापुढें मांडलेलें बिल त्यांनीं मागें घेतलें आहे यावरून लोकमताचा वारा कसा आणि किती जोरानें वहातो आहे ह्याची सरकारास जाणीव उत्पन्न झाल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत.

# इंडियन करन्सी लीग

## संस्थेचे उद्देश.

### उद्देश

हिंदुस्तानच्या हितसंबंधास पोषक होईल अशी चलनपद्धति अस्तित्वांत यावी ह्या हेतूनें चलनविषयक प्रश्नांचा पद्धतशीरपणें व निःपक्षपात बुद्धीनें अभ्यास करण्यास लोकांस उत्तेजन देऊन त्यांस जरूर त्या सोयी उपलब्ध करून देणें.

### तात्कालिक उद्दिष्ट

करन्सी कमिशननें १ शिलिंग ६ पेन्स ह्या दरावर हुंडणावळ स्थिर करावी अशी जी बहुमतानें सूचना केली आहे ती नुकसान-कारक असून, सर पुरुषोत्तमदास यांनीं आपल्या भिन्नमतप्रदर्शक पत्रिकेंत १ शिलिंग ४ पेन्स या दराबद्दल जी शिफारस केली आहे ती हिंदुस्तानास हितावह आहे, हें लोकांस समजून सांगणें.

'इंडियन करन्सी लीग-महाराष्ट्र शाखा', ह्या संस्थेमार्फत हिंदी चलनविषयक प्रश्नांसंबंधीं निरनिराळीं पत्रकें प्रसिद्ध होतात. राष्ट्रीय महत्त्वाच्या ह्या प्रश्नांचा सर्वत्र अभ्यास होऊन त्यासंबंधीं यथार्थ ज्ञान महाराष्ट्रांतील बहुजन समाजांत पसरणें अत्यंत अवश्य आहे. म्हणून ज्यांस हिंदी चलनपद्धतीची माहिती करून घेण्याची इच्छा असेल त्यांस हीं पत्रकें वाटण्याची व्यवस्था केलेली आहे. तरी गरजूंनीं खालील पत्त्यांवर एक आण्याचें तिकीट पाठवून मागणी केल्यास त्यांस तीं पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.

**प्रो० दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम्. ए.**

फर्ग्युसन कॉलेज,

**पुणें ( Deccan Gymkhana.)**

किंवा

**सेक्रेटरी, इंडियन करन्सी लीग-महाराष्ट्र शाखा,**
**गायकवाडवाडा, नारायण पेठ, पुणें.**

इंडियन करन्सी लीग—महाराष्ट्र शाखा

पत्रक नं. २

# हुंडणावळीचे दरासंबंधीं वाद

लेखक

प्रो॰ वामन गोविंद काळे, एम्. ए.

अनंत सखाराम गोखले, 'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें यांनीं छापिलें
तें दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम्. ए. सेक्रेटरी, इंडियन करन्सी
लीग—महाराष्ट्र शाखा, यांनीं पुणें, पेठ नारायण,
गायकवाडवाडा येथें प्रसिद्ध केलें.

# आभार

प्रस्तुत लेख 'रत्नाकर' मासिकाच्या नोव्हेंबर १९२६ च्या अंकांत प्रसिद्ध झाला होता. तो स्वतंत्रपणें प्रसिद्ध करण्याची आम्हांस परवानगी दिल्याबद्दल आम्ही मासिकाचे चालक रा० अ. स. गोखले यांचे अत्यंत ऋणी आहोंत.

# हुंडणावळीचे दरासंबंधीं वाद

# हुंडणावळीच्या दरासंबंधीं वाद

हिंदी चलनपद्धतीच्या इतिहासाकडे नुसती दुरून नजर फेंकणारास किंवा त्या पद्धतीची सध्यां चर्चा चालू आहे ती थोडीफार वाचणारास अथवा ऐकणारास एक गोष्ट कळून चुकल्याशिवाय राहणार नाहीं ती ही कीं, गेलीं पन्नाससाठ वर्षे हुंडणावळीच्या दरासंबंधानें रणें माजून राहिलीं असून आजदेखील त्याच बाबतींत खडाजंगी सुरू आहे. १८९३ सालीं हिंदी टांकसाळी 'बंद' करण्यांत आल्या त्या हुंडणावळीचा दर वर्षि वर्षे सारखा उतरत चालला होता म्हणून. त्यानंतर सहा वर्षेपर्यंत सरकारनें रुपये पाडण्याचें बंद करून १८९९मध्यें १ रुपया = १६ पेन्स हा हुंडणावळीचा दर कायद्यानें ठरवून टाकला. १९०७-०८ सालीं हुंडणावळीचा दर कांहीं काळपर्यंत कमी होऊन हिंदी चलनपद्धतीची बसलेली घडी थोडी विस्कळित झाली तरी एकंदरीनें हें गंडांतर हिशेबांत धरलें असतांही, महायुद्धाच्या काळापर्यंत, आपण हुंडणावळीचें भूत एकदांचें गाडून टाकलें अशी हिंदीसरकारची ठाम समजूत झाली होती. इतर महत्त्वाच्या चलनविषयक बाबींचा विचार करीत असतां १९१३ सालीं चेंबर्लेन कमिशनला हुंडणावळीच्या दराच्या प्रश्नाकडे ओझरतें देखील बघण्याची आवश्यकता भासली नाहीं, हें सदरहू समजुतीचें उत्कृष्ट द्योतक आहे. महायुद्धानें मात्र ही स्थिति पार बदलून टाकली. चांदीचा भाव बेसुमार चढल्यामुळें ठराविक कायदेशीर दरानें विलायती हुंड्या विकणें नुकसानीचें होऊन सरकारास हुंडणावळीचा दर तात्पुरता वाढवीत जाणें भाग पडलें. युद्धसमाप्तीनंतरही १६ पेन्सांचा पूर्वीचा दर परत येण्याची आशा दिसेना, तेव्हां हुंडणावळ दुसऱ्या कोणत्या तरी उंच दरावर कायम करणें जरूर आहे असें सरकारच्या मनानें घेतलें आणि त्या बाबतींत बॅबिंग्टन स्मिथ कमिटीस सल्ला विचारला. महायुद्धकालाचा अनुभव, चांदीची अपेक्षित भावी महर्घता इत्यादि गोष्टी हिशेबांत घेऊन त्या कमिटीनें, रुपयाचा, सोन्याच्या मापानें, २४ पेन्स भाव कायम करावा अशी शिफारस केली. २४ पेन्सांचा दर अमलांत आणण्यासाठीं सरकारनें शिकस्त करून पाहिली आणि कोट्यवधि रुपयांचा त्या कामीं चुराडा झाला असतांही आपणांस यश येत नाहीं हें पाहून त्यांनीं सदरहू नाद सोडून दिला. हुंडणावळ, व्यापारतरंगांवर हेलकावे खात असतां, १६ पेन्सांजवळ येऊन थडकली. परंतु १८ पेन्सांस तिला डांबून टाकण्याच्या हेतूनें सरकारनें आपले चलनात्मक व्यवहार चालवून हिल्टन यंग कमिटीकडे कायमच्या दराचा प्रश्न सोंपवून दिला. त्या कमिशननें १८ पेन्सांचाच दर पसंत करून त्यास

कायदेशीर स्वरूप देण्याची शिफारस केली. सरकारच्या मनांत होतें तेंच झाल्यामुळें त्यांनीं सदरहू दर कायम करण्यासाठीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लीपुढें गेल्या बैठकींत एक बिल सादर केलें. परंतु लोकप्रतिनिधींचा त्यास जोराचा विरोध होण्याचा रंग दिसल्यामुळें सरकारनें बिलाचा विचार पुढें ढकलला आहे.

वरील त्रोटक इतिहास वाचून एखाद्यास असा प्रास्ताविक प्रश्न सुचेल कीं, हुंडणावळीचा दर सरकारनें ठरविण्याचें आणि तो कायद्यानें कायम करण्याचें प्रयोजन काय? देशांत पेढीवाले एकमेकांवर हुंड्या काढतात त्यांचा दर मागणी-पुरवठ्याच्या तत्त्वानें ठरतो; तो कांहीं सरकार ठरवीत नाहीं. कापूस किंवा तांदूळ आणि गहूं ह्या पदार्थांचे भाव व्यापारी व्यवहाराप्रमाणें जसे कमी जास्त होतात तशी हुंडणावळही अनियंत्रित कां असूं नये? बरें, सरकार ज्या हुंडणावळीच्या दरांत हात घालतें ती फक्त परराष्ट्रीय हुंडणावळ होय. तिच्याही बाबतींत सरकारनें स्वस्थ राहून बाजारभावास चढउतार होण्यास स्वतंत्रता कां देऊं नये?

वरील प्रश्नांस कोणी असें उत्तर देईल कीं, हिंदुस्थानसरकारास प्रतिवर्षी सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांचे लंडनमधील तिजोरींत 'होमचार्जेस'साठीं सरासरीनें ३० कोटि रुपयांचा भरणा करणें जरूर असल्यानें विलायती हुंडीचा दर स्थिर राखणें त्यांच्या सोयीचें व हिताचें आहे. आणि हुंडणावळीचा दर स्थिर ठेवण्याचें काम इतर देशांत मध्यवर्ती बँका करीत असतात, तें काम हिंदुस्थानांत असल्या बँकेच्या अभावीं खुद्द सरकारच करतें. ह्या उत्तरांत थोडेंसें तथ्य असलें तरी मुख्य प्रश्नानें उत्पन्न केलेल्या विषयावर त्यानें प्रकाश पडत नाहीं. सबब हुंडणावळीचा दर आणि राष्ट्रीय चलनव्यवस्था ह्यांच्या परस्पर संबंधाचें स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे.

हुंडणावळीचा दर सरकार कायद्यानें कां मर्यादित करतें? ह्या प्रश्नाचें उत्तर वास्तविक रीतीनें, सरकार मुळीं हुंडणावळीचा दर ठरवीतच नाहीं असें आहे आणि तें सकृद्दर्शनीं चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे. ह्या लेखाच्या प्रारंभींच असें दिग्दर्शित केलें आहे कीं, हिंदी चलनपद्धतीचा इतिहास हा सरकारनें हुंडणावळीचा दर स्थिर करण्यासाठीं चालविलेल्या प्रयत्नांचाच इतिहास होय. तेव्हां त्या दोन परस्परविरोधी विधानांचा मेळ कसा बसवावयाचा? कोणतेंही सरकार आपल्या देशांतील कायदेशीर चलनांत किती वजनाचें सोनें असेल हेंच मुख्यत्वेंकरून ठरवीत असतें; हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. चलन हें मूल्यमापनाचें सामान्य साधन असल्यामुळें तें निश्चित वजनाचें आणि मूल्याचें असणें आवश्यक आहे. ज्याप्रमाणें वजनें, मापें, लोकव्यवहारांच्या सोयीसाठीं सरकारनें मुक्रर केलेलीं असावीं लागतात; त्याचप्रमाणें पदार्थांच्या मूल्यमापनाचें सर्वसामान्य साधन जो पैसा किंवा जें चलन त्याचें कायदेशीर नियमन करणें अपरिहार्य असतें. आपण अमुक धातूचें नाणें पाडून त्याचें अमुक वजन राखणार असा निर्बंध प्रत्येक सरकार स्वतःस घालीत असतें; आणि ही जबाबदारी पार पाडण्यासाठीं ठराविक वजनाचें सोनें टांकसाळींत

नेऊन त्याचीं जाहीर केल्याप्रमाणें नाणीं पाडून घेण्याचा प्रजेचा हक्क तें निर्माण करीत असतें. ह्याप्रमाणें, एक औंस वजनाचें सोनें कोणीही ब्रिटिश टांकसाळींत घेऊन गेला असतां त्यास त्याच्या मोबदला तीन पौंड, सतरा शिलिंग, दहा पेन्स मिळालेच पाहिजेत. एका सॉव्हरिनमध्यें अजमासें ११२ ग्रेन वजनाचें सोनें असतें; आणि त्यांत $\frac{१}{१२}$ जळ किंवा हलक्या धातूंचें मिश्रण असतें. सुवर्णधातूचीं नाणीं पाडून घेणें आणि सोयीप्रमाणें तीं आटवून त्याच्या लगडी किंवा दागिने करणें हे दोन हक्क लोकांस मिळाल्यामुळें मागणी व पुरवठा ह्यांच्या नियमास अनुसरून नाण्याची किंमत कायम रहात असते. ग्रेट ब्रिटनच्या सॉव्हरिन ह्या मुख्य नाण्याचें प्रस्तुत उदाहरण दिलें आहे तेंच जगांतील सर्व प्रमुख राष्ट्रांच्या चलनपद्धतीस लागू आहे.

प्रत्येक देशाच्या प्रमुख कायदेशीर चलनांत किती वजनाची धातु असते हें प्रसिद्ध असून चीनशिवाय जगांतील सर्व राष्ट्रांनीं सुवर्णमूल्यमापनपद्धति अंगिकारल्यामुळें ह्या निरनिराळ्या चलनांचा विनिमय कोणत्या प्रमाणांत झाला पाहिजे हेंही ठरल्यासारखेंच आहे. अमेरिकन डॉलर न्यूयॉर्कहून लंडनला पाठविल्यास, त्यांत असलेल्या सोन्याच्या मानानें त्यांची पौंडांत किंमत होणार हें उघड आहे, ह्या व्यवहारांत फक्त पाठविण्यास लागणारा खर्च हिशेबांत धरला म्हणजे झालें. एक सॉव्हरिन = ४·८६ डॉलर = २५·२ फ्रँक्स = २० जर्मन मार्क, असलें कोष्टक वरील हिशेबावरून ठरतें. एका देशांतील नाणें दुसऱ्या देशांत कायदेशीर चलन या नात्यानें कोणी घेणार नाहीं. परंतु सोन्याचा तुकडा म्हणून त्याचें मोल शिल्लक राहतें आणि तें निश्चित असतें. आजमितीस हिंदी बाजारांत सॉव्हरिनची किंमत सुमारें १३॥ रुपये आहे, याचें इंगित हेंच आहे. सध्यांचा केवळ हिंदी कायदा जर घेतला तर त्याप्रमाणें १० रुपयांना सॉव्हरिन मिळाला पाहिजे. परंतु सोन्याचा सॉव्हरिन आणि चांदीचा रुपया ह्यांचा सरकारनें लावून दिलेला मोहतुर विजोड ठरून त्यांची फारकत झाली असून सॉव्हरिन आमच्या बाजारांत सोन्याचा तुकडा म्हणूनच विकला जात आहे. हा संबंध लक्षांत येण्यास फारसें गणित करण्याचें कारण नाहीं, आणि स्थूलमानानें त्याचा खालीलप्रमाणें हिशेब आहे:—एक सॉव्हरिनमध्यें साधारणपणें ११३$\frac{१}{३}$ ग्रेन सोनें असतें व १८० ग्रेनचा एक तोळा होतो. सोन्याचा भाव सुमारें २१$\frac{१}{२}$ रुपये तोळा धरला तर एक तोळा : $\frac{११३\frac{१}{३}}{१८०}$ : : २१$\frac{१}{२}$ रुपये: $\frac{४३}{२} \times \frac{३४०}{३} \times \frac{१}{१८०} = १३\frac{१}{२}$ रुपये, असें त्रैराशिक बसतें. निरनिराळ्या राष्ट्रांतील कायदेशीर नाण्यांत सुवर्ण किती असतें. हें समजलें आणि राष्ट्रा-राष्ट्रांतील देणेंघेणें शेवटीं सोन्याच्या देण्याघेण्यानेंच घडवून आणलें जातें ही गोष्ट ध्यानांत आणिली तर असल्या सुवर्णमूल्यमापनपद्धतीनेंच अप्रत्यक्ष रीतीनें हुंडणावळीचा भाव निश्चित कसा होतो हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येण्यास अडचण पडणार नाहीं.

देशांतल्या देशांत हुंडीचा व्यवहार होतो तो सदरहू पैसे पाठविण्याचा मार्ग

विशेष सोयीचा आणि बेताच्या खर्चाचा असतो म्हणूनच होतो. एखाद्या गृहस्थास पुण्याहून मुंबईस १०,००० रुपये पाठवावयाचे झाल्यास तो ती रक्कम एखाद्या माणसाच्या हातीं आगगाडीनें धाडील किंवा मनीऑर्डरीनें पाठवील, किंवा चेकच्या अथवा हुंडीच्या स्वरूपानें पाठवील. ह्यांपैकीं कोणता मार्ग स्वीकारावयाचा किंवा सदरहू रकमेच्या चलनी नोटा रजिस्टर्ड पोस्टानें पाठवावयाच्या हें वरील गृहस्थ सोय, सुरक्षितता आणि पाठवावयास लागणारा खर्च ह्या गोष्टींचा विचार करून ठरवील. हाच नियम परराष्ट्रीय देण्याघेण्यास लागू आहे. मुंबईच्या एका कारखानदारानें विलायतेहून कांहीं यंत्रसामुग्री मागविली असल्यास तो बँकेंत जाऊन पैसे भरील आणि जरूर त्या पौंडांचा ड्राफ्ट घेऊन तो लंडनला व्यापाऱ्याकडे पाठवून देईल. विलायतेंत प्रचलित असलेलीं सोन्याचीं नाणीं किंवा खुद्द सोन्याच्या विटा त्याला स्थानिक बाजारांत बँकेच्या ड्राफ्टपेक्षां स्वस्त मिळाल्यास तो हुंडीच्या भानगडींत न पडतां सोनेंच पाठवील. ज्यास दुसऱ्याकडून घेणें असतें तो आपल्या ऋणकोवर हुंडी काढतो आणि ज्यास दुसऱ्याचें देणें असतें तो अशा हुंड्या विकत घेऊन आणि त्या आपल्या धनकोकडे धाडून देणें फेडतो. हा व्यवहार नेहमींचा आहे. सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया ह्यास हिंदुस्थानसरकारकडून होमचार्जेसबद्दल येणें असतें म्हणून ह्या दोघांच्या दरम्यान घेणेकरी व देणेकरी असा संबंध निर्माण होतो. स्टेट सेक्रेटरी हिंदुस्थानसरकारावर हुंड्या ( कौन्सिल बिल्स ) काढतो आणि त्या एक्स्चेंज बँका विकत घेऊन हिंदुस्थानांतील तिजोऱ्यांमध्यें पटवितात. हा व्यवहार दुसऱ्याही एका रीतीनें होऊं शकतो आणि हिंदुस्थानसरकारनें, हिंदी मालाची निर्गत करणाऱ्या स्थानिक व्यापाऱ्यांनीं काढलेल्या विलायतेवरील हुंड्या येथें विकत घेऊन त्या स्टेट सेक्रेटरींकडे पटवून वसूल करण्यास पाठविल्या असतां त्याचा परिणाम शेवटीं वरीलप्रमाणेंच होतो. येथें मुख्य प्रश्न हा आहे कीं, स्टेटसेक्रेटरीनें विकावयाच्या किंवा हिंदुस्थानसरकारनें ह्या देशांत विकत घ्यावयाच्या हुंडयांचा भाव कसा ठरतो? व्यापाराचा ओघ कमीजास्त जोराचा असेल त्या मानानें हुंडया स्वस्त किंवा महाग असूं शकतील आणि हुंडणावळ वरखालीं जाईल हें उघड आहे. परंतु राष्ट्राराष्ट्रांमधील देणेंघेणें करण्याच्या कामीं परराष्ट्रीय हुंडयांस एक जबरदस्त प्रतिस्पर्धी असतो हें विसरतां कामा नये आणि हा प्रतिस्पर्धी म्हणजे सोनें होय.

एका राष्ट्राचीं नाणीं दुसऱ्या राष्ट्रांत चाललीं नाहींत तरी सोन्यास चोहोंकडे मागणी असते आणि राष्ट्रीय टांकसाळींत नाणीं पाडून घेणें सुलभ असल्यामुळें हुंड्यांच्या ऐवजीं सोन्याची आयात आणि निर्यात करून अंतर्राष्ट्रीय देणींघेणीं भागवितां येतात. तेव्हां हुंडणावळीचा दर केव्हांही सोन्याच्या भावाच्या मानानें ठराविक मर्यादेबाहेर कमीजास्त होणें केवळ अशक्य आहे. सेक्रेटरी ऑफ स्टेटनें एखाद्या आठवड्यांत हिंदुस्थानसरकारावर हुंड्या विकावयास काढल्या असें आपण समजूं. तो आपल्या हुंड्या विवक्षित दरानें विकीत असतां त्या वेळीं लंडनमधील

सोन्याचा भाव स्वस्त असून त्या हुंड्या विकत घेण्याऐवजीं सोनें विकत घेऊन तें हिंदुस्थानांत पाठविणें कमी खर्चाचें आढळून आल्यास व्यापारी ह्या दुसऱ्या मार्गाचा अवलंब करतील आणि स्टेट सेक्रेटरींच्या हुंड्या विकल्या जावयाच्या नाहींत किंवा त्यास हुंडणावळीचा दर सोन्याच्या भावाच्या मानानें कमी करणें प्राप्त होईल. म्हणजे हुंडणावळीचा दर सोन्याच्या आयातनिर्गतीच्या भावावर अवलंबून राहणार हें स्पष्ट झालें. (१) परराष्ट्रीय हुंड्या विकणें आणि विकत घेणें हा व्यवहार परराष्ट्रांतील कायदेशीर चलन मिळविणें किंवा पुरविणें या उद्देशानेंच करावयाचा असतो ही पहिली गोष्ट लक्षांत ठेवावयाची आहे. (२) दुसरी गोष्ट वर स्पष्ट केली आहे ती ही कीं, निरनिराळ्या राष्ट्रांत कायदेशीर रीतीनें प्रचलित असलेल्या आणि मूल्यमापन म्हणून प्रस्थापित झालेल्या नाण्यांत सोनें किती असतें आणि त्यांचें मूल्याचें परस्पर प्रमाण काय असतें हें सर्व श्रुत असून त्याच्याच आधारानें अंतर्राष्ट्रीय देणींघेणीं होत असतात. (३) त्याबरोबरच तिसरी महत्त्वाची बाब ध्यानांत बाळगावयाची म्हणजे सोन्याची आयातनिर्गत करण्याऐवजीं राष्ट्राराष्ट्रांतील देण्याघेण्याची वजावाट हुंड्यांच्या द्वारें करणें सोयीचें व कमी खर्चाचें असतें ही होय. एखाद्या देशांतील मालाची निर्गत करणाऱ्या व्यापाऱ्यांनीं परदेशांतून सोनें मोबदला घेणें आणि परदेशांतून आणलेल्या मालाची किंमत दुसऱ्या व्यापाऱ्यांनीं सोन्याची निर्गत करून स्वतंत्र रीतीनें करणें अशी व्यवस्था झाल्यास सोन्याची जी निष्कारण नेआण करावी लागेल ती निर्गत आयात व्यापाऱ्यांनीं हुंड्या विकून आणि विकत घेऊन घेणें देणें केलें असतां न करावी लागून अंतर्राष्ट्रीय व्यापारांतील जमाखर्चाच्या आढाव्यांत बाकी निघेल तेवढ्यापुरतेंच सोनें घेऊन किंवा देऊन कार्यभाग सुकर रीतीनें घडवून आणवितां येतो. (४) चौथा आणि शेवटचा नमूद करावयाचा सिद्धान्त हा आहे कीं, हुंडणावळीचा दर वस्तुतः आपल्या राष्ट्रीय नाण्याचें परराष्ट्रीय नाण्याशीं असलेलें मूल्यप्रमाणच होय, आणि म्हणून त्यास स्वतंत्र अस्तित्वच नाहीं. जेथें सोन्याचें नाणें व्यवहारांत खेळतें असत नाहीं आणि कागदी चलनाचाच सुळसुळाट झालेला असतो तेथें अर्थातच ही प्रमाणबद्धता नाहींशी होऊन हुंडणावळीचा दर वाटेल तसा वाहात जातो. फ्रान्समधील मुख्य नाणें जे फ्रँक त्याची सध्यां अशीच दीनावस्था झाली असून फ्रेंच हुंडणावळीच्या दरांत विलक्षण चढ-उतार होत राहिला आहे. फ्रान्समध्यें कागदी चलन इतकें बेसुमार वाढलें आहे कीं, त्याच्या मोबदला सोनें मिळण्याची आशा उरलेली नाहीं. त्याचप्रमाणें सदरहू देशांत अशी महागाई झाली आहे कीं, एका ब्रिटिश सॉव्हरिनमध्यें असलेलें सोनें युद्धकालापूर्वीं २५$\frac{1}{4}$ फ्रँकला विकत मिळत असे त्यास आतां १७५ फ्रँक पडतात. म्हणजे इंग्लंड व फ्रान्स ह्यांच्या दरम्यानचा हुंडणावळीचा दर १ सॉव्हरिन=२५$\frac{1}{4}$ फ्रँक असा होता तो आतां १ सॉव्हरिन=१७५ फ्रँक असा झाला आहे.

आतां, हिंदुस्थानांत विलायती हुंडीचा भाव १६ पेन्स असावा कीं १८ पेन्स

असावा ह्याबद्दल वाद चालला आहे त्याचा अर्थ हिंदी रुपयाचें मूल्य सोन्याच्या कोणत्या परिमाणाइतकें म्हणजे किती ग्रेन सोन्याइतकें असावें ह्यासंबंधीं मतभेद उत्पन्न झाला आहे, इतकाच आहे. हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सॉव्हरिनच्या स्वरूपांत केवळ नांवाला मात्र प्रचलित आहे, हें वर दाखविलेंच आहे. येथें सोन्याची टांकसाळ सुरू असती आणि तींत मोहोर पाडण्यांत येत असती तर ह्या नाण्यांतील सोन्याचें वजन आणि सॉव्हरिनमधील ११३ ग्रेन ह्यांचें परस्पर प्रमाण हाच आमच्या हुंडणावळीचा दर झाला असता. सॉव्हरिन हें नाणें युद्धापूर्वी हिंदुस्थानांत कायदेशीर नाणें म्हणून प्रचलित असलें तरी सोनें देऊन तें पाहून घेण्याचा किंवा चलनी नोटांच्या अथवा रुपयांच्या मोबदला तें सरकारकडून बिन-हरकत व बिनशर्त मिळण्याचा लोकांस हक्क नसून रुपया हेंच ह्या देशाचें प्रमुख कायदेशीर चलन होतें. चांदीचा रुपया हा जणुं काय एक सोन्याचाच तुकडा आहे असें कल्पून त्याची किंमत सुमारें ७$\frac{1}{2}$ ग्रेन वजनाच्या सोन्याइतकी आहे असें सरकारनें कायद्यानें ठरवून टाकलें होतें. हें वजन सॉव्हरिनमधल्या ११३ ग्रेन सोन्याच्या $\frac{1}{15}$ इतकें असल्यामुळें १ सॉव्हरिन=१५ रुपये किंवा १ रुपया=१६ पेन्स हा परराष्ट्रीय हुंडणावळीचा आमचा दर होता. इतर राष्ट्रांप्रमाणें हिंदुस्थानांतही चलनविषयक कायद्यांत हुंडणावळीचा निर्देश नसतो. प्रमुख कायदेशीर नाण्यांत किती सोनें असलें पाहिजे एवढेंच काय तें तो कायदा सांगत असतो. तेव्हां सध्यां हिंदी जनतेपुढें, रुपयाची किंमत १६ पेन्स का १८ पेन्स किंमतीच्या सोन्याइतकी असावी म्हणजे खरोखर चांदीच्या रुपयांत किती वजनाचें सोनें असल्याची कल्पना करावी हाच काय तो प्रश्न आहे.

कल्पनाच करावयाची तर रुपयांत असलेल्या १६५ ग्रेन शुद्ध चांदीची किंमत १६ किंवा १८ पेन्स किंमतीच्या सोन्याइतकी नसून ती १२ अथवा २४ पेन्स मूल्याच्या सोन्याइतकी आहे असें कां समजूं नये? शंका बरोबर आहे; आणि तिचें निरसन करतांना अर्थशास्त्राच्या एका महत्त्वाच्या सिद्धान्ताशीं वाचकांचा परिचय करून देतां येण्यासारखा आहे. प्रथम, २४ पेन्स सोन्याच्या रुपयाची नुसती कल्पना करण्याचें कारण नाहीं; तो आज हिंदुस्थानचा चलनविषयक कायदाच आहे. आणि असें असून सरकार तो बदलूं पहात आहे. ह्यावरूनच कल्पना आणि वस्तुस्थिति ह्यांचा मेळ घालणें आवश्यक असतें ही गोष्ट सिद्ध होईल. रुपयाची किंमत २४ पेन्स आहे म्हणजे रुपयांत ११$\frac{1}{3}$ ग्रेन वजनाचें सोनें आहे ह्या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्यांत सरकारनें हिंदुस्थानचा पुष्कळ पैसा नासला असतांही त्यास यश आलें नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. रुपया ही एक वास्तविक रीतीनें चांदीच्या तुकड्यावर छापलेली चलनी नोटच आहे. चलनी नोटांची खुद्द आंगची किंमत कागदाच्या चिटोऱ्याइतकीच असते आणि त्यांची दर्शनी किंमत त्यांच्या मोबदला सरकारकडून ठराविक किंमत मिळण्याच्या लोकांच्या

खात्रीवर अवलंबून असते. रुपयाची खरी किंमत त्यांतील चांदीच्या किंमती-इतकी असते आणि कायद्यानें त्याची दर्शनी किंमत फाजील वाढवून ठेवली असतां लोकांनीं मागितल्यास ती त्यांस बिनतक्रार देण्याची जबाबदारी सरकारवर येते. आज हिंदी बाजारांत विलायती हुंडीचा दर १ रुपया=१८ पेन्स असा आहे. असें असतां सरकारनें प्रचलित कायद्यांत नमूद केलेल्या २४ पेन्सांच्या दराची अंमल-बजावणी करावयाचें ठरविलें अशी आपण कल्पना करूं. विलायतेस ज्यांस पैसे पाठवावयाचे आहेत असे व्यापारी व कारखानदार आणि सट्टेबाजी करणारे लोक रुपये आणि नोटा यांच्या मोबदला सरकारकडून सोनें किंवा विलायती हुंड्या सदरहू भावानें तावडतोब मागूं लागतील आणि सरकारास येथील किंवा लंडनमधील आपल्या शिल्केंतून स्वतःचें नुकसान करून सोनें द्यावें लागेल. २४ पेन्सच्या दरानें १० रुपयांस १ सॉव्हरिन मिळाला पाहिजे आणि सुमारें १६ रुपयांस १ तोळा असा सोन्याचा भाव झाला पाहिजे. इतकी स्वस्ताई घडून येण्यास सरकारनें लोकांस पुष्कळ सोनें विकून त्याचा पुरवठा वाढविला पाहिजे व चलनाचा पुरवठा कमी केला पाहिजे. देशांत खेळणाऱ्या चलनाचें परिमाण आणि पदार्थांचा बाजार-भाव यांचा निकट संबंध असतो आणि ह्यांपैकीं एकांत वाढ झाली असतां दुसऱ्याची वाढ होते व एकाची कमतरता झाली असतां दुसराही कमी होतो असा अर्थशास्त्राचा अनुभवसिद्ध नियम आहे.

सरकारनें रुपये, नोटा घेऊन सोनें दिलें असतां लोकांच्या जवळचें चलन कमी होऊन पदार्थांचे भाव उतरतात. ह्याचप्रमाणें, पदार्थांचे भाव उतरावयाचे असल्यास देशांत खेळणारें चलन कमी करावें लागतें. सध्यांचा १८ पेन्सांचा दर सरकारनें चलन कमी करून व देशांत स्वस्ताई करून खालीं येऊं दिला नाहीं अशी जी सरकारी धोरणावर टीका होत आहे, तिचें रहस्य यावरून तेव्हांच लक्षांत येईल. १८ पेन्सांचा हुंडणावळीचा दर कायम करण्याचा सर बेसिल् ब्लॅकेट ह्यांचा कृत-निश्चय आहे. परंतु कपास आणि ताग ह्या पिकांचा उठाव होण्यास अजून प्रारंभ झालेला नसून शेतकऱ्यांस त्यांच्या मोबदला द्यावयास लागणाऱ्या पैशाची व्यापाऱ्यां-कडून मागणी होण्यास सुरवात झालेली नाहीं. ह्यामुळें व्यापारी व्यवहारांच्या मानानें देशांत जास्त चलन खेळत आहे त्या खेळणाऱ्या चलनाचें परिमाण कमी केलें नाहीं तर हुंडणावळीचा दर उतरणार आणि आपला १८ पेन्सांचा दर कायम करण्याचा बेत ढांसळणार हें जाणून सरकारनें चलन कमी करण्याचा सपाटा चालविला आहे. सरकारच्या हुंडणावळविषयक धोरणावर टीका करणारांचा त्यांस असा सवाल आहे कीं, तुमच्या मतें १८ पेन्सांचा दर हा हिंदी व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांच्या परिस्थित्यनुरूप अतएव ‘स्वाभाविक’ असा आहे, तर कृत्रिम रीतीनें चलनाचें परिमाण मर्यादित करून त्याचें आसन स्थिरावण्याची तुमची ही धडपड कां चालली आहे? हुंडणावळीचा दर बाजारांतील मागणी-पुरवठ्यांप्रमाणें ज्यास्त कमी होऊं

दिल्यास १८ पेन्सांचें प्रमाण सरळ आहे कीं १६ पेन्सांचें सरळ आहे हें सिद्ध झालें असतें. पण हिल्टन यंग कमिशनचा रिपोर्ट लिहिला जात असतांनाच सरकारनें हुंडणावळीच्या दराचे बाबतींत तटस्थवृत्ति स्वीकारावयाचें सोडून देऊन कृत्रिम रीतीनें तो १८ पेन्स राहील अशी व्यवस्था केली आणि कमिशननें मुकाट्यानें तो दर सिद्ध गोष्ट म्हणून स्वीकारला. चलनाचे बाबतींत लोकांची गैरसोय करून सरकारला हुंडणावळीचा दर १९–२० पेन्सांइतकादेखील चढवून ठेवतां आला असता. आपल्या कारवाईनें चलनाचा प्रसार मर्यादित करून हुंडणावळ १८ पेन्सांच्या खुंट्यास डांबून टाकावयाची आणि नंतर तो दर स्वाभाविक आणि योग्य आहे असें म्हणावयाचें ह्या सरकारी धोरणावर प्रतिकूल टीका झाल्यास त्यांत आश्चर्य कसलें? हुंडणावळीचा दर ( म्हणजे मूल्यमापक नाण्यांतील सोन्याचें वजन ) युद्धासारख्या आपत्ति येऊन गेल्यानंतर आणि त्यांच्या योगानें उत्पन्न झालेली खळबळ शांत झाल्यानंतर पुन्हा स्थिर करावयाचा झाल्यास शक्य तर त्यास मूळपदावर आणून ठेवणेंच योग्य होय. ग्रेट ब्रिटनमध्यें सरकारनें हेंच धोरण स्वीकारून आपल्या चलन-पद्धतीची घडी पूर्वीप्रमाणें बसविली आहे. १८९९ पासून १९१७ पर्यंत रुपयाचें सुवर्णमूल्य ७$\frac{1}{4}$ ग्रेन सोन्याइतकें होतें आणि तें स्थिर राहिलें होतें. संधि येतांच त्याचीच पुन्हा स्थापना करणें उचित असतां सरकारनें तसें केलें नाहीं. हिंदी व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांच्या अंगवळणीं पडलेलें हें मूल्य पुन्हा स्वीकारून १६ पेन्सांची हुंडणावळ पूर्वीप्रमाणें प्रस्थापित करावी ह्या लोकांच्या न्याय्य मागणीविरुद्ध सरकारच्या बाजूनें खात्री पटण्यासारखें त्यांच्या धोरणाचें समर्थन पुढें आलेलें नाहीं.

वर उपस्थित केलेल्या शंकेचें पूर्ण समाधान होण्यास तिसऱ्या एका अर्थ-शास्त्रीय सिद्धान्ताची वाचकांस ओळख करून देणें जरूर आहे. राष्ट्रांतर्गत चलनाचें परिमाण आणि पदार्थांचे सर्वसाधारण भाव ह्यांचा काय संबंध असतो हें आतांच दर्शविलें असून हुंडणावळीचें खरें स्वरूप पूर्वीच स्पष्ट करून दाखविलें आहे. परंतु ह्या दोन सिद्धान्तांच्या विवेचनानें, निरनिराळ्या राष्ट्रांतील चलनविषयक आणि पदार्थ-मूल्य-विषयक परिस्थिति व त्यांच्या दरम्यान होणाऱ्या हुंडणावळीचा दर ह्यांचा परस्पर संबंध काय असतो ह्यासंबंधीं विवेचन झाल्यावांचून प्रस्तुत लेखाचें कार्य सिद्ध व्हावयाचें नाहीं.

शांततेच्या आणि सुस्थितीच्या काळांत, महायुद्धापूर्वी ( अपवाद सोडून दिले असतां ) प्रत्येक देशांत सोन्याच्या नाण्याच्या सरकारी टांकसाळी चालू असून सुवर्णा-ची आयातनिर्गत अप्रतिबद्ध असे आणि कागदी चलनाचें परिमाण मर्यादित असल्यानें त्याचें सोन्याच्या नाण्यांत सहज रूपांतर होत असे. सर्व प्रमुख देशांत हीच व्यवस्था अमलांत असल्याकारणानें आणि त्यांच्या कायदेशीर नाण्यांचे परस्परसंबंध सर्वश्रुत आणि स्थिर असल्यानें अंतर्राष्ट्रीय हुंडणावळीचे दर ठराविक मर्यादेच्या बाहेर जात नसत. प्रतिबंधनकारक आणि संरक्षक जकाती हिशेबांत घेऊनही असें म्हणण्यास

हरकत नाहीं कीं, वाहतुकीचा खर्च वगळला असतां पदार्थांचे भाव सर्व देशांत सामान्यतः सारखेच असत. एखाद्या देशांत विशिष्ट कारणामुळें विशेष स्वस्ताई झाल्यास तेथील मालास जास्त मागणी येऊन त्याची मोठ्या प्रमाणावर निर्गत झालीच पाहिजे. आणि त्याच कारणास्तव आयात कमी होऊन इतर राष्ट्रांस सदरहू देशाच्या लोकांपासून खरेदी केलेल्या मालाबद्दल सोनें पाठविणें भाग पडलें पाहिजे. जास्त सोनें देशांत आलें, कीं त्याचें चलनांत रूपांतर होऊन पैशाचा पुरवठा वाढणें अपरिहार्य आहे आणि पैसा बाजारांत वाढत्या प्रमाणावर खेळूं लागला, कीं स्वस्ताई नाहींशी होऊन पदार्थांचे भाव पूर्वस्थितीस येऊन पोहोंचले पाहिजेत. म्हणजे निरनिराळ्या देशांतील पदार्थांचे भाव किंवा धारण एका पातळींत राखणारी हुंडणावळ ही सोन्याची सांखळी किंवा पाण्याची नळी आहे असें झालें. परंतु हें सर्व शांततेच्या आणि सुस्थितीच्या काळास अनुलक्षून आहे. इतर वेळीं जेव्हां कागदी चलन बेसुमार खेळूं लागून त्याचें सोन्यांत रूपांतर होऊं शकत नाहीं, टांकसाळींत सोन्याचीं नाणीं पाडणें बंद होतें आणि सोन्या-चांदीच्या आयात-निर्गतीवर सरकारचें नियंत्रण येऊन पडतें तेव्हां वरील स्थितिस्थापक व्यवहार थांबतात आणि निरनिराळ्या देशांत कमी-अधिक प्रतीची विषम महर्घता होते, आणि हुंडणावळीचे दर कायद्याचीं बंधनें तोडून उच्छृंखल बनतात. असल्या परिस्थितींत हुंडणावळीचे दर कसे बदलतात ? त्यांच्या परिवर्तनासंबंधानें अर्थशास्त्राचा काय सिद्धान्त आहे ?

पदार्थांचे भाव स्थिर ठेवणारी वर वर्णिलेली सोन्याची नळी तात्पुरती निकामी झाल्यामुळें कोणत्याही दोन देशांमधील हुंडणावळीचा दर त्या देशांतील कायदेशीर नाण्यांतील सोन्याच्या तुलनात्मक वजनावर अवलंबून न राहतां, त्यांतील महर्घतेच्या कमीअधिक मानानें, म्हणजे महर्घतेच्या परस्पर प्रमाणानें ठरतो. इंग्लंडमध्यें, १९१४च्या मानानें दुप्पट, आणि फ्रान्समध्यें चौपट महर्घता झाली आहे, असें आपण समजलें असतां ब्रिटिशचलनाचें मूल्यमापनाचें सामर्थ्य निम्में आणि फ्रेंचचलनाचें एक-चतुर्थांश झालें असें होईल. महर्घता होणें म्हणजे चलनाचें पदार्थ विकत घेण्याचें सामर्थ्य कमी होणें होय. वरील उदाहरणांत, ब्रिटिशचलनाच्या मानानें फ्रेंचचलन अधिक दुबळें झाल्यानें एक सॉव्हरिन विकत घेण्यास पूर्वीपेक्षां तिप्पट फ्रँक दिले पाहिजेत. म्हणजे फ्रान्स आणि इंग्लंड ह्यांच्या दरम्यानची हुंडणावळ त्या प्रमाणांत फ्रान्सला अधिक प्रतिकूल होणार हें उघड आहे. युरोपियन राष्ट्रांप्रमाणें हिंदुस्थानांतील पदार्थांचे भाव कधींही कडकले नव्हते, तरी बॅबिंग्टन स्मिथ कमिटीच्या अपेक्षेप्रमाणें ते उतरले नाहींत; आणि ह्या कारणानें एक सॉव्हरिन=१० रुपये हा त्या कमिटीच्या शिफारशीस अनुसरून कायद्यानें सुरू केलेला हुंडणावळीचा दर येथें टिकूं शकला नाहीं. आतां ज्याप्रमाणें देशांतील पदार्थांच्या किंमतीच्या मानानें त्यांतील चलनाचें इतर देशांतील चलन विकत घेण्याचें सामर्थ्य ( हुंडणावळीचा दर ) वरखालीं होतें त्याप्रमाणें हुंडणावळीच्या दरांत कृत्रिम रीतीनें चढउतार केल्यास त्याचा

परिणाम पदार्थांचे भाव कमी-अधिक करण्यांत झालाच पाहिजे. हुंडणावळीचा दर हें, आपल्या देशांतील मालास परदेशांत जें त्यांमधील चलनाच्या स्वरूपांत मूल्य मिळतें तें मापण्याचें साधन आहे. हिंदी चहाच्या एका पेटीला लंडनमध्यें एक सॉव्हरिन किंमत आली असतां त्या सॉव्हरिनचे येथें किती रुपये मिळतील, ह्यावर त्या सवद्याचें महत्त्व अवलंबून आहे. सरकारनें १६ पेन्सांचा रुपया ठरविल्यास येथील व्यापाऱ्यांस चहाच्या पेटीबद्दल १५ रुपये मिळतील; रुपयाचें मूल्य १८ पेन्स केल्यास $\frac{२४०}{१८}=१३\frac{१}{३}$ इतके रुपये मिळतील. विवक्षित मर्यादेपर्यंत सरकारला हुंडणावळीचा दर असा कृत्रिम रीतीनें कमी-जास्त करतां येतो. खेळतें चलन आणि पदार्थांचे भाव कमी केल्यास हुंडणावळ चढते आणि तीं वाढविल्यास हुंडणावळीचा दर उतरतो. सध्यां हुंडणावळीचा दर खालीं सरकत आहे म्हणून सरकार देशांतलें खेळतें चलन काढून घेत आहे आणि त्या उपायानें १८ पेन्सांचा दर स्थिर ठेवण्याचा यत्न करीत आहे. हिंदुस्थानांतून बाहेर जाणारा माल जेथें खपतो त्या देशांतील भाव उतरत आहेत यामुळें स्वाभाविक रीतीनें त्यांच्याबद्दल हिंदी उत्पादकांस कमी मूल्य मिळत आहेच. अशांत हुंडणावळीचा दर आपोआप कमी झाला असतां, त्याच्या मार्गांत व्यत्यय उत्पन्न करून सरकार तो १८ पेन्स ठेवूं पहात आहे. १८ पेन्सांचा दर बंगाल-च्या फाळणीप्रमाणें ब्रह्मलिखित आहे असें ब्लॅकेटसाहेब म्हणत आहेत आणि त्याच्या उलट, हा दर हिंदी शेतकऱ्यांस आणि व्यापाऱ्यांस अत्यंत नुकसानीचा अतएव गर्हणीय आहे असें त्यांचे टीकाकार प्रतिपादीत आहेत. हुंडणावळीचा दर आणि पदार्थांचे भाव ह्यांची स्वाभाविक रीतीनें घडी बसलेली नसते तेव्हां सरकारनें ह्या बाबतींत ढवळाढवळ केल्यास देशांतील कांहीं लोकांचा फायदा आणि दुसऱ्यांचें नुकसान होत असतें. ज्यांस परदेशी माल खरेदी करावयाचा आहे किंवा जे प्रत्यक्ष धनोत्पादक नाहींत अशा वर्गांस १८ पेन्सांचा दर अनुकूल आहे; पण ज्यांस अर्थोत्पादन करून त्याच्या मोबदला कमाई करावयाची असते त्यांस म्हणजे शेतकरीवर्गास आणि देशी धंदे चालविणाऱ्या लोकांना तो नुकसानीचा आहे. १६–१८ पेन्सांचा जो वाद सध्यां चालू आहे त्याचें रहस्य ह्या नफानुकसानींत आहे. १८ पेन्सांचा दर खरोखरच स्थिरावला आहे काय, आणि त्याच्या योगानें बहुसंख्याक हिंदी प्रजेचें हित होणार आहे कीं अहित होणार आहे हाच मुख्य विचार करावयाचा प्रश्न आहे.

# इंडियन करन्सी लीग

## संस्थेचे उद्देश.

### उद्देश

हिंदुस्तानच्या हितसंबंधास पोषक होईल अशी चलनपद्धति अस्तित्वांत यावी ह्या हेतूनें चलनविषयक प्रश्नांचा पद्धतशीरपणें व निःपक्षपात बुद्धीनें अभ्यास करण्यास लोकांस उत्तेजन देऊन त्यांस जरूर त्या सोयी उपलब्ध करून देणें.

### तात्कालिक उद्दिष्ट

करन्सी कमिशननें १ शिलिंग ६ पेन्स ह्या दरावर हुंडणावळ स्थिर करावी अशी जी बहुमतानें सूचना केली आहे ती नुकसान-कारक असून, सर पुरुषोत्तमदास यांनीं आपल्या भिन्नमतप्रदर्शक पत्रिकेंत १ शिलिंग ४ पेन्स या दराबद्दल जी शिफारस केली आहे ती हिंदुस्तानास हितावह आहे, हें लोकांस समजून सांगणें.

'इंडियन करन्सी लीग-महाराष्ट्र शाखा', ह्या संस्थेमार्फत हिंदी चलनविषयक प्रश्नांसंबंधीं निरनिराळीं पत्रकें प्रसिद्ध होतात. राष्ट्रीय महत्त्वाच्या ह्या प्रश्नांचा सर्वत्र अभ्यास होऊन त्यासंबंधीं यथार्थ ज्ञान महाराष्ट्रांतील बहुजन समाजांत पसरणें अत्यंत अवश्य आहे. म्हणून ज्यांस हिंदी चलनपद्धतीची माहिति करून घेण्याची इच्छा असेल त्यांस हीं पत्रकें वाटण्याची व्यवस्था केलेली आहे. तरी गरजूंनीं खालील पत्त्यांवर एक आण्याचें तिकीट पाठवून मागणी केल्यास त्यांस तीं पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.

**प्रो० दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम्. ए.**

फर्ग्युसन कॉलेज,

**पुणें** (**Deccan Gymkhana.**)

किंवा

**सेक्रेटरी, इंडियन करन्सी लीग-महाराष्ट्र शाखा,**

**गायकवाडवाडा, नारायण पेठ, पुणें.**

इंडियन करन्सी लीग–महाराष्ट्रशाखा

## पत्रक नं. ३

# आठराविरुद्ध

# सोळा पेन्सांचा लढा

लेखक

प्रो० वामन गोविंद काळे, एम्. ए.



अनंत सखाराम गोखले, 'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें यांनीं छापिलें
तें दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम् ए. सेक्रेटरी, इंडियन करन्सी
लीग–महाराष्ट्रशाखा, यांनीं पुणें, पेठ नारायण,
गायकवाडवाडा येथें प्रसिद्ध केलें.

## आभार

प्रस्तुत लेख 'रत्नाकर' मासिकाच्या डिसेंबर १९२६ च्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. तो स्वतंत्रपणें प्रसिद्ध करण्याची आम्हांस परवानगी दिल्याबद्दल आम्ही मासिकाचे चालक रा० अ. स. गोखले यांचे अत्यंत ऋणी आहोंत.

# आठराविरुद्ध सोळा पेन्सांचा लढा

## पूर्वी प्रसिद्ध झालेलीं पत्रकें

पत्रक १ लें

# करन्सी कमिशनच्या शिफारसी

पत्रक २ रें

# हुंडणावळीच्या दरासंबंधीं वाद

# अठराविरुद्ध सोळा पेन्सांचा लढा

हुंडणावळीचा दर १८ पेन्स असावा किंवा १६ पेन्स असावा ह्याबद्दल सध्यां चालू असलेल्या खडाजंगीचें रहस्य समजण्यास खालील मुद्द्याच्या गोष्टी ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे. (१) हुंडणावळीचा दर म्हणजे वस्तुतः एका देशांतील चलन देऊन परदेशांतील चलन विकत घेण्याचा भाव होय. परदेशांत आपलें देणें द्यावयाचें असल्यास किंवा त्यांचेकडून येणें घ्यावयाचें असल्यास ज्या पैशाच्या परस्पर प्रमाणांत हा व्यवहार घडून येतो तें प्रमाण म्हणजेच हुंडणावळीचा दर. (२) राष्ट्राराष्ट्रांतील देण्याघेण्याची हुंड्यांच्या विनिमयाच्या मार्गानें वजावाट होऊन राहिलेली बाकी सोन्याच्या देवघेवीनें फेडली जात असल्यामुळें आणि सुवर्णचलनपद्धतीच्या सार्वत्रिक अस्तित्वामुळें सोन्यास सर्वत्र मागणी असल्याकारणानें सोन्याच्या किंमतीच्या मर्यादेबाहेर हुंडणावळीचा दर सहसा जाऊं शकत नाहीं. सोन्याच्या आयातनिर्गतीचा पायबंद जेव्हां सैल होतो तेव्हांच हुंडणावळीचा दर गडबड करूं शकतो आणि सुवर्णमूल्याच्या मर्यादेचें अतिक्रमण त्यास करतां येतें. अर्थात् निरनिराळ्या राष्ट्रांत कायदेशीर मानलेल्या चलनांतील सोन्याच्या किंमतीचें म्हणजे वजनाचें जें परस्पर प्रमाण तोच त्यांच्या दरम्यानच्या हुंडणावळीचा दर असें सामान्यतः म्हणण्यास हरकत नाहीं. (३) प्रत्येक देशांतील चलनपद्धतीचा पाया म्हणजे कायदेशीर रीतीनें प्रमाणबद्ध केलेलें मूल्यमापनात्मक विवक्षित वजनाचें सोनें होय. हें सोनें किती वजनाचें असावें ह्याविषयीं कांहीं नियम नाहीं. निरनिराळ्या देशांत भिन्नभिन्न वजनें मूल्यमापनप्रमाण म्हणून निश्चित केलेलीं आहेत ह्या रीतीनें ठरलेल्या अमुक गुंजा किंवा ग्रेन वजनाच्या सोन्याच्या मूल्यानें इतर सर्व पदार्थांचें मूल्य मापलें जातें. सोळा पेन्सांचा हुंडणावळीचा दर म्हणजे ७·५३३४ इतक्या ग्रेन वजनाचें सोनें आणि अठरा पेन्सांचा दर म्हणजे ८·४७५१ ग्रेन वजनाचें सोनें, हिंदी चलनपद्धतींत मूल्यमापनप्रमाण मानणें होय. ह्या दोहोंपैकीं कोणतें वजन कायद्यानें निश्चित करावें हा प्रस्तुत वादाचा मुख्य विषय आहे. (४) सोन्याच्या ठराविक वजनाच्या कायदेशीर नाण्याबरोबरच चांदीचीं नाणीं आणि कागदी चलन सरकार प्रचलित करीत असतें. किंवा सोन्याचें नाणें मुळींच न काढतां ह्या दुसऱ्या तऱ्हेच्या चलनानेंच काम भागविलें जातें. तथापि दोन्ही पक्षीं प्रमाणभूत सोन्याच्या वजनाची किंमत आणि चांदी व कागद ह्यांचें चलन ह्यांच्या दरम्यानचा मूल्यसंबंध कायद्यानें निश्चित केलेला असतो. चांदीचा एक रुपया किंवा एक रुपया किंमतीची कागदी नोट ह्यांचें मूल्य ७½ ग्रेन सोन्याच्या मूल्याइतकें आहे, ह्याचा अर्थ सदरहु संबंध लक्ष्यांत आणल्यास तेव्हांच समजेल. (५) पदार्थांची देवघेव प्रत्येक देशांत प्रचलित असलेल्या निरनिराळ्या जातींच्या पैशाच्या द्वारें होत असल्यानें खेळत्या चलनाचें परिमाण आणि त्याच्या साहाय्यानें होणारा विनिमय ह्यांचा अर्थातच निकट

संबंध असून त्यानेंच सरासरीचे भाव किंवा किंमती ठरत असतात. पैशाचें परिमाण कायम असून देवघेव कमी झाल्यास किंमत किंवा धारण वाढते असा अनुभव दुष्काळांत येतो. सुबत्तेच्या काळीं पैसा तितकाच राहिला किंवा कमी पडला तर स्वस्ताई होणें हें वरील नियमाचेंच उदाहरण आहे. ( ६ ) देशादेशांत व्यापार चालू असतो आणि परस्पर देणें हुंड्यांच्या किंवा सोन्याच्या देवघेवीच्या स्वरूपांत होतें ह्यामुळें त्यांच्या अंतर्गत सरासरीच्या धारणी विशिष्ट रीतीनें संबद्ध असून त्यांतील फेरफाराचा परिणाम एकमेकांवर झाल्यावांचून रहात नाहीं. हुंड्या आणि सोन्याची राष्ट्राराष्ट्रांतील ने-आण ह्यांस असलेली किंमत ही राष्ट्रांतील सरासरीच्या किंमतीस जोडणारा दुवा आहे. ह्या ठिकाणीं तराजूचा दृष्टान्त सूचक होण्यासारखा आहे. तराजू हातीं धरण्याची दोरी किंवा सांखळी हा हुंडणावळीचा दर आणि तराजूचीं दोन पारडीं हीं दोन राष्ट्रांतील सरासरीचे किंमतीचे दर असें आपण समजूं. तराजूचें एक पारडें जड होऊन खालीं गेल्यास दुसरें वर येतें आणि धरावयाची दोरी जड पारड्याच्या बाजूस झुकते. म्हणजे देशादेशांतले पदार्थांचे भाव बदलल्यास त्याचा परिणाम हुंडणावळीच्या दरावर होतो. त्याप्रमाणेंच दुकानदारानें दोरीस हाताचा झटका दिला असतां जिन्नस आंत असलेलें पारडें वजनाच्या पारड्याच्या मानानें खालीं येतें हा अनुभव गिन्हाइकांस रोजचाच आहे. ह्याचा अर्थ असा कीं, हुंडणावळीचा दर कमीजास्त केल्यास त्याचा परिणाम पदार्थांच्या किंमतींत फेरबदल होण्यांत झालेला दिसून येतो.

वरील तत्वें अथवा नियम लक्षांत ठेवून सोळा-अठरा पेन्सांच्या वादाचें रहस्य समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हिल्टन यंग कमिशनच्या शिफारशींपैकीं पहिली शिफारस अशी आहे कीं, सुवर्णपरिवर्तन मूल्यमापनपद्धति सध्यां हिंदुस्थानांत प्रचलित आहे तिच्या ऐवजीं सुवर्णखंड मूल्यमापनपद्धति प्रस्थापित करण्यांत यावी. ह्या दोन्ही पद्धतींत पदार्थांचें मूल्यमापन सुवर्णाच्या विवक्षित वजनाच्या मूल्यानें मापलें जावयाचें असलें तरी पहिलींमध्यें सोन्याचें नाणें पाडून देण्याची सरकारावर जबाबदारी नसून ठराविक कायदेशीर दरानें सोन्याच्या हुंड्या परराष्ट्रांवर देण्यास मात्र तें सरकार बांधलेलें आहे. दुसऱ्या पद्धतींतही सोन्याचें नाणें नाहीं; परंतु ठराविक दरानें सुवर्णखंड म्हणजे सोन्याच्या चिपा लोकांस विकण्याची व त्यांचे-कडून विकत घेण्याची जबाबदारी सरकारावर टाकण्यांत यावयाची आहे. वास्तविक पाहिलें तर सुवर्णमूल्यमापनपद्धति पूर्ण स्वरूपांत प्रस्थापित करावयाची म्हटल्यास सरकारनें आपल्या टांकसाळींत सोन्याचें नाणें लोकांस पाडून दिलें पाहिजे आणि विशेषतः हिंदुस्थानासारख्या मागसलेल्या व परकी अमलाखालीं असलेल्या देशांत चलनपद्धतिवर लोकांचा विश्वास बसून ती समाधानकारक रीतीनें अमलांत येण्यास सर्वांगपूर्ण अशीच सुवर्णचलनपद्धति सरकारनें सुरू केली पाहिजे. ह्या अर्थाची मागणी आज कित्येक वर्षें हिंदी जनतेचे प्रतिनिधि करीत आले असून अनेक कारणांमी

ती अमान्यच होत आली आहे. हिल्टन यंग कमिशनच्या शिफारशींस मूर्तस्वरूप देण्याचा विचार चालला असतां लोकांच्या ह्या मागणीचा जोरानें पुरस्कार होणें अगत्याचें आहे. कमिशननें सुचविलेली घेडगुजरी पद्धति एकदां अंमलांत आली, कीं तिचें उच्चाटन होणें दुर्घट होऊन बसेल. एवढ्याकरितां १६-१८ पेन्सांच्या वादांत ही महत्त्वाची गोष्ट डोळ्यांआड होण्याची भीति आहे ती दूर होण्यासाठीं सुवर्ण-चलनाचा प्रश्न धसास लावणें अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रांत ह्या बाबतींत पूर्ण एकवाक्यता आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. तशा प्रकारचें ऐकमत्य सर्व देशभर झालें पाहिजे. सेक्रेटरी ऑफ स्टेट व हिंदुस्थानसरकार यांनीं हिल्टन यंग कमिशनच्या सर्व प्रमुख शिफारशी आपण स्वीकारल्याचें जाहीर केल्यामुळें सुवर्ण-मूल्यमापनपद्धतीच्या प्रश्नास विशेष महत्त्व आलें आहे. हिंदी लोकमत आणि आपला निश्चय ह्यांमध्यें तात्त्विकदृष्ट्या मुळींच तफावत नाहीं व मतभेद आहे तो फक्त तपशिलाचा आहे असें सरकार म्हणत आहे; आणि विशेष मौजेची गोष्ट ही आहे कीं, हिंदी लोकांपैकीं कांहींजणांस सरकारचें म्हणणें पटल्यासारखें दिसत आहे! तरी सुवर्णचलनाच्या बाबतींत सरकारशीं भांडावयाचें असें एकमतानें ठरल्यावर देखील हुंडणावळीचा दर १६ पेन्स असावा कीं १८ असावा हा वाद शिल्लक राहतोच त्याचें काय करावयाचें? सर बेसिल ब्लॅकेट ह्यांच्या मतें ह्या वादांत कांहीं अर्थ नाहीं. एकतर, ती किरकोळ बाब आहे व दुसरें, आज दीड वर्षावर १८ पेन्सांचा दर स्थिर होऊन राहिला असतां त्यांत ढवळाढवळ करणें वेडेपणाचें नाहीं काय? सुवर्णचलन आम्हांस पाहिजे; तें मिळेपर्यंत हुंडणावळीसारख्या दुय्यम दर्जाच्या बाबीकडे पाहण्याचें प्रयोजन नाहीं असें म्हणणारे सरकारचे टीकाकार आणि हिंदुस्थानास सुवर्ण-चलनाची आवश्यकता नाहीं असें प्रतिपादणारे ब्लॅकेटसाहेब ह्यांच्यामध्यें होणारें मतैक्य मोठें गंमतीचें आहे. सुवर्णमूल्यमापनपद्धतीच्या निस्सीम पुरस्कर्त्यांच्यापुढेंही असा प्रश्न आला आहे कीं, लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत १८ पेन्सांचा दर मुक्रर करणारें बिल यावयाचें आहे, त्याची वाट काय लावावयाची? "१६-१८ पेन्स आम्ही कांहीं जाणत नाहीं; आम्हांस सुवर्णचलन द्या" असें लोकप्रतिनिधींनीं म्हणावयाचें का १६ पेन्सांचा दर योग्य दिसत आहे, त्याचा कायद्यांत अंतर्भाव करून घेऊन त्याबरोबरच सुवर्णचलनासाठीं भांडावयाचें? १८ पेन्स एकदां पदरांत पाडून घ्यावयाचे आणि मग सुवर्णचलनाच्या प्रश्नाचा जरूर पडल्यास लोकांस कीस काढीत बसवावयाचें असा सरकारचा बेत दिसतो. तो साधूं द्यावयाचा नाहीं असा लोकप्रतिनिधींनीं निश्चय केला पाहिजे. १८ पेन्स कबूल केले असतां लोकांस सरकार सुवर्णचलन देतें असें थोडेंच आहे! शिवाय, येथें एक महत्त्वाची गोष्ट लक्ष्यांत ठेवली पाहिजे ती ही कीं, सुवर्णचलनपद्धति मागतांना सुवर्णचलनाचें रुपयाशीं प्रमाण काय असावें हें ठरविलेंच पाहिजे. हिंदी सुवर्णचलनांत ७·५ ग्रेन कीं ८·४ ग्रेन सोनें असावें हें मुक्रर झाल्यावांचून पुढें पाऊल पडत नाहीं; म्हणजे हुंडणावळी-

चा दर १६ पेन्स असावा कीं १८ पेन्स असावा हा वाद आलाच ! अगोदर घर बांधावयाचें ठरल्यावर मग तें एकमजली का दुमजली असावें ह्याची घासाघीस घालणें योग्य आहे हा मुद्दा सरळ वाटतो. परंतु दुमजली घराचा द्वेष असणारावर एकमजली घराचा निश्चय तरी आगाऊ कां लादण्यांत यावा ?

पण १६ पेन्सांचा आग्रह कां ? १८ पेन्सांच्या दरानें काय बिघडतें ? १६ पेन्सांचा दर पाहिजे ह्यास प्रमुख कारण हें आहे कीं, १८९९ सालीं १५ रुपये=१ सॉव्हरिन हा दर ठरून रुपयाचें मूल्य किती ग्रेन सोन्याच्या किंमतीइतकें असावें हें कायद्यानें ठाम झालें आणि युद्धकालीन धामधुमीपर्यंत तो दर कायम राहिला असें असतां कायदेशीर मूल्यमापनाचें प्रमाण विलक्षण आपत्ति आल्यावांचून बदलणें हितकर नाहीं. युद्धकालीं सुद्धां सरकारचें धोरण विशिष्ट प्रकारचें असतें तर १६ पेन्सांचा दर अबाधित राखतां आला असता हें कांहीं तज्ज्ञांचें मत क्षणभर बाजूस ठेविलें तरी संधि प्राप्त झाली असतां, अडचणीच्या प्रसंगीं नाइलाजानें पत्करलेलें मूल्यप्रमाण सोडून देऊन कित्येक वर्षेपर्यंत सारखें यशस्वी झालेलें प्रमाण शांततेच्या काळीं पुन्हा प्रस्थापित करणें हाच शहाणपणाचा मार्ग आहे. परिस्थिति सर्वस्वीं बदलल्यामुळें जुना अनुभवसिद्ध हुंडणावळीचा दर अमलांत आणणें अशक्य झाल्यास काय करावें ? असा कोणी प्रश्न करील. बॅबिंग्टन स्मिथ कमिटीच्या सल्ल्यानें सरकारनें १९२० सालीं हुंडणावळीचा दर १० रुपये=१ सॉव्हरिन म्हणजे १ रुपयास २४ पेन्स अर्थात् १ रुपयाची किंमत ११·३ ग्रेन वजनाच्या सोन्याइतकी असें ठरविलें. तेव्हां हिंदुस्थानाबाहेरच्या सरासरीच्या किंमती आणि येथील किंमती ह्यांची सांगड सदरहू दराच्या साहाय्यानें स्थिर राहीना. म्हणून सरकारनें हिंदुस्थानांत प्रचलित असलेलें चलन लोकांस लंडनवर हुंड्या स्वस्त दरानें विकून कमी करण्याचा यत्न केला. चलनाचें प्रमाण ह्या युक्तीनें कमी झालें असतें तर देशांत स्वस्ताई होऊन रुपयाचा नवीन चढीचा भाव यशस्वी झाला असता. परंतु सरकारचा हा चलन शोषण्याचा यत्न टिटवीनें समुद्र आटवण्याच्या केलेल्या प्रयत्नासारखा अयशस्वी व हास्यास्पद पण नुकसानीचा झाला. सरकारनें हुंडणावळीस पायबंद घालण्याचा नाद सोडून दिल्यावर तो खालीं येतां येतां १५ पेन्सांपर्यंत आला. युद्धाच्या परिणामांचा जोर जसजसा कमी होऊं लागला तसतसे पदार्थांचे भाव हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेर उतरूं लागून सुमारें दोन वर्षांपूर्वी हुंडणावळीचा दर युद्धापूर्वीच्या स्थितीला येऊन पोहोंचला. ही वेळ अशी होती कीं, सरकारनें रुपयाची १६ पेन्स ही किंमत कायम करण्याचा निश्चय करून त्यास अनुसरून आपलें धोरण आंखावयास पाहिजे होतें. परंतु ही संधि वायां घालविण्यांत आली आणि सरकारनें १८ पेन्सांवर रुपया स्थिर करण्याचा निश्चय केला. खुद्द हिल्टन यंग कमिशनचें काम चालू असतांना तरी निदान हिंदुस्थानांत खेळणाऱ्या चलनाचें परिमाण मर्यादित करून आणि पदार्थांचे भाव अप्रत्यक्ष रीतीनें स्वस्त करून हुंडणावळीच्या भावास १८ पेन्सां-

च्या खुंट्यास डांबणें योग्य नव्हतें. परिस्थितीस अनुरूप असा कोणता हुंडणावळीचा दर आहे ह्या प्रश्नाचा विचार करण्याचें काम कमिशनकडे सोंपविलेलें असतांना आणि हिंदुस्थानसरकारचें चलनविषयक धोरण कोणत्या प्रकारचें असावें ह्याविषयींच्या शिफारशींवा कमिशननें विचार चालविला असतांना सरकारनें चलनाच्या प्रसारांत ढवळाढवळ केली एवढेंच नव्हे तर १८ पेन्सांची हुंडणावळ कायम करण्याचा आपला निश्चय देखील प्रगट केला ही गोष्ट आतां प्रसिद्ध झालेली आहे. इंग्लंडमध्यें परिस्थिति प्रतिकूल असतांही ब्रिटिशसरकारनें युद्धाच्या पूर्वींचा आपला हुंडणावळीचा दर कायम केला. सॉव्हरिन व अमेरिकन डॉलर ह्यांचें परस्परप्रमाण १ सॉव्हरिन=४.८६ डॉलर असें पाहिजे तें सॉव्हरिनला दहा टक्के प्रतिकूल होतें. असें असूनही ती संधी उत्तम आहे ह्या विचारानें ब्रिटिश सरकारनें आपला जुना अनुभवसिद्ध हुंडणावळीचा दर प्रस्थापित केला. ह्याच्या उलट, बेल्ज्यममध्यें नुकतीच हुंडणावळ स्थिर करण्यांत आली आहे तिचा दर पूर्वींच्या दराच्या मानानें कितीतरी पटीनें हलका आहे. फ्रान्समध्येंही त्याच रीतीनें फ्रँकचें मूल्य पूर्वींच्या एकषष्ठांशावर आणून ठेवावें लागत आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं, बेल्ज्यम व फ्रान्स ह्या देशांत चलन इतकें बेसुमार वाढून पदार्थांचे भाव असे कडकलेले आहेत कीं, तेथील सरकारांनीं इतकीं वर्षें वाट पाहून शेवटीं आपल्या कायदेशीर पैशाचें मूल्य पूर्वींच्या पाहिरीवर आणून ठेवण्याची आशा सोडून दिली आहे. तेंच, इंग्लंडमध्यें सरकारानें आपलें कर्ज मर्यादित करून लोकांवर जबर कर बसवून आणि चलनाचें परिमाण आटपशीर करून ब्रिटिश पैशाचें मोल पूर्वस्थलाजवळ आणिलें आणि थोडा पल्ला गांठावयाचा राहिला असतां उडी मारून तें स्थान एकदम गांठलें.

ज्याप्रमाणें शेराचें वजन किंवा फुटाचे इंच कमी करणें अयोग्य आहे त्याचप्रमाणें राष्ट्रीय चलनांतले सोन्याचे ग्रेन कमीअधिक करणें अनिष्ट आहे. उद्योगधंदे व व्यापार करणाऱ्या लोकांचा किंबहुना सर्वसामान्य जनतेचा वजनामापावरचा विश्वास ढळतां कामा नये. त्यांत फेरबदल झाल्यास लांड्यालबाड्या करण्यास कित्येकांस वाव मिळून प्रामाणिक लोकांचें नुकसान होतें व व्यापारास आणि उद्योगधंद्यांस सट्टेबाजीचें स्वरूप प्राप्त होतें. जेथें कोणाचा इलाजच चालत नाहीं आणि प्रतिकूल परिस्थितीमुळें बदललेलें मूल्यप्रमाण ताळ्यावर आणतां येणें शक्यच नसतें तेथें बेल्ज्यम् व फ्रान्सप्रमाणें तडजोड करणें प्राप्त होतें. परंतु हिंदुस्थानांत अशी स्थिति नव्हती आणि नाहीं. येथें १६ पेन्सांचें प्रमाण स्थिर करतां आलें असतें आणि येईल. असें असून सरकारनें अदूरदृष्टीनें १८ पेन्सांचा आंपला हेका विनाकारण चालविला आहे. एका रुपयाचें ८·४ ग्रेन वजनाच्या किंवा १८ पेन्स किंमतीच्या सोन्याइतकें मूल्य आहे असें म्हटल्यानें सरकारच्या हुंडीच्या द्वारें सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांस पाठवावयाच्या 'होमचार्जेस'च्या रकमेंत दोन-तीन कोटींची बचत होते ही गोष्ट खरी आहे. तसेंच विलायतेस ज्यांस पैसे पाठवावयाचे असतात अशा

युरोपिअनांचा यांत फायदा आहे यांतही संशय नाहीं. त्याचप्रमाणें, परदेशी माल घेणाऱ्या हिंदी लोकांस कमी रुपये देऊन विलायती जिनसा वापरावयास मिळतात आणि आयात व्यापार करणाऱ्या धंदेवाइकांचा व्यवहार किफायतशीर होतो हे निःसंदेह आहे. याप्रमाणें सरकारी तिजोरीची बचत आणि कांहीं थोड्या लोकांचा एका बाजूनें फायदा होत असतां रयतेचें, देशी उद्योगधंद्यांचें आणि सामान्य जन-समूहाचें दुसऱ्या बाजूनें नुकसान होतें ही महत्त्वाची गोष्ट येथें लक्षांत ठेविली पाहिजे. पायलीचें माप मोठें केलें असतां धान्य खरेदी करणारांची चंगळ होते खरी; पण ते धान्य पिकविणाऱ्यांस चट्टा बसतो त्याची वाट काय? ह्याकरितां हुंडणावळीच्या दराच्या प्रश्नाकडे आपण विवक्षित वर्गांच्या हिताच्या चष्म्यांतून पाहून चालावयाचे नाहीं. नोकरवर्ग, गिरणीकामगार आणि विलायती माल वापरणारे लोक म्हणजे कांहीं हिंदी राष्ट्र नव्हे. हुंडणावळीच्या दराचा बरावाईट परिणाम शेतकऱ्यांसारख्या बहुसंख्याक उत्पादकवर्गावर काय होतो ह्याचा प्रथम आणि मुख्यतः विचार झाला पाहिजे. इकडे झीज सोसूनही स्वदेशी चळवळ चालवावयाची आणि देशी उद्योग-धंद्यांस सरकारशीं भांडून साहाय्य आणि उत्तेजन घ्यावयाचें आणि दुसरीकडे त्या चळवळीची आणि उद्योगधंद्यांची गळचेपी करावयाची ह्यास शहाणपणा कोण म्हणेल? सरकारच्या खर्चात बचत आणि किरकोळ वर्गांना फायदा, बहुसंख्याक धनोत्पादकांच्या उत्पन्नांत खोट येऊनच होणार हें विसरतां कामा नये. हिंदी शेती आणि लोखंड, पोलाद, कोळसा, कागद, कांच, काडयांच्या पेट्या, कापड, साबण, शेतीचीं सुधारलेलीं आउतें वगैरे लहानमोठ्या धंद्यांवर १८ पेन्सांच्या दरानें गदा आली आहे. शिवाय नोकर, मजूर, पांढरपेशे वगैरे वर्गांचें हित तरी शेवटीं शेती व इतर देशी धंदे ह्यांवरच अवलंबून नाहीं काय? यंदांप्रमाणें कपाशीला कमी भाव आल्याबरोबर शेतकऱ्यांच्या धंद्याशीं संलग्न असलेल्या इतर उद्योगांस मंदी आलेली चोहोंकडे आपणांस दिसतच आहे. मंदीमुळें बहुसंख्याक उत्पादक वर्गाची कमाईच कमी झाल्यास गिरण्या व कारखाने ह्यांत मोलानें काम करणारांस नोकरी व पुरेसें वेतन आणि वकील डॉक्टरांस योग्य फी कशी मिळणार? रुपयाचें मूल्य १६चे अठरा पेन्स होतांच सरकार जमीनमहसूल कांहीं कमी करणार नाहीं किंवा लष्करी पगारदारांच्या वेतनांत छाट करणार नाहीं. ह्या फेरबदलानें ऋणकोंचें नुकसान होणार आणि पूर्वीचे करारमदार अन्यायाचे होणार. एवंच अठरा पेन्सांचा दर हिंदी राष्ट्राच्या सर्वसामान्य हिताच्या दृष्टीनें अनिष्ट आहे ह्यांत संशय उरत नाहीं.

१९२४ च्या आक्टोबर महिन्यांत हुंडणावळीचा दर १६ पेन्स झाला. त्याच्या पूर्वी तो १६ पेन्सांच्या खालीं गेला होता आणि पुढें १८ पेन्सांच्याही वर चढूं पहात होता. अशा वेळीं सरकारचें कर्तव्य, २४ पेन्स रुपयांचा कायदा बदलून १६ पेन्सांचा म्हणजे ७·५ ग्रेन सोन्याचा कायदा पूर्वीप्रमाणें करणें जरूर होतें. त्याच्या ऐवजीं सरकारनें हुंडणावळीचा दर, चलनांचा दुष्काळ करून १८ पेन्सांवर

नेला व त्याच्यावर मात्र तो दर वाढूं द्यावयाचा नाहीं असा निश्चय केला. ब्लॅकेट-साहेबांच्या ह्या करामतीची माहिती हिल्टन यंग कमिशनला असतां त्यांनीं १८ पेन्सांचा दर कसा मान्य केला ? अशी शंका कोणासही येणें साहजिक आहे. ह्या बाबतींत कमिशननें कानावर हात ठेवला आहे. "हिंदुस्थानसरकारनें काय वाटेल तें केलें असलें तरी त्याचा आम्हांस विचार कर्तव्य नाहीं. आज एक वर्षभर १८ पेन्सांचा दर स्थिर राहिला असून तो १६ पेन्सांवरून १८ पेन्सांवर येत असतां त्या चढाचा परिणाम हिंदुस्थानांतील धारण उतरण्याकडे झालेला आहे. हिंदुस्थानाबाहेरील धारण व हिंदुस्थानांतील सरासरीचे भाव यांची १८ पेन्सांच्या दरानें सांगड बसवून टाकली आहे आणि आतां हुंडणावळीचा दर १८ चा १६ पेन्स करावयाचा म्हणजे पदार्थांच्या किंमतीची घडी निष्कारण विसकटण्यासारखें होणार आहे;" ह्या अर्थाचा मुद्दा पुढें करून कमिशननें १८ पेन्सांच्या दराचें समर्थन केलें आहे. कलकत्त्याच्या घाऊक व्यापाराच्या दरांची सरासरी काढून तयार केलेले आंकडे आधार म्हणून घेतलेले आहेत ते हिंदुस्थानच्या धारणीचे निदर्शक मानण्यासंबंधानें खुद्द कमिशनलाच शंका वाटत आहे. हुंडणावळीच्या दराचे पदार्थांच्या किंमतींवर होणारे परिणाम तात्कालिक आणि शीघ्रगामी नसून दीर्घकालीन आणि संथपणानें घडून येणारे असतात आणि ही गोष्ट हिंदुस्थानासारख्या देशांत तर विशेष लागू पडली पाहिजे ह्याविषयीं दुमत असण्याचें कारण नाहीं. बाहेरचे बाजारभाव कायम असतां हिंदुस्थानांतील किंमती वाढून हुंडणावळीचा दर १८ पेन्सांच्या खालीं जाऊं नये म्हणून हिंदुस्थानसरकार चलनाचें सारखें शोषण करीत आहे. तरी हिंदी धारण सध्यांपेक्षां खालीं जाणार नाहीं ह्याविषयीं कोणासही खात्री देतां येणार नाहीं. हिंदुस्थानांतील बाजारभाव, मजुरीचे दर आणि लोकांस रोजच्या व्यवहारांत करावे लागणारे खर्च ह्यांचा १८ पेन्सांच्या दराशीं मेळ बसून गेला आहे असें जें कमिशनचें म्हणणें आहे त्याची सत्यता पटण्यासारखी नाहीं. गेल्या वर्ष सहामहिन्यांत असल्या हुंडणावळीचा दर वाढल्यानें घडून आलेल्या स्वस्ताईचा अनुभव किती लोकांस आला आहे ! लोकांस मिळणाऱ्या कमी उत्पन्नाच्या मानानें त्यांचें कोणचें ओझें हलकें झालें आहे ! १८ पेन्सांचे १६ पेन्स आतां केले असतां मजुरीचे दर १२½ टक्क्यांनीं कमी केल्यासारखें होईल असें कमिशनचें म्हणणें आहे. परंतु १६ चे १८ पेन्स केल्यामुळें कोट्यवधि लोकांचीं उत्पन्नें त्याच प्रमाणांत कमी झालीं आहेत ह्या गोष्टीचा त्यांनीं नीट विचार केलेला नाहीं. मागें एकदां २४ पेन्सांचा दर कायम करण्यांत सरकारनें घोडचूक केली हें आतां सर्वमान्य झालें आहे. पण त्या चुकीबद्दल भुर्दंड मात्र हिंदी जनतेस सोसावा लागला. पुन्हा आणखी एकदां सरकारची तशीच चूक होत आहे आणि तिचेही दुष्परिणाम हिंदी लोकांसच भोगावे लागणार आहेत.

हुंडणावळीचा दर १८ पेन्स केल्यानें हिंदी बाजारभाव आणि उत्पादकांच्या

मिळकती आणखी खालीं जाण्याचा संभव आहे. तथापि ह्या बाबतींत कमिशनचेंच म्हणणें खरें आहे असें मानून चाललें तरी ह्यापुढें जगाचे बाजारभाव उतरले असतां त्या प्रमाणांत हिंदी बाजारभाव आणखी उतरणार ह्या गोष्टीकडे लक्ष्य देणें अगत्याचें आहे. सध्यांच्या मंदींत ह्या मंदीची भर पडली म्हणजे हिंदी शेती आणि इतर उद्योगधंदे ह्यांची स्थिति काय होईल ह्याचा विचार होणें आवश्यक आहे. इंग्लंडमधील कोळशाच्या खाणींतील संप व इतर कारणांच्या योगानें गेले तीन महिने परदेशांतील बाजारभाव स्थिर आणि किंचित् चढीचे राहिले आहेत. पण तिकडे स्थिरस्थावर होतांच बाहेरच्या बाजारभावांत उतार झाल्यावांचून रहाणार नाहीं आणि मग त्या प्रमाणांत हिंदी बाजारभावही खालीं येणार हें ठरलेलेंच आहे. हुंडणावळीचा दर १६ पेन्स असेल तर उतरत्या बाजारभावावर नियंत्रण पडून हिंदुस्थानांतील किंमती स्थिर राहून येथील उत्पादकांचें नुकसान होणार नाहीं. केवळ तात्त्विक रीतीनें विचार केला असतां, हुंडणावळीचा दर १६ पेन्स काय किंवा १८ पेन्स काय सारखेंच. ज्या दरानें जगांतील बाजारभाव आणि आपल्या देशांतील धारण ह्यांचा मेळ बसेल तो दर पत्करण्यास हरकत असूं नये. परंतु चलनपद्धति लोकांच्या विश्वासास पात्र होण्यास १६ पेन्सांचा दर सरकारनें कां ठाम करणें योग्य होतें आणि १८ पेन्सांच्या दरानें हिंदी राष्ट्राचें समुच्चयरीतीनें कसें नुकसान झालें आहे आणि होत आहे हीच व्यावहारिक महत्त्वाची आणि मुद्द्याची गोष्ट येथें निर्णायक आहे. १८ पेन्सांच्या दरानें कांहीं वर्गांचा फायदा आणि इतर लोकांचें नुकसान होणार हें जर निर्विवाद आहे (आणि हीच विचारसरणी १६ पेन्सांच्या दरास लागू आहे) तर बहुसंख्याक लोकांचें, एकंदर राष्ट्राचें हित कशांत आहे हीच कसोटी प्रस्तुत प्रश्नाच्या निकालास लावली पाहिजे. हिंदी उद्योगधंद्यांच्या उत्तेजनार्थ संरक्षक जकाती सरकारनें बसविल्या पाहिजेत अशी हिंदी पुढाऱ्यांनीं चिकाटीनें हांकाटी करून शेवटीं आपला हेतु थोडाबहुत तरी सिद्धीस नेला आहे. आतां, संरक्षक जकातीमुळें हिंदी भांडवलवाल्यांचा फायदा होऊन संरक्षित पदार्थ महाग होतात आणि त्यांच्या उपभोक्त्यांचें नुकसान होतें ही गोष्ट निर्विवाद असतां एकंदर राष्ट्राच्या प्रगतीसाठीं म्हणून जनतेपैकीं कांहीं वर्गांनीं तात्पुरती झीज सोसली पाहिजे असें आपण म्हणतों. तोच न्याय प्रस्तुत प्रकरणीं लागू केला पाहिजे. ग्रेटब्रिटनचें वर उदाहरण दिलें आहे त्याची पुनरुक्ति येथें केली असतां सोयीचें होईल. अमेरिकेच्या सुवर्णचलनाच्या मानानें इंग्लंडची हुंडणावळ १० टक्क्यांनीं प्रातिकूल होती तेव्हांच ब्रिटिशसरकारनें ती पूर्वस्थळावर ढकलली तेव्हां मि० जे. एम्. कीन्ससारखे खंदे अर्थशास्त्रज्ञ म्हणत होते कीं, ह्या कृतीचा परिणाम ब्रिटिश उद्योगधंद्यास भोवल्यावांचून रहाणार नाहीं. ही आपत्ति स्पष्ट दिसत असतां इंग्लंडमधील सरकारनें जगाचा सॉव्हरिनवरील विश्वास दृढ करून आपल्या आर्थिक व चलनविषयक व्यवस्थेचें पूर्ववैभव परत आणण्याच्या हेतूनें

म्हणजे स्वराष्ट्राच्या अंतिम हिताकडेच केवळ लक्ष्य पुरवून जुनाच हुंडणावळीचा दर प्रस्थापित केला. तेंच ब्रिटिश सरकार हिंदुस्थानांत मात्र विपरीत धोरणाचा अंगीकार करीत आहे हें आश्चर्य नव्हे काय? परंतु त्यांत आश्चर्य तरी कसलें? ग्रेटब्रिटन तें ग्रेटब्रिटन आणि हिंदुस्थान तें हिंदुस्थान!

आणखी एक मुद्दा. हुंडणावळीचा दर जितका बाजवीपेक्षां ज्यास्त तेवढी, सोनें सरकारच्या गांठीं असण्याची व सरकारनें तें प्रसंग पडल्यास लोकांस पुरविण्याची जबाबदारी ज्यास्त. निकटवर्ति भविष्यत्कालांत हिंदी बाजारभाव पडण्याच्या भीतीचा उल्लेख वर केलेलाच आहे. दुर्दैवानें पुढच्या सालीं अवर्षण झालें (आणि हिंदुस्थानांत तर हें भवितव्य अशक्य नाहीं!) असतां शेती व दुसरे धंदे आणि व्यापारटापार ह्यांस मांद्य प्राप्त होऊन विलायती हुंड्या मिळेनाशा होतील आणि हुंडणावळीचा दर उतरेल. अशा प्रसंगीं १६ पेन्सांपेक्षां १८ पेन्सांचा दर उचलून धरणें सरकारास व मध्यवर्ति बँकेस अधिक कठीण पडेल हें उघड आहे. त्या वेळीं १८ च्या दरानें रुपये आणि नोटा घेऊन सरकारास सोनें किंवा सेक्रेटरी ऑफ स्टेटवर 'उलट्या' हुंड्या देणें प्राप्त होईल. हें सोनें हिंदुस्थानसरकारपाशीं येथें किंवा लंडनमध्यें कोठें आहे? खरीखुरी सुवर्णचलनपद्धति हिंदुस्थानांत सुरू करण्यास लागणारें सोनें उपलब्ध नाहीं आणि परराष्ट्रांतून कर्जाऊ उपलब्ध करून घेणें शक्य व इष्ट नाहीं ह्या मुद्दयावर हिल्टन् यंग कमिशननें व हिंदुस्थानसरकारनें सदरहू पद्धति अव्यवहार्य आणि अनिष्ट ठरविली आहे. आणि १६–१८ पेन्सांच्या वादाचें कांहीं होवो, आम्हांस बावनकशी सुवर्णचलनव्यवस्था हवी असें हिंदी जनतेचें बहुमत ठासून सांगत आहे. जगाची आर्थिक स्थिति सुधारून हिंदुस्थानास पाहिजे तें सोनें मिळत आहे असें दिसतांच हिंदी कायदेमंडळानें पुढें वाटल्यास सुवर्णचलन चालू करण्यास हरकत नाहीं असें मधाचें बोट मात्र कमिशननें लावून ठेवलें आहे. आपल्या मार्गांत सोन्याचा तुटवडा हीच मोठी अडचण आहे असें म्हणणारें सरकार, स्वतःच्या गांठीं असलेलें सोनें तरी जतन करून ठेवील अशी कोणीही सरळ मनाचा मनुष्य कल्पना करील. ज्यास्त सोनें पुढें मिळेल तेव्हां मिळो; आज हातीं असलेला सांठा कायम ठेवणें हें उघड उघड सरकारचें कर्तव्य असून त्याचें प्रत्यक्ष वर्तन मात्र अगदीं उलट आहे. १८ पेन्सांच्या नादीं लागल्यामुळें हिंदुस्थानच्या मालकीचें लंडनमध्यें असलेलें सोनें सरकार भराभर उडवीत आहे. हिंदुस्थानांतून 'होमचार्जेस'साठीं सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे जो पैसा पाठवावा लागतो, तो पाठविण्याचे नेहमींचे मार्ग म्हणजे येथें सरकारनें लंडनवरच्या हुंड्या विकत घेणें आणि सेक्रेटरी ऑफ स्टेटनें लंडनमध्यें हिंदुस्थानसरकारावर हुंड्या विकणें. पण १८च्या दरानें हे दोन्ही मार्ग अशक्य झाले असून पेपर करन्सी रिझर्व्हमधून लंडनमध्यें सोनें काढून घेणें स्टेट सेक्रेटरींना भाग पडलें आहे. एप्रिल ते ऑक्टोबर अखेर ह्याप्रमाणें १५ कोटि रुपये किंमतीचीं ट्रेझरी बिल्स लंडनमध्यें

विकलीं जाऊन त्यांचे पैसे लंडनच्या तिजोरींत जमा झाले. आणखी ४ कोटींची वासलात अशीच नुकती लागली आहे. १ सॉव्हरिन=१० रुपये ह्या दरानें १९ कोटि रुपयांचें हिंदुस्थानचें सोनें कमी झालें आहे. बाजारांत एका सॉव्हरिनला १३-१४ रुपये मिळत असतां वरील अशक्य दरानें सरकारी तिजोरींत सोन्याचें नाणें अर्थातच कोणीही देत नाहीं आणि ह्यामुळें सरकारच्या येथील सोन्याचा सांठा वाढत नाहीं; व वरील ट्रेझरी बिलांच्या किंमतीइतकें चलन हिंदुस्थानांत कमी झालें हें उघड आहे. ह्याशिवाय, हिल्टन यंग कमिशनच्या शिफारशींविरुद्ध पेपर करन्सी रिझर्व्हमधील पांच कोटींचीं कृत्रिम ट्रेझरी बिलें कमी करून चलन त्या मानानें मर्यादित केलें आहे तें वेगळेंच. हा सगळा अट्टाहास कशासाठीं तर १८ पेन्सांच्या हुंडणावळीस वर उचलून धरण्यासाठीं; आणि हा हुंडणावळीचा दर स्वाभाविक रीतीनें अगदीं स्थिर झाला आहे असें सरकारचें पुन्हां ठांसून सांगणें आहे तें आहेच! हुंडणावळ सध्यांप्रमाणेंच आणखी कांहीं काळपर्यंत निर्बल राहिली तर तिला टेंकू देण्यास सरकारजवळ लंडनमध्यें फक्त दहा कोटींचे, सुवर्णांत ज्यांचें परिवर्तन होईल असे, रोखे राहिले आहेत आणि त्यांचा फडशा होण्यास वेळ लागणार नाहीं. परराष्ट्रांत आपलें असलेलें सोनें प्रत्येक सरकार जतन करून ठेवीत असतें आणि त्याचा बेतानें खर्च करितें. हिंदुस्थानसरकारनें मात्र लंडनमधलें आपलें सोनें उडवून टाकण्याचा क्रम चालू ठेवला आहे. सहा वर्षांपूर्वीं ५५ कोटी रुपयांच्या 'उलट' हुंड्या विकून सरकारनें गोंधळ माजविला होता, त्या प्रकारचा गोंधळ उत्पन्न होण्याची वेळ दुर्दैवानें येण्याचा संभव दिसत आहे. निर्गती-च्या व्यापारास आज जी मंदी आलेली आहे ती लवकरच दूर होऊन विलायती हुंड्यांचा दर आपोआपच चढूं लागेल ह्या आशेंत ब्लॅकेटसाहेब असावेत असें दिसतें. नोव्हेंबर उलटला, डिसेंबर सुरू झाला, तेव्हां आतां हुंडणावळीच्या रोग्याची प्रकृति ताळ्यावर येऊन त्यास सुवर्णभस्माचे डोस द्यावे लागत आहेत ते बंद करतां येतील असें त्यांस वाटत असावें; परंतु सर बेसिल ब्लॅकेट यांच्यासारख्या हुषार आणि प्रामाणिक वैद्यास रोगचिकित्सा बरोबर करतां येऊं नये आणि त्यानें भलतेंच निदान करून कांहींतरी मात्रा उगाळीत बसावें हें देशाचें दुर्दैव होय. तथापि चिकाटीच्या कामीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद आणि हिंदी जनता ह्यांनीं आमच्या फडनविसांस हार जातां कामा नये. त्यांच्या कृतीकडे सर्वांनीं सारखें डोळ्यांत तेल घालून लक्ष्य पुरविलें पाहिजे, आणि हिंदुस्थानांत सुवर्णचलनपद्धति प्रस्थापित करण्याचा पिच्छा सोडतां कामा नये. लोकमतानें एकवटून रुपयाचें अनुभवानें यशस्वी ठरलेलें ७·५ ग्रेन सोन्याचें प्रमाण म्हणजे १६ पेन्सांचा हुंडणा-वळीचा दर कायम करून घेण्यांत आपलें शक्तिसर्वस्व खर्चीं घातलें पाहिजे. असें झाल्यास हिंदुस्थानसरकारास १६ पेन्स दराचा कायदा करणें भाग पडल्यावांचून राहणार नाहीं.

# इंडियन करन्सी लीग

## संस्थेचे उद्देश

### उद्देश

१ हिंदुस्तानच्या हितसंबंधास पोषक होईल अशी चलनपद्धति अस्तित्वांत यावी ह्या हेतूनें चलनविषयक प्रश्नांचा पद्धतशीरपणें व निःपक्षपातबुद्धीनें अभ्यास करण्यास लोकांस उत्तेजन देऊन त्यांस जरूर त्या सोई उपलब्ध करून देणें.

२ हिंदुस्थानांत सुवर्ण मूल्यमापनपद्धति अस्तित्वांत येण्याची व सोन्याचें नाणें चलन म्हणून वापरलें जाण्याची आवश्यकता लोकांस पटवून देणें; व मध्यवर्ती कायदेमंडळानें ही गोष्ट घडवून आणण्याकरितां पुढील उपाय ताबडतोब योजावे अशी खटपट करणें.

(अ) इंग्लंडांतील सॉव्हरीनच्या वजनाचें व तितक्याच कसोटीच्या सोन्याचें स्वतंत्र व प्रमाणभूत हिंदी नाणें ठरवून त्याचें रुपयाशीं १:१५ हें प्रमाण मुक्रर करणें.

(ब) तसेंच सोनें देऊन सोन्याचें नाणें मिळविण्यास सर्वांस मुभा असावी, ह्यास्तव हिंदुस्थानांत टांकसाळ प्रस्थापित करणें व ज्या पद्धतीनें इंग्लंडमधील सरकारी टांकसाळींत सोन्याचीं नाणीं पाडून देण्याची व्यवस्था केलेली आहे तीच पद्धत येथें चालू करणें.

नवें सोन्याचें नाणें पाडून देणारी टांकसाळ प्रस्थापित झाली तरी सध्यां प्रचलित असलेले रुपये अगर नोटा ह्या देऊन त्यांच्या मोबदला सरकारकडून सोन्याचें नाणें मिळालेंच पाहिजे अशी चलनखात्याच्या अधिकाऱ्यांवर कायद्यानें सक्ति करूं नये.

### तात्कालिक उद्दिष्ट

करन्सी कमिशननें १ शिलिंग ६ पेन्स ह्या दरावर हुंडणावळ स्थिर करावी अशी जी बहुमतानें सूचना केली आहे ती नुकसानकारक असून सर पुरुषोत्तमदास यांनीं आपल्या भिन्नमतप्रदर्शक पत्रिकेंत १ शिलिंग ४ पेन्स या दराबद्दल जी शिफारस केली आहे ती हिंदुस्थानास हितावह आहे, हें लोकांस समजून सांगणें.

'इंडियन करन्सी लीग--महाराष्ट्र शाखा', ह्या संस्थेमार्फत हिंदी चलनविषयक प्रश्नासंबंधीं निरनिराळीं पत्रकें प्रसिद्ध होतात. राष्ट्रीय महत्त्वाच्या ह्या प्रश्नाचा सर्वत्र अभ्यास होऊन त्यासंबंधीं यथार्थ ज्ञान महाराष्ट्रांतील बहुजनसमाजांत पसरणें अत्यंत अवश्य आहे. म्हणून ज्यांस हिंदी चलनपद्धतीची माहिती करून घेण्याची इच्छा असेल त्यांस हीं पत्रकें वाटण्याची व्यवस्था केलेली आहे. तरी गरजूंनीं खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकीट पाठवून मागणी केल्यास त्यांस तीं पत्रकें पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.

**प्रो० दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम्. ए.**

फर्ग्युसन कॉलेज,

**पुणें ( Deccan Gymkhana.)**

किंवा

सेक्रेटरी, इंडियन करन्सी लीग- महाराष्ट्र शाखा,

गायकवाडवाडा, नारायण पेठ, पुणें.

इंडियन करन्सी लीग—महाराष्ट्रशाखा


पत्रक नं. ४

# चलनी नाण्याचा चालू वाद

लेखक

श्रीयुत—जनार्दन सखाराम करंदीकर,

बी. ए., एलूएल्. बी.



अनंत सखाराम गोखले, 'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें यांनीं छापिलें

तें दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम् ए. सेक्रेटरी, इंडियन करन्सी

लीग—महाराष्ट्रशाखा, यांनीं पुणें, पेठ नारायण,

गायकवाडवाडा येथें प्रसिद्ध केलें.

## पूर्वी प्रसिद्ध झालेलीं पत्रकें

पत्रक १ लें

### करन्सी कमिशनच्या शिफारसी

---

पत्रक २ रें

### हुंडणावळीच्या दरासंबंधीं वाद

---

पत्रक ३ रें

### आठराविरुद्ध सोळा पेन्सांचा लढा

# चलनी नाण्याचा चालू वाद

चलनी नाण्याची सुव्यवस्था लावण्यासाठीं म्हणून नेमल्या गेलेल्या कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यापासून या विषयाकडे विचारी लोकांचें लक्ष वेधून राहिलें आहे व ते आपापल्या परीनें या वादांतील मुद्द्यांची चर्चा करीत आहेत. या वादाचा मुख्य भर सध्यां तरी रुपयाचा भाव किती पेन्स असावा या प्रश्नावरच केंद्रीभूत झालेला दिसतो. परंतु हुंडणावळीचा प्रश्न तरी उपस्थित कां होतो व त्याला एवढें महत्त्व कां आलें या मूलभूत तत्त्वाचा विचार होणें अगत्याचें आहे.

हा वाद उपस्थित कसा झाला आणि हुंडणावळीचा भाव कायद्यानें ठरविणें अवश्यक कां आहे याची नीटशी कल्पना आल्यास पुढील सर्व वादाचे धागेदोरे चांगले उलगडतील. याकरितां प्रथमतः त्या प्रश्नाचा पूर्वेतिहास पाहूं. जगांत अनेक सुधारलेले देश आहेत. प्रत्येक देशाला त्याचें त्याचें विशिष्ट नाणेंही आहेच. व त्या देशाचा परराष्ट्रांशीं कांहींना कांहीं तरी संबंध येतच असल्यानें त्यालाही आपल्या नाण्याची परदेशांतील नाण्यांत किंमत किती येते व ती आपल्यास फायदेशीर केव्हां होते यांचा विचार करावाच लागतो. तरीपण त्या देशांत नाण्यांच्या परदेशीय चलनांत ठरणाऱ्या किंमतीविषयीं कोठेंही एवढें रण माजून राहिलेलें ऐकूं येत नाहीं. मग हा प्रश्न येथेंच एवढा महत्त्वाचा व घोटाळ्याचा कशानें झाला ?

या प्रश्नाचा विचार करूं लागल्यास हिंदुस्थानची विशिष्ट राजकीय परिस्थितिच याला कारणीभूत आहे असें दिसून येतें. सामान्यतः जगांतील सुधारलेल्या प्रत्येक देशांत सोन्याचें किंवा चांदीचें नाणें चालू आहे. यांतील कोणतेंही नाणें स्वतंत्र देशांत चालू असलें तरी त्या देशास परदेशांतील नाण्याचा भाव आपल्या नाण्यांत किती येतो, तो भाव तेजीचा आहे कीं मंदीचा आहे याचा फारसा विचार करावा लागत नाहीं. त्याचे बहुतेक सर्व व्यवहार स्वतःच्या नाण्यांत होतात आणि परदेशाशीं होणाऱ्या व्यवहारांतही तो देश होतां होईल तों आपलेंच नाणें उपयोगांत आणण्याचा प्रयत्न करतो. परदेशाशीं होणारे व्यापारी करारमदार, परदेशांतून स्वदेशांत येणारें अथवा स्वदेशांतून परदेशीं जाणारें भांडवल आणि त्यावर होणारी व्याजाची आकारणी व देवघेव आणि मूळ मुदलाची कालांतरानें करावयाची फेड इत्यादि व्यवहार आपल्या नाण्यांतच करण्याची तो दक्षता घेतो, आणि स्वतंत्र देशाला या सर्व गोष्टी शक्य आहेत.

पण हिंदुस्थानची परिस्थिति वेगळी आहे. या देशाचा इंग्लंडशीं राजकीय संबंध जडला आहे व त्याच्या अनुषंगानें आर्थिक व्यवहारांतही तो परावलंबी झाला

आहे. हिंदुस्थानसरकारचा बराचसा व्यवहार इंग्लंडांत होत असतो. त्या व्यवहारांकरितां हिंदुस्थानच्या खजिन्यांतून इंग्लंडला दरसाल तीसचाळीस कोट रुपयांपर्यंत रक्कम पाठवावी लागते. हिंदुस्थानांत जो वरिष्ठ दर्जाचा अधिकारी वर्ग आहे तो विलायतेंतूनच इकडे येणारा व नोकरीची मुदत संपल्यावर विलायतेस परत जाऊन तेथें हिंदुस्थानची पेन्शन घेत राहणारा असा आहे. या अधिकाऱ्यांचे देवघेवींचे बरेचसे व्यवहार विलायतेंतच होतात व त्यांनीं जमविलेला द्रव्यसंचयही त्यांना स्वदेशांतच पाठवावयाचा असतो. हा अधिकारीवर्ग येथें सत्ताधारी असून चलनी नाण्याची पद्धति ठरविण्याची सत्ताही त्याच्याच हातांत असल्यानें स्वतःच्या हितासाठीं त्याला येथील चलनपद्धति इंग्लंडच्या दृष्टीनें कशी फायदेशीर होईल हें पहाण्याचा व ती तशी बनविण्याचा मोह पडतो.

हिंदुस्थानसरकारनें आजपर्यंत जें कोट्यवधि रुपयांचें राष्ट्रीय कर्ज हिंदुस्थानासाठीं म्हणून काढिलें आहे, त्यांतला बहुतेक भाग इंग्लंडांतच उभारलेला आहे. अलीकडचीं वीसपंचवीस वर्षें सोडून दिलीं तर तत्पूर्वीं हिंदुस्थानसरकार दरसाल जी कर्जाची उभारणी करीत असे ती विलायतेंत व विलायती नाण्यांतच केली जाई. यामुळें हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जाचा व त्यावर दरसाल द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा व्यवहार विलायती नाण्यांत करणें सरकारला भाग पडतें. सरकारनें उभारलेल्या राष्ट्रीय कर्जाखेरीज ग्रेटब्रिटनमधील लक्ष्मीपुत्रांनीं हिंदुस्थानांतील कारखान्यांत व उद्योगधंद्यांत बरीच मोठी रक्कम गुंतविली आहे. एखाद्या स्वतंत्र देशांत अशी रक्कम त्यांनीं गुंतविली असती तर त्यांस त्या देशांतील नाण्यांतच व्यवहार करावा लागला असता व त्या नाण्याची जशी तेजी किंवा मंदी होईल त्याप्रमाणें तिचा बरावाईट परिणाम त्यांस भोगावा लागला असता. परंतु हिंदुस्थान हा देश इंग्लंडच्या ताब्यांतला असून या परकी सावकारांना येथल्या परकी सरकारचें पाठबळ असल्यानें त्या सावकारांचें नुकसान न होईल अशाविषयीं हिंदुस्थानसरकारचा कटाक्ष असतो. आणि त्यांच्या व्यापारास व दीर्घकालीन करारमदारांस सुरक्षितता यावी याकरितां हिंदुस्थानसरकार, येथील चलनपद्धति या परकी व्यापाऱ्यांना सोईस्कर पडेल अशा दृष्टीनें ठरवीत असतें.

देशांदेशांतील आंतरराष्ट्रीय व्यापार इतरत्र त्या त्या देशाच्या मर्जीवर व नफानुकसानीवर अवलंबून असतो. पण हिंदुस्थानाला तेवढीही स्वतंत्रता चालवितां येत नाहीं. इंग्लंडचें राजकीय वर्चस्व व्यापारांतही हिंदुस्थानास नडतें. हिंदुस्थानसरकार, हिंदुस्थानांतलि ब्रिटिश रेल्वेकंपन्या, हिंदुस्थानांत कारखाने काढून ते चालविणारे ब्रिटिश भांडवलवाले आणि हिंदुस्थानांत राहणारे ब्रिटिश अधिकारी या सर्वांना आपणांस लागणारा माल आपल्या मातृभूमींतून मागवावा असें वाटणें स्वाभाविक असून त्यांची ही स्वाभाविक प्रवृत्ति हिंदी राष्ट्राच्या व्यापाराच्या ओघास एकप्रकारें बंधनकारक होते, आणि अशा रीतीनें हिंदुस्थान व इंग्लंड यांचा व्यापारीसंबंध या देशाची इच्छा असो वा नसो पूर्णपणें तोडतां येणें शक्य नाहीं.

वर नमूद केलेल्या विविध वर्गांचे व्यवहार सुलभतेनें व्हावे आणि त्यांना कोणताही कसलाही दीर्घकालीन करारमदार करतांना नाण्यांच्या भावांत चढउतार झाल्यामुळें धोका किंवा निदान अनिश्चितता वाटूं नये यास्तव या सर्व लोकांकडून हिंदी चलनी नाण्याचा भाव विलायती नाण्यांत कायद्यानें कायमचा ठरवून टाकावा अशी मागणी होत असते व हिंदुस्थानसरकारनें असल्याच आपल्या जातभाईंच्या कल्याणाकडे दृष्टि देऊन रुपयाचा भाव पौंडांत स्थिर करण्याचा प्रयत्न गेलीं तीस वर्षे सतत चालविला आहे.

स्वतंत्र देशांतूनही आपल्या नाण्याचा परदेशीय नाण्यांत येणारा मोबदला किंवा हुंडणावळीचा भाव वारंवार चढूं उतरूं नये याविषयीं काळजी घ्यावीच लागते. पण त्यांनीं योजलेले उपाय नैसर्गिक व तात्काल परिणाम करणारे असतात आणि त्या उपायांचा हेतु सिद्धीस जातांच त्यांची बजावणी आपोआपच बंद पडते. अर्थातच कोणताही स्वतंत्र देश आपल्या नाण्याला कायमचें कृत्रिम चलनाचें स्वरूप देऊं इच्छीत नाहीं. परंतु हिंदुस्थान आणि इंग्लंड यांच्या दरम्यानचे व्यवहार इंग्लिश अधिकारी व इंग्लिश व्यापारी कंपन्या यांना फायदेशीर व्हावेत म्हणून इंग्लंडनें येथील नाण्याचा भाव स्थिर करण्याच्या हेतूनें हिंदी रुपया कृत्रिम किंमतीचा बनविला आणि या रुपयाची इंग्लिश नाण्यांत जी किंमत ठरविण्यांत आली तीही हिंदुस्थानाला नुकसानकारक व इंग्लंडला किफायतशीर अशीच योजण्यांत आली. रुपयाचा भाव इंग्लिश पेन्सांत स्थिर तरी करा किंवा आमचें हुंडणावळींत जेवढें नुकसान होतें तेवढें Exchange compensation तरी आम्हांस द्या; अशी मागणी प्रथम येथील सिव्हिल सर्व्हंटांनीं सुरू केली आणि हिंदुस्थानसरकारनें ती मान्य करून सिव्हिल सर्व्हंटांना एक्स्चेंज कॉम्पेन्सेशन् ( हुंडणावळी-भत्ता ) देण्यास सुरुवात केली. अशा रीतीनें दरसाल क्रोडो रुपये हिंदी बजेटांत खर्ची पडूं लागले व जमाखर्चाची तोंड-मिळवणी करणें सरकारला दिवसेंदिवस अशक्य होऊं लागलें. हुंडणावळभत्ता देण्याला सुरुवात झाल्यापासून सिव्हिल सर्व्हंटांची तक्रार मिटली; परंतु त्यांत विलायती व्यापाऱ्यांना कांहींच लाग साधला नाहीं. उलट रुपयाचा भाव उतरूं लागल्यामुळें हिंदुस्थानांतील कारखान्यांच्या व उद्योगधंद्यांच्या कामांत मिळणारा नफा विलायतेस रवाना करतांना त्यांना बरेंच नुकसान सोसावें लागूं लागलें. यामुळें येथील ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं रुपयाचा भाव कायद्याच्या कृत्रिम बंधनांनीं स्थिर करून टाकण्याविषयीं एकच हाकाटी सुरू केली. ही चळवळ लॉर्ड इंचकेप यांनीं कुशलतेनें चालवून हिंदुस्थानसरकारास व स्टेट सेक्रेटरीस आपलें म्हणणें कबूल करावयास भाग पाडलें, आणि या व्यापाऱ्यांच्या स्वार्थी चळवळीमुळेंच हिंदुस्थानांत चलनी नाण्याला कृत्रिम नाण्याचें स्वरूप प्राप्त झालें. ही क्रान्ति सन १८९३सालीं घडून आली. तत्पूर्वी हिंदु-स्थानांतील टांकसाळींतून पाडल्या जाणाऱ्या रुपयांत शुद्ध चांदी किती असावी,

एवढाच काय तो कायदेशीर निर्बंध असे आणि कोणीही तितकी शुद्ध चांदी टांकसाळींत नेऊन दिल्यास त्यास रुपये पाडून दिले जात असत. या कारणानें रुपयाची किंमत त्यांतील चांदीच्या किंमतीला धरूनच असे. चांदी महाग झाली तर रुपयाचा भावही चढे व चांदी स्वस्त झाल्यास त्या मानानें रुपयाचा भावही उतरत असे. नैसर्गिक नाण्याचें हेंच लक्षण होय व नाण्याचें नैसर्गिक स्वरूप कायम राहण्या-करितां जनतेला टांकसाळ खुली असावी लागते. ठराविक वजनाची व कसाची चांदी आणून दिल्यास वाटेल तितके रुपये टांकसाळींतून जोंपर्यंत मिळूं शकतात तोंपर्यंत देशांतलें नाणें कृत्रिम स्वरूपाचें होत नाहीं आणि त्या चलनी नाण्यांतील धातूची किंमत परदेशांतील इतर धातूंच्या नाण्यांच्या सापेक्षतेनें कितीही चढली किंवा उतरली तरी त्यांत जनतेचें नुकसान होऊं शकत नाहीं. परंतु ही स्वाभाविक पद्धति सोडून देऊन हिंदुस्थानसरकारनें इंग्लिश कंपन्यांच्या व व्यापाऱ्यांच्या सोयीसाठीं हिंदी चलन कृत्रिम स्वरूपाचें केलें व त्याची कृत्रिमता टिकून राहण्यासाठीं टांकसाळींत चांदी देऊन रुपये पाडून घेण्याचा जनतेचा हक्क हिरावून घेतला.

पूर्वीं खुल्या असलेल्या टांकसाळींचें दार जनतेला बंद करून नाणें केव्हां व किती पाडावयाचें याचा सर्वाधिकार सरकारनें सर्वस्वीं आपल्या हातीं घेतला म्हणजे त्या नाण्याची सरकार जी किंमत ठरवील तीच प्रजेला मान्य करावी लागते व त्या किंमतीनेंच देशांतले सर्व व्यवहार होऊं लागतात. पण ही कृत्रिम किंमत नैसर्गिक किंमतीला फारच सोडून असेल तर त्याचा दुष्परिणाम जनतेला सोसावा लागतो. नाण्याची कृत्रिम किंमत नैसर्गिक किंमतीहून कमी राहूं शकत नाहीं हें सांगावयास नकोच. कृत्रिम किंमत म्हटली कीं, स्वाभाविक किंमतीहून ती अधिकच असावयाची व तशी ती असण्यांत सरकारचा फायदा असल्यानें हें अंतर जितकें अधिक राखवेल तितकें राखण्याचा सरकार यत्न करीत राहणार. सन १८९३ सालीं जेव्हां सरकारनें टांकसाळी बंद करून रुपयाचा भाव पेन्सांत ठरवून टाकला त्या वेळीं बाजारभावानें रुपयाची किंमत १२ पेन्स होती; पण सरकारनें ती किंमत १६ पेन्स ठरविली. आणि हुंडणावळीचा नैसर्गिक भावही १६ पेन्सांवर आणण्यासाठीं आपल्या हातांत होते तितके सर्व उपाय योजिले.

येथें हें नमूद केलें पाहिजे कीं, देशांतील चलन किती असावें हें ठरविण्या-चा सरकारला अनियंत्रित अधिकार असला म्हणजे त्या चलनाचा भाव वाढविणें किंवा कमी करणें सरकारच्या स्वाधीन असतें व त्या उपायाचा अवलंब करून सरकार केव्हांही चलनी नाण्याची तेजी अगर मंदी करूं शकतें. बाजारांत मालाचा पुरवठा अधिक व मागणी त्या मानानें कमी झाल्यास मालाची किंमत उतरते आणि याच्या उलट प्रकार म्हणजे मागणी अधिक व पुरवठा कमी अशी स्थिति झाल्यास मालाची किंमत चढते. हाच न्याय चलनी नाण्यासही तसाच लागू पडतो. नवीन चलनाचा पुरवठा न करतां उलट खेळतें चलन आपल्याकडे आकर्षून घेतल्यानें

नाण्याची टंचाई होते व हुंडणावळीचा भाव वाढतो. आणि जेव्हां वाजवीपेक्षां सरकार अधिक नाणें पाडतें अथवा खजिन्यांतील शिल्लक कमी करून जमेहून अधिक बटवडा होऊं लागतो तेव्हां नाण्याची किंमत म्हणजे अर्थात् हुंडणावळीची किंमत उतरते. सन १८९३ सालीं हुंडणावळीचा बाजारभाव १६ पेन्सांहून बराच कमी होता व तो सरकारला १६ पेन्सांवर आणून ठेवावयाचा होता. यास्तव वर सांगितलेल्या तत्त्वास अनुसरून सरकारनें नवें नाणें पाडणें बंद केलें आणि पांच वर्षांत हुंडणावळीचा भाव १६ पेन्सांला येऊन ठेपला.

आपल्या व्यवहाराला जितक्या खेळत्या नाण्याची गरज लागते त्याहून खेळतें नाणें कमी झाल्यास त्याची भर करण्याचा व नाण्याची टंचाई दूर करण्याचा राजरस्ता सरकारनें बंद केला. टांकसाळींत चांदी देऊन रुपये पाडून मिळतनासे झाल्यानें आपल्या हातांत चांदी असूनदेखील व्यापाऱ्यांना नाण्याची चणचण व तिचे दुष्परिणाम भोगावे लागत. अशा रीतीनें नाणें पाडून घेण्याचा राजमार्ग सरकारनें बंद करून ठेविला असला तरी टांकसाळींतून नाणें बाहेर येण्यास दोन चोरदरवाजे खुले असत. त्यांतला एक मार्ग म्हणजे येथील टांकसाळींत हुंडणावळीच्या सरकारी दरानें सोनें देऊन त्याच्या मोबदला रुपये पाडून घेणें हा होय. परंतु हा मार्ग, हुंडणावळीचा दर विशेष सवलतीचा असल्यास त्या मानानें फायदेशीर नसून नुकसानीचाही ठरतो.

चलनी नाण्यांत भरती करण्याचा दुसरा चोरदरवाजा म्हणजे विलायतेंत स्टेट सेक्रेटरीच्या हुंड्या विकत घेऊन त्याच्या मोबदला हिंदी खजिन्यांतून रोकड घेणें हा होय. विलायती व्यापाऱ्यांस हिंदुस्थानांतील कच्च्या मालाची मागणी करतांना जी रकम हिंदुस्थानांत पाठवावी लागते तिची रवानगी ब्रिटिश व्यापारी या पद्धतीनें करीत असतात. स्टेट सेक्रेटरीलाही 'होम चार्जेस'चा खर्च भागविण्याकरितां विलायतेंत रोकड लागतच असते. हिंदुस्थानसरकारनें येथून नक्त रकम इंग्लंडला पाठविण्यांत खर्चही अधिक येतो व हिंदी नाणें व विलायती नाणें हीं वेगवेगळीं असल्यानें प्रत्यक्ष हिंदी चलन पाठवूनही उपयोग होत नाहीं. त्यापेक्षां विलायती व्यापाऱ्यांनीं स्टेट सेक्रेटरीकडे ब्रिटिश नाण्यांत रकमेची भरपाई करावी आणि हिंदुस्थानसरकारनें येथील खजिन्यांतून त्यांना रोख रुपये द्यावे. यांत उभयतांचीही सोय होत असून शिवाय हिंदुस्थानांतील चलनी नाण्यांत तितकी भर आपोआप पडते. 'होमचार्जेस'च्या खर्चाकरितां जेवढी रकम स्टेट सेक्रेटरीला पाहिजे असेल तेवढ्याच हुंड्या स्टेट सेक्रेटरीनें विकल्यास हिंदी चलनांत कायमची वास्तविक भर पडत नाहीं. कारण 'होमचार्जेस'इतकी रकम हिंदुस्थानसरकार कराचे रूपानें प्रजेकडून परत आपल्या खजिन्यांत दरसाल घेतच असतें, परंतु स्टेट सेक्रेटरीनें आपल्या गरजेपुरत्याच हुंड्या विकाव्या असा कायद्यानें निर्बंध घातलेला नव्हता. एवढेंच नव्हे तर ज्या वेळीं हिंदुस्थानसरकारनें येथील चलन कृत्रिम किंमतीचें करून त्याचा भाव

१६ पेन्स ठरवून टाकला. त्याच वेळीं सरकारनें असें जाहीर केलें कीं, जो कोणी व्यापारी सरकारकडे किंवा स्टेट सेक्रेटरीकडे १६ पेन्सांच्या भावानें हुंड्या मागेल त्याला त्याच्या मागणीप्रमाणें हुंड्या देण्यांत येतील. यांत विलायती व्यापाऱ्यांचा बराच फायदा असल्यानें हुंड्यांची मागणी सालोसाल स्टेट सेक्रेटरीच्या गरजेपेक्षां कितीतरी अधिक असे.

सन १९०३–०४ सालापासून ही हुंड्यांची मागणी फारच झपाट्यानें वाढूं लागली व तीन वर्षांत 'होम चार्जेस'पेक्षां पन्नास कोटि रुपयांच्या अधिक हुंड्या विकल्या गेल्या. हिंदी चलनांत एवढी मोठी अनवश्यक भर पडल्यानें हुंडणावळीचा भाव उतरूं लागला व देशांत महर्घता होऊं लागली. यामुळें सन १९०८ व १९०९ या दोन सालांत हिंदुस्थानसरकारनें परत हुंड्या विकून आणि स्टेट सेक्रेटरीनें 'होम चार्जेस'पेक्षां कमी किंमतीच्या हुंड्या विकून चलन कमी केलें आणि हुंडणावळीचा भाव पुन्हा वेतावर आणला. पण सन १९१० सालापासून सरकारचें हें धोरण सुटून पुन्हा जरुरीपेक्षां अधिक हुंड्या विकण्याचा सपाटा सुरू झाला. त्याचाही परिणाम पूर्वीसारखाच होऊं लागला. पण इतक्यांत महायुद्ध उपस्थित झाल्यानें स्टेट सेक्रेटरीची हुंड्यांची विक्री आपोआपच संपुष्टांत आली आणि चांदीची किंमत उतरण्याचें थांबून ती चढण्याला प्रारंभ झाला.

महायुद्धाच्या समाप्तीनंतर चांदीचा भाव पूर्वीच्यापेक्षां दिढीदुपटीनें वाढलेला होता. तेव्हां पूर्वीप्रमाणें हुंडणावळीचा भाव १६ पेन्स ठेवणें शक्य नव्हतें. सोन्याचांदीचा बाजारभाव पाहिल्यास रुपयाची किंमत तीस पेन्सांपर्यंत चढत गेली! अशा वेळीं सोन्याचांदीचा भाव पुन्हा निश्चित करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली व तिनें दहा रुपयांस एक सॉव्हरीन म्हणजे एका रुपयास दोन शिलिंग हा भाव सुचविला व सरकारनें पूर्वीच्या कायद्यांत फरक करून तो अंमलांत आणिला. महायुद्धाच्या समाप्तीनंतर देशादेशांतील चलनांचा व सोन्याचांदीचा संग्रह आणि दरसाल होणारी त्यांची पैदास यांचा अंदाज ठरवून कमिटीनें यापुढें सोन्याचा भाव १६ रु. तोळा म्हणजे एका रुपयाचा हुंडणावळीचा भाव २४ पेन्स हा कायमचा टिकेल असा अभिप्राय दिला; पण तो चुकीचा ठरला. महायुद्धापूर्वी सोनें २४ रु. तोळा होतें तें या कमिटीच्या शिफारशीच्या वेळीं २१ रु. तोळ्यापर्यंत उतरलें. परंतु सोन्याच्या या मंदीच्या भावानें तेथून उलट खाली. त्या वेळीं हा भाव १६ रुपयांवर खेंचून आणण्यासाठीं हिंदुस्थानसरकारनें सोनें विकण्याचा आणि परतहुंड्या विकण्याचा सपाटा सुरू केला. त्या योगानें सरकारच्या ठेवींतील सोनेंही खलास झालें आणि परतहुंड्या विकल्यानें हिंदुस्थानची विलायतेंत असलेली रोकडही संपून गेली; परंतु हुंडणावळीचा भाव २४ पेन्सांवर येईना आणि सोनेंही २१ रु. तोळा याहून कमी किंमतीला मिळेना. तेव्हां हताश होऊन सरकारनें हा प्रयत्न सोडून दिला आणि कायद्यांत नमूद असलेल्या चोवीस पेन्सांच्या भावानें सरकार हुंड्या देण्यास किंवा

देण्यास बांधलें गेलें नाहीं असें जाहीर करून सरकारनें हुंडणावळीचा भाव बाजारपेठे-च्या नैसर्गिक स्थितीवर सोंपवून टाकला. आणि या सगळ्या घालमेलींत हिंदुस्थानास चाळीस पन्नास कोटींची ठोकर बसली !

हुंडणावळीचा कृत्रिम भाव अंमलांत आणण्याचें सरकारनें सोडून दिल्यावर तो भाव १६ पेन्सांच्या जवळपास घुटमळत राहिला; पण सरकारच्या मनांतून २४ पेन्स नसला तरी तो निदान १८ पेन्स तरी करावा असें वागत असल्यानें त्या वेळेपासून सरकारनें बाजारांतलें चलन कमी करून हुंडणावळीचा भाव वाढविण्याचे जितके प्रकार शक्य आहेत तितके करून पाहिले. परतहुंड्या विकल्या, चलनी नोटा कमी केल्या आणि जरूरीपेक्षां अधिक कर्ज काढलें. या तीन मार्गांनीं रुपयाचा भाव १९२४ सालाला १८ पेन्सांवर आला. हीच वळण आणखी अशीच पुढें चालवून तो भाव २४ पेन्सांवर आणावा असें स्टेट सेक्रेटरीचें मत होतें. पण १८ पेन्सांच्याच भावानें हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांवर व कारखानदारांवर किती अनिष्ट परिणाम झाला आहे याची हिंदुस्थानसरकारला स्टेट सेक्रेटरीपेक्षां अधिक जाणीव असल्यानें हिंदुस्थानसरकारनें हा भाव आणखी चढविण्याची कारवाई करण्याचें नाकारलें. आणि १८ पेन्सांचा भाव तरी कायद्यानें कायमचा पदरांत पडूं दे असें मनांत योजून स्टेट सेक्रेटरीला नवीन करन्सी कमिशनची नेमणूक करण्यास सुचविलें. कमिशनची नेमणूक होण्यापूर्वींपासूनच कमिशनचा निकाल कोणत्या धोरणा-वर मिळावा त्याची तजवीज केली गेल्यानें कमिशननें रुपयाचा भाव १८ पेन्स ठरवावा असा बहुमतानें निकाल दिला, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. १९२१ साली हुंडणावळीचा कायदेशीर भाव राखण्याचा प्रयत्न सोडून दिल्यापासून आपण चलनी नाण्याच्या परिस्थितींत फेरबदल घडविण्यासाठीं कोणतेंही कृत्रिम केलें नाहीं असें सरकार म्हणतें; परंतु बॅबिंग्टन कमिटीचा २४ पेन्सांचा भाव कायदेबुकांत तसाच कायम राखिल्यानें चांदी देऊन रुपये पाडून देण्याचा मार्ग जनतेला साफ बंद झालेला आहे. स्टेट सेक्रेटरीनें हुंड्या किती विकाव्या हेंही आतां केवळ त्याच्या मर्जीवर राहिल्यानें वास्तविक जरूरीपेक्षां अधिक हुंड्या विकून पूर्वी जी देशांतील चलनांत भर पडत होती तीही सरकारनें बंद केली आहे. त्याचबरोबर चलनी नोटांची संख्याही कमी केली आहे. अशा रीतीनें रुपयाचा भाव कृत्रिमतेनें वाढवून पुन्हा सर बेसिल हे असेंच सांगत आहेत कीं, गेल्या दोन वर्षांत हुंडणावळीचा भाव स्वाभाविकपणें १८ पेन्सांवर स्थिर राहिल्यानें यापुढेंही तो तसाच स्थिर राहील असें वाटतें आणि म्हणूनच आम्ही आतां तो भाव परत १६ पेन्सांवर न नेतां त्याच्या नैसर्गिक स्थितीवरच तो सोडून देणार आहों ! परंतु गेल्या दोन वर्षांतला चलन-खात्यांतला गोंधळ पाहिल्यास सरकारची कारवाई नजरेस येतेच. पण प्रस्तुतच्या कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्या-पासून आतांपर्यंत सरकारनें तीन वेळां नाणें कमी करण्याचा उपद्व्याप करून एकंदर बारा कोटींचें चलन दडपून टाकिलें आहे.

अशा रीतीनें चलन कमी करून भाव चढविल्यास त्याचा परिणाम अनेकांना अनिष्ट असा होतो. देशांतील सर्व वस्तूंच्या किंमती उतरतात, शेतकऱ्यांचें उत्पन्न कमी होऊन त्यांचें नुकसान होतें, हिंदी कारखान्यांची तारांबळ उडते आणि ज्यांना ज्यांना दुसऱ्याचें कांहीं कर्ज देणें आहे, किंवा कर भरणें आहे त्यांच्यावरचा बोजा वाढतो. तेजीच्या हुंडणावळीचा हा जो परिणाम सांगितला त्याच्या तडाख्यांतून हिंदी जनतेंतले फारच थोडे लोक सुटतात. कारण या देशांत शेतकऱ्यांचाच मुख्य भरणा आहे, व शेतांत उत्पन्न होणाऱ्या मालाचा भाव उतरला कीं त्यांचें नुकसान झालेंच. या चढत्या भावानें ज्यांचा फायदा होतो असेंही कांहीं वर्ग आहेत, ते पुढीलप्रमाणें:—ज्यांना पूर्वीं दिलेलें कर्ज वसूल करावयाचें आहे असे सावकार, पूर्वी ठरविलेल्या दरानें शेतसारा व इतर कर ज्याला वसूल करावयाचे आहेत असें सरकार. आणि ज्यांचा पगार पूर्वीच्या बाजारभावावरून ठरला असून तो कमी केलेला नाहीं असा नोकरवर्ग. त्याचप्रमाणें ज्या परदेशीयांना हिंदुस्थानांत व्यापार करून किंवा नोकरी करून आपली रोकड परदेशास पाठवावयाची असते ते व्यापारी व नोकर व ज्यांना परदेशांतील माल मागवून तो या देशांत विकावयाचा धंदा करावयाचा आहे असे परदेशी मालाचे एजंट, इतक्या वर्गाचा यांत फायदा आहे. यावरून दिसून येईल कीं, चढत्या भावानें ज्यांचें नुकसान होतें असा वर्ग बहुसंख्य असून यांत ज्यांचा स्वार्थ साधतो असा वर्ग अगदींच अल्पसंख्य आहे. पण बहुसंख्य वर्ग विनसत्ताधारी आणि अल्पसंख्य वर्ग सत्ताधारी किंवा सत्ताधाऱ्यांचा दोस्त असल्यानें त्याच्या हितासाठीं बहुसंख्य लोकांच्या हिताचा बळी देण्यांत येत आहे.

रुपयाचा भाव चढल्यास स्वस्ताई झाल्यानें शेतकऱ्यांचा फायदा होतो असें सांगण्यांत येतें पण तें सत्य नाहीं. कारण शेतकऱ्यांना परदेशांतून येणाऱ्या फारच थोड्या वस्तु विकत घ्यावयाच्या असतात. उलटपक्षीं त्यांना परदेशांत पुष्कळच माल विकावयाचा असल्यानें किंमती उतरल्यानें नफ्यापेक्षां त्यांचे नुकसानच अधिक होतें. देशांत स्वस्ताई झाल्यानें मजूरवर्गाचा फायदा होतो असें सरकारतर्फे सांगण्यांत येतें तेंही भ्रामक आहे. ज्या कामगारांची नोकरी कायमची आहे व ज्यांचा पगारही ठरींव रकमेंत असून बाजारभावाप्रमाणें त्यांत चढउतार होत नाहीं, तेवढ्या कामगारांचा थोडाबहुत फायदा यांत होईल. परंतु हिंदी कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांची नोकरी कारखान्याच्या भरभराटीवर अवलंबून असते. व ती भरभराट कारखान्यां-तील मालास येणाऱ्या किंमतीवर अवलंबून असते. परदेशांतून येणारा माल स्वस्त विकूं लागल्यास कारखानदारांना आपल्या मालाचीही किंमत उतरावी लागून कारखाना डबघाईस येतो आणि मजुरांची मजुरी कमी करणें अथवा कारखानाच बंद करणें यांतून कोणताही मार्ग कारखानदारानें स्वीकारिला तरी कामगारवर्गा-वरील संकट टळत नाहीं. अर्थातच शेतकरीवर्गाप्रमाणेंच कामकरीवर्गाचेंही यांत नुकसानच आहे.

शेतकरी व कामकरी यांना दुसऱ्या एका बाजूनें शह पोंचतो, तो असा कीं, शेतकरीवर्गाला पूर्वीच्या चलनी नाण्यांत ठरलेला खंड आतां नव्या भावानें द्यावा लागतो. आणि हे दोनही वर्ग प्रायः कर्जबाजारी असल्यानें मागील कर्जाची फेड नव्या भावानें करणें त्यांना अतिशय डोईजड होतें. हुंडणावळीचा भाव चढला अगर उतरला तरी त्या बरोबर सर्वच व्यवहारांतील देवघेव नव्या भावाशीं मेळ बसेल अशा प्रकारानें स्वाभाविकपणेंच बदलते. त्यामुळें हुंडणावळींत कांहीही फेरबदल झाला तरी त्यांत कोणाचें नफानुकसान नाहीं असलें धडधडीत चुकीचें प्रमेय सरकारकडून पुढें मांडण्यांत येतें. यांतील हेत्वाभास शोधून काढण्यास फारसा प्रयास नको. नाण्याच्या किंमतींत जो फेरफार होईल त्याची लाट समाजांतील अगदीं शेवटच्या टोंकापर्यंत पोंचण्याला अतिशय दीर्घकाल लागतो व तोंपर्यंत ज्या ज्या वर्गापर्यंत ती लाट येऊन पोंचली नाहीं त्यांचें नुकसान चालूच असतें. पण याशिवाय स्वतः सरकारनें जो शेतसारा अनेक वर्षांपूर्वी ठरविलेला असेल त्यांत कांहीं सरकार सूट देत नाहीं किंवा साऱ्याचे दरही कमी करीत नाहीं. त्याचप्रमाणें स्टँप, रेल्वे, पोस्ट, तार, मीठ, अफू इत्यादिकांचे जे दर सरकारनें पूर्वी ठरविले असतील तेही कांहीं हुंडणावळीबरोबर कमीजास्त होत नसतात आणि आजपर्यंतचा १६ पेन्सांचा रुपया १८ पेन्सांचा केल्यानें धर नमूद केलेला प्रत्येक प्रकारचा कर शेंकडा १२॥ टक्के वाढतो तितके टक्के त्या करांत सरकार सूट देणार आहे असेंही नाहीं; मग भावांत चढउतार झाल्यानें इतर सर्व देवघेवी त्यास अनुरूप अशाच स्वरूपानें होतात हें सरकारचें म्हणणें सरकारच्याच ठराविक करवसुलीवरून खोटें ठरत नाहीं काय ?

मग असला हा सर्वांस बाधक असा दर लोकांवर लादण्यांत सरकारचा हेतु तरी काय? असा प्रश्न स्वाभाविकच उपस्थित होतो. हा दर वाढल्यानें कोणकोणत्या वर्गांचा स्वार्थ साधतो त्याचें स्पष्टीकरण वर केलेंच असून त्यांत सरकार व त्यांचे भाईबंद हे येतात व तेवढ्यावरून यांत सरकारचा उद्देश कोणता आहे त्याचें अनुमान करतां येईल. कोणताही, कर अधिक वाढविण्याचें बिल पुढें न आणतां सगळे कर आपोआप १२॥ टक्के वाढल्यास सरकारची एवढी मोठी सोय होणार आहे कीं, तेवढ्याकरितां नोकरशाही आपली सर्व पुण्याई या करन्सी बिलापायीं खर्च करण्याला तयार झाली आहे. रुपयाचा भाव अठरा पेन्स कायद्यानें आज ठरल्यास ब्लॅकेटसाहेबांना जमाखर्चाची तोंडमिळवणी कशी होईल ही विवंचना केव्हांही करावयास नको. त्याचबरोबर विलायततेंतील कापडाचे, पोलादाचे व हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या इतर मालाचे कारखानदार यांनाही १२॥ टक्क्यांची आयतीच बचत होऊं लागल्यानें त्यांचीही विवंचना नाहींशी होईल. ली-कमिशननें येथील गोऱ्या अधिकाऱ्यांची आधींच चंगळ करून सोडली आहे पण तींत अठरा पेन्सांच्या दरानें फुकटंफाकट १२॥ टक्के आणखी भर पडणार आहे ! अशा रीतीनें स्टेट सेक्रेटरी, हिंदुस्थानसरकार व त्यांचा सगळा गोतावळा

याचें यांत हित साधणार असून विलायती कारखानदारांचे प्रतिस्पर्धी असे जे येथील कारखानदार ते आयतेच चिरडले जाणार आहेत. मग स्वार्थी सरकारनें असा इट्ट धरूं नये तर काय करावें ?

परंतु हुंडणावळीचा भाव सोळा पेन्स न ठेवतां अठरा पेन्स कायम ठेवण्यांत सरकारचा याच्याहीपेक्षां निराळा असा एक डाव आहे. या नव्या दरानें ज्यांचें ज्यांचें नुकसान होऊं लागेल त्यांतले कांहीं वर्ग कालांतरानें आपापले व्यवहार तदनुषंगानें करूं लागून आपल्यावरची आपत्ति दूर करूं शकतील कारण अशी विसंगतता फार दिवस राहूं शकत नाहीं. परंतु हिंदुस्थानांतील, चलनी नाण्याचें धोरण ठरविण्यांत विलायतसरकारला जें एक स्वार्थाचें धोरण कायमचें सांभाळावयाचें असतें तें साधण्याकरितां हा दुराग्रह चालू आहे. आतांपर्यंत आपण हुंडणावळीचा भाव सरकार इतके पेन्स ठरविणार आहे व तो इतके पेन्स असावा अशी भाषा वापरीत आलों. वास्तविक पहातां सरकारी कायद्यांत हुंडणावळ अमुक पेन्स असावी असें कोठेंच सांगितलेलें नसतें. सन१८९३ पूर्वी जेव्हां हिंदुस्थानांत चांदीची शुद्ध एक चलनपद्धति चालू होती, त्या वेळीं आमचें कायदेशीर चलन जो रुपया त्यांत किती ग्रेन शुद्ध चांदी असावी एवढेंच कायद्यानें ठरविलेलें असे. सन१८९८ सालापासून येथील चलनाची इंग्लंडांतील सॉव्हरीनशीं सांगड घातल्यानें एकचलनपद्धति सुटून द्विचलनपद्धति सुरू झाली व त्या वेळेपासून करन्सी ॲक्टांत रुपयाचा भाव इतके ग्रेन सोनें असा कायद्यानें ठरविण्यांत येऊं लागला. सन १८९८ सालीं जो करन्सी कायदा झाला त्यांत एक रुपया बरोबर ७·५३३४ इतकें ग्रेन सोनें असें ठरविण्यांत आलें व त्या हिशेबानें व्यवहारांत रुपयाचा भाव १६ पेन्स अंमलांत येऊं लागला. आतां सरकार आपल्या नव्या बिलांत असें नमूद करणार आहे कीं, रुपयाची किंमत ८·४७५१ इतकें ग्रेन सोनें असावी. आणि याचाच परिणाम रुपयाचा भाव १८ पेन्स असा व्यवहारांत होणार आहे. अर्थातच सरकारला १६ पेन्सांच्या भावापेक्षां १८ पेन्सांचा भाव किंवा शक्य तर त्याहूनही अधिक भाव कां पाहिजे याचें उत्तर वरील सोन्याच्या भावावरून सहज देतां येतें. ७॥ ग्रेन सोनें दिलें असतां खजिन्यांतून एक रुपया द्यावा कां ८॥ ग्रेन सोनें मिळालें असतां तो द्यावा असा प्रश्न कोणासही विचारल्यास सरकारच्या दृष्टीनें दर रुपयास ८॥ ग्रेन सोनें घेणें अधिक फायद्याचें आहे हें कोणीही सांगेल. हिंदुस्थानांतल्या नाण्याचा परदेशांतल्या नाण्याशीं बादरायणसंबंध जोडला गेला नसता आणि ज्या धातूचें नाणें त्याच धातूंत त्याची किंमत सांगितली गेली असती तर ती किंमत अमुकच असावी असा आग्रह धरण्यांत कोणाचेंच हित साधणार नसल्यामुळें असला प्रश्नच उपस्थित झाला नसता. पण नाणें चांदीचें व तें चालणार हिंदुस्थानांत आणि त्याची किंमत जी कायद्यानें ठरवावयाची ती सोन्यांत ठरवावयाची व त्यायोगानें विलायतेंतल्या सॉव्हरीनशीं त्याचें नातें जोडून द्यावयाचें असला हा द्राविडी प्राणायाम आहे ! यांत हिंदुस्थानांत

प्रत्यक्ष सोन्याचें नाणें चालू न करतां त्याचा आभास मात्र उत्पन्न करावयाचा आहे. पण त्यांतही परदेशांतून जितकें सोनें हिंदुस्थानांत कमी येईल, तितकें बरें असाही विलायतसरकारचा व विलायती व्यापाऱ्यांचा डाव आहे. हिंदुस्थानांतून विलायतेंत जो माल जातो त्यांतून विलायतेहून इकडे येणाऱ्या मालाची किंमत वजा केली असतां बाकी जेवढें येणें निघतें त्याची फेड इंग्लंडला हिंदुस्थानास सोनें देऊन करावी लागते आणि अशा रीतीनें हिंदुस्थानांत दरसाल कित्येक कोटींचें सोनें येत असतें. हिंदुस्थानाकडे वाहणारा हा सोन्याचा प्रवाह कमी तरी करावा किंवा तो परत विलायतेकडे वळेल असें तरी करावें अशी इंग्लंडची मनीषा आहे. यांतून पहिली गोष्ट इंग्लंडच्या हातची नसल्यानें तोच उद्देश दुसऱ्या प्रकारानें साधण्यासाठीं इंग्लंडची ही सगळी धडपड चालू आहे.

हिंदुस्थानांतून विलायतेंत जो माल जातो त्याच्या मोबदला मिळावयाच्या रकमेंतून परदेशांतून येणाऱ्या मालाची किंमत वजा करून बाकी राहिलेल्या किंमतीचें सोनें आम्हांस बिनहरकत मिळालें पाहिजे. पण स्टेट सेक्रेटरीनें हुंड्या विकून हें सोनें विलायतेंतच अडकवून ठेवावयाचें व हिंदुस्थानांत चांदीचें नाणें लोकांच्या हातीं द्यावयाचें असला व्यवहार सरकार करतें. स्टेट सेक्रेटरीनें आपल्या गरजेहून अधिक हुंड्या काढूं नयेत असें बॅबिंग्टन कमिटीनें सांगितलें आहे. तथापि स्टेट सेक्रेटरीनें ती गोष्ट मानली नाहीं. कारण या हुंड्यांमुळेंच हिंदुस्थानांत यावयाचें सोनें विलायतेंत राहतें. आतां हुंडणावळीचा भाव चढला किंवा उतरला तरी विलायतेंत गेलेल्या मालाची किंमत तेथील भावानें पूर्वीइतकीच होणार व हिंदुस्थानाला पूर्वी जितके पौंड मिळत होते तितकेच ते आतांही मिळणार. विलायती व्यापाऱ्यांनीं ते पौंड स्टेट सेक्रेटरीकडे भरले म्हणजे त्याच्याजवळही सोन्याचा सांठा पूर्वी जेवढा होत होता तेवढाच आतांही होणार. १६ पेन्सांचा भाव १८ पेन्स झाला म्हणून कांहीं विलायती व्यापारी मालाची किंमत १६ दशलक्ष पौंडांच्या ऐवजीं १८ दशलक्ष पौंड देत नाहींत; परंतु स्टेट सेक्रेटरीजवळ जमलेल्या या सोन्याच्या मोबदला हिंदुस्थानच्या खजिन्यावर हुंड्या देतांना पूर्वीचा सोळा पेन्सांचा भाव बदलून आतां जर तो अठरा पेन्स झाला असेल तर स्टेट सेक्रेटरीच्या हुंड्यांची हिंदी चलनांतली किंमत कमी होणार म्हणजे जेथें १५ कोटि रुपये आले असते तेथें ते १३$\frac{1}{3}$ कोटि मिळणार व तेवढेच रुपये विलायतेस माल पाठविणाऱ्या शेतकऱ्यांना मिळणार. अर्थातच यांत शेतकऱ्यांचें नुकसान खात्रीनें आहे, मात्र विलायती व्यापाऱ्यांचा कांहीं नफा नाहीं. पौंडांच्या मोबदला स्टेट सेक्रेटरीच्या हुंडीच्या नव्या भावानें रुपये कमी मिळतात म्हणून हिंदुस्थानांत सोनेंच आणावें म्हटल्यास हुंड्या घेतल्यानें येथील चलनांत जी भर पडणार ती पडेनाशी होते; व त्यामुळें हुंडणावळीचा भाव अधिकच चढतो व शेतकऱ्यांचें नुकसान वाढतच जातें. बरें, हुंड्या विकत न घेतां सोनें आणवून त्या सोन्याचें नाणें पाडून घ्यावें म्हटलें तरी पूर्वीप्रमाणें साडेसात ग्रेन

सोन्याला एक रुपया न मिळतां साडेआठ ग्रेन सोनें द्यावें तेव्हां एक रुपया मिळणार आणि शिवाय विलायतेंतून येथपर्यंत सोनें आणण्याचा खर्च सोसावा लागणार तो वेगळाच. याकरितां व्यापारी लोक होतां होईतों प्रत्यक्ष सोनें न आणवितां स्टेट सेक्रेटरींच्या हुंड्याच विकत घेण्याचें यत्करतात व अशा रीतीनें हिंदुस्थानांत यावयाचा सोन्याचा बराचसा ओघ विलायतेंत अडविला जातो. हुंडणावळीचा भाव जितका अधिक असेल, तितका हा ओघ अडविण्यास अधिक सोईचा होतो आणि याकरितांच हुंडणावळीचा भाव बाजारभावाहून अधिक राखण्याची विलायतसरकारची व हिंदुस्थानसरकारची धडपड चालू असते. हिंदुस्थानांतून निर्गत होणाऱ्या मालाच्या किंमतींत व हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या मालाच्या किंमतींत जितकें अंतर कमी पडेल आणि जेणेंकरून प्रत्यक्ष सोनें हिंदुस्थानांत येण्याचें टळेल तितकें इंग्लंडला हितावहच वाटणार आहे. आणि हुंडणावळीचा भाव चढल्यानें हें अंतर कमी होत जातें. कारण आयात माल स्वस्त होऊन त्याचा खप इकडे अधिक होऊं लागतो आणि त्यामुळें देशी कारखाने बंद झाले कीं परदेशी मालाची कायमची वरणी लागते. उलट पक्षीं, निर्गत मालाची किंमत उतरल्यानें पूर्वी जेवढी रोकड शेतकऱ्यांच्या हातीं येत असे तेवढी येईनाशी होऊन त्यांनाही आपल्या शिलकेंतून नवीन चांदीसोनें खरेदी करण्यास सवड रहात नाहीं, अशा रीतीनें हुंडणावळीच्या चढत्या भावानें एखाद्या वर्गाचें तात्पुरतें नुकसान होतें असें नसून हिंदुस्थानासारख्या कृषिप्रधान अशा देशाचें कायमचें नुकसान होतें; कारण त्यास आपले उद्योगधंदे वाढविण्यास या चढत्या भावानें सवलत मुळींच न मिळतां उलट त्याच्या मार्गांत अडचणीच येऊन उभ्या राहतात. याकरितां ब्लॅकेट साहेबांचें बिल मान्य करून १८ पेन्सांच्या भावाला संमति देणें म्हणजे येथील शेतकरी, कारखानदार आणि कर भरणारे लोक यांचा घात करण्याचें पाप त्यांत असून परदेशी कामगार, सरकार व परकी व्यापारी यांची चंगळ चालविण्यास मदत करण्यासारखें होणार आहे. असल्या बिलास लोकनियुक्त खासदार व नामदार संमति देणार काय ?

# इंडियन करन्सी लीग

## संस्थेचे उद्देश

### उद्देश

१ हिंदुस्थानच्या हितसंबंधास पोषक होईल अशी चलनपद्धति अस्तित्वांत यावी ह्या हेतूनें चलनविषयक प्रश्नांचा पद्धतशीरपणें व निःपक्षपातबुद्धीनें अभ्यास करण्यास लोकांस उत्तेजन देऊन त्यांस जरूर त्या सोई उपलब्ध करून देणें.

२ हिंदुस्थानांत सुवर्णमूल्यमापनपद्धति अस्तित्वांत येण्याची व सोन्याचें नाणें चलन म्हणून वापरलें जाण्याची आवश्यकता लोकांस पटवून देणें; व मध्यवर्ती कायदेमंडळानें ही गोष्ट घडवून आणण्या-करितां पुढील उपाय तावडतोब योजावे अशी खटपट करणें.

(अ) इंग्लंडांतील सॉव्हरीनच्या वजनाचें व तितक्याच कसोटी-च्या सोन्याचें स्वतंत्र व प्रमाणभूत हिंदी नाणें ठरवून त्याचें रुपयाशीं १:१५ हें प्रमाण मुक्रर करणें.

(ब) तसेंच सोनें देऊन सोन्याचें नाणें मिळविण्यास सर्वांस मुभा असावी, ह्यास्तव हिंदुस्थानांत टांकसाळ प्रस्थापित करणें व ज्या पद्धतीनें इंग्लंडमधील सरकारी टांकसाळींत सोन्याचीं नाणीं पाडून देण्याची व्यवस्था केलेली आहे तीच पद्धत येथें चालू करणें.

नवें सोन्याचें नाणें पाडून देणारी टांकसाळ प्रस्थापित झाली तरी सध्यां प्रचलित असलेले रुपये अगर नोटा ह्या देऊन त्यांच्या मोबदला सरकारकडून सोन्याचें नाणें मिळालेंच पाहिजे अशी चलनखात्याच्या अधिकाऱ्यांवर कायद्यानें सक्ति करूं नये.

### तात्कालिक उद्दिष्ट

करन्सी कमिशननें १ शिलिंग ६ पेन्स ह्या दरावर हुंडणावळ स्थिर करावी अशी जी बहुमतानें सूचना केली आहे ती नुकसान-कारक असून सर पुरुषोत्तमदास यांनीं आपल्या भिन्नमतप्रदर्शक पत्रिकेंत १ शिलिंग ४ पेन्स या दराबद्दल जी शिफारस केली आहे ती हिंदुस्थानास हितावह आहे, हें लोकांस समजून सांगणें.

'इंडियन करन्सी लीग-महाराष्ट्र शाखा', ह्या संस्थेमार्फत हिंदी चलनविषयक प्रश्नासंबंधीं निरनिराळीं पत्रकें प्रसिद्ध होतात. राष्ट्रीय महत्त्वाच्या ह्या प्रश्नाचा सर्वत्र अभ्यास होऊन त्यासंबंधीं यथार्थ ज्ञान महाराष्ट्रांतील बहुजनसमाजांत पसरणें अत्यंत अवश्य आहे. म्हणून ज्यांस हिंदी चलनपद्धतीची माहिती करून घेण्याची इच्छा असेल त्यांस हीं पत्रकें वांटण्याची व्यवस्था केलेली आहे. तरी गरजूंनीं खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकीट पाठवून मागणी केल्यास त्यांस तीं पत्रकें पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.

**प्रो० दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम्. ए.**

फर्ग्युसन कॉलेज,

**पुणें ( Deccan Gymkhana.)**

किंवा

**सेक्रेटरी, इंडियन करन्सी लीग- महाराष्ट्र शाखा,**

**गायकवाडवाडा, नारायण पेठ, पुणें.**

इंडियन करन्सी लीग–महाराष्ट्रशाखा

## पत्रक नं. ५

# हुंडणावळीचें स्वरूप


लेखक

श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर

बी. ए., एल्एल्. बी., एम्. एल्. ए.,

संपादक केसरी



अनंत सखाराम गोखले, 'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें यांनीं छापिलें

तें दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम्. ए.: सेक्रेटरी, इंडियन करन्सी

लीग–महाराष्ट्रशाखा, यांनीं पुणें, पेठ नारायण,

गायकवाडवाडा येथें प्रसिद्ध केलें.

## पूर्वीं प्रसिद्ध झालेलीं पत्रकें

पत्रक १ लें

### करन्सी कमिशनच्या शिफारसी

पत्रक २ रें

### हुंडणावळीच्या दरासंबंधीं वाद

पत्रक ३ रें

### अठराविरुद्ध सोळा पेन्सांचा लढा

पत्रक ४ थें

### चलनी नाण्याचा चालू वाद

# हुंडणावळीचें स्वरूप

करन्सी कमिशनचा रिपोर्ट बाहेर पडला. सरकारनेंही असें प्रसिद्ध केलें कीं, या रिपोर्टांतील सूचना एकंदरीनें आम्हीं मान्य केल्या आहेत. अर्थात् कमिशनचें म्हणणें तेंच सरकारचें म्हणणें असें या क्षणीं घेऊन चालण्यास हरकत नाहीं. म्हणून कमिशनचें किंवा सरकारचें म्हणणें हुंडणावळीसंबंधानें व चलनीपद्धतीसंबंधानें काय आहे हें मांडून त्यावर लोकांचें म्हणणें काय आहे हें त्याखालीं उत्तरादाखल दिलें आहे. अशा प्रश्नोत्तररूपानें हुंडणावळीच्या वादांतील मुख्य मुद्दे वाचकांच्या लक्षांत येणें सुलभ होईल असें वाटल्यावरून ही पद्धति स्वीकारली आहे.

सरकार—हल्लींची हुंडणावळीची पद्धत फार घोंटाळ्याची झाली आहे.

लोक—यांत नवें काय सांगितलेंत ? आम्ही आज इतकीं वर्षें तेंच म्हणत आलों आहोंत. पण आमचें ऐकतो कोण ? सगळी सत्ता तुमच्या हातीं; मनासारखें करून घेण्याची सत्ता तर राहोच, पण म्हणणें काय आहे तें मांडण्याची सवडही आम्हांला नव्हती. हवा तसा कारभार करून हवी तशी सत्ता चालवून घोंटाळा केलांत आणि आतां फिरून मोठा घोंटाळा माजला आहे असें मानभावीपणानें म्हणतां, तेव्हां तुमच्याइतके निर्लज्ज तुम्हीच. ज्या ज्या गोष्टींनीं घोंटाळा झाला त्यांपैकीं प्रत्येक गोष्ट घडण्याच्या वेळीं लोकांनीं तुम्हांला असें करूं नका म्हणून विनविलें होतें व बजावलेंही होतें. तुमच्या हातून घडलेल्या चुका आणि तुम्हीं वेळोवेळीं केलेले लोकमताचे अपमान यांचा ग्रंथ लिहिला तर तो महाभारताएवढा होईल.

सरकार—पण त्या महाभारताचा उपसंहार होण्याची वेळ आतां करन्सी कमिशनानें आणलेली आहे. मग उगीच कां रागावतां ?

लोक—तुम्ही याला उपसंहार म्हणतां; पण आम्ही तर म्हणतों कीं, शुद्ध शास्त्रीय चलनपद्धतीचा संहारच होण्याची वेळ कमिशनानें आणून ठेवलेली आहे.

सरकार—ती कशी ?

लोक—असें पाहा कीं, कमिशनच्या पुष्कळशा सूचना घातुक आहेत आणि सर्वांत मोठी गोष्ट ही कीं, सोन्याचें नाणें परदेशी का होईना. पांच वर्षांपूर्वीपर्यंत देशांत येत होतें, चालत होतं, बाहेर पाठवितां येत होतं तेंही आतां तुम्ही बंद करणार. देशांत टांकसाळ घालून सोन्याचें नाणें पाडण्याच्या सनातन व सर्वसंमत कल्पनेला तर तुम्ही हरताळच फांसण्याचा बेत केलेला दिसतो. देशांत सोनें सांठविणार, पण त्याचा प्रत्यक्ष उपयोग लोकांना सर्रास करूं देणार नाहीं. आजवर लोकांना कागदी नोटांच्या मोबदला चलनी रुपये तिजोरींतून मिळत होते. तेही थापुडे

मिळण्याचें बंद करणार. तात्पर्य, लोकांनीं हातांत नुसते नोटांचे छापील कागद खेळवावे व खोटेंच नव्हे, पण कृत्रिम किंमतीचें रुप्याचें नाणें गळ्याशीं बांधून बसावयाचें असा प्रकार तुम्ही करून सोडणार. हें सर्व करावयाचें होतें तर एवढा कमिशनचा खटाटोप कशाला केलांत ? असला बदसल्लागार पाहावयाचा तर तो सरकारला आपल्या गोऱ्या नोकरवर्गांत किंवा इकडील गोऱ्या व्यापारीवर्गांत कोणीही सहज मिळाला असता. पण तुमची रीतच अशी आहे कीं, तुम्ही कोणाला मूठ मारावयाला बसला तरी आधीं पाट-रांगोळ्या करून पुण्याहवाचन मांडाल. कमिशन नेमून केव्हां काय घडवून आणावयाचें हें सर बेसिल ब्लॅकेट यांचें आधींच ठरलें होतें. पण एखादें कमिशन नेमलें आणि आम्ही कमिशनच्या शिफारशींप्रमाणें वागलों असें म्हटलें म्हणजे भोळ्या लोकांना भूल पडते हें सरकारला अनुभवानें माहीत आहे, म्हणून हा कमिशनचा खटाटोप ! पण कोणा कमिशनाच्या झाल्या तरी सर्व शिफारशी तुम्ही अमलांत आणतां असें थोडेंच आहे ? १८९८ च्या फाउलर कमिटीच्या सूचना तुम्हीं कितीशा अमलांत आणल्या ? तीच गोष्ट थोडथोडी इतर कमिट्या व कमिशनें यांची. आजवर पांचसहा कमिट्या या विषयाकरितां नेमल्या गेल्या; पण त्यांच्या शिफारशींपैकीं हिंदुस्थानाच्या अनहिताचें काय हें तुम्हीं कसें नक्की शोधून काढलें व तेवढेंच अमलांत आणलें ! कांहीं लोकांना असा दृष्टिदोष असतो कीं, सात रंगांपैकीं नेमके अमुक तेवढे त्यांच्या डोळ्यांना दिसतात, बाकीचे दिसतच नाहींत.

सरकार—फाउलर कमिटीच्या सूचनेप्रमाणें हिंदुस्थानांत टांकसाळ घालून सोन्याचें नाणें पाडण्यास अद्याप सुरुवात झाली नाहीं हाच ना तुमचा एक आक्षेप ?

लोक—होय, उदाहरण बरोबर दिलेंत. पण तो नुसता एक आक्षेप नसून मुख्यच आक्षेप आहे. कारण, फाउलर कमिटीचीही ही एक सूचना अमलांत येती तर तेव्हांपासून आज तीस वर्षें हुंडणावळीचा हा जो घोंटाळा माजला आहे तो सर्व टळता व त्या अवधींत हिंदुस्थानचें जें कोट्यवधि रुपयांचें नुकसान झालें तें वांचलें असतें.

सरकार—पण या बाबतींत तरी तुम्हीं हिंदुस्थानसरकाराला दोष देऊं नये. कारण आम्ही टांकसाळ घालून सोन्याचें नाणें प्रचलित करण्याला एका पायावर तयार होतों, पण तसें करण्याला आम्हांला आमच्या वरिष्ठ विलायतसरकाराकडूनच हरकत झाली.

लोक—तुम्ही म्हणतां तें कांहींसें खरें आहे. तुम्हांला झाला तरी आम्ही अन्यायानें बोल ठेवणार नाहीं. कारण जुने कागद-पत्र पाहतां आम्हांला हें माहीत झालें आहे कीं, एकंदरीनें हिंदुस्थानसरकार टांकसाळ घालून सोन्याचें नाणें चालू करण्याला स्वतः तयार होतें. सर रिचर्ड टेंपल हिंदुस्थानसरकारचे पन्नास वर्षांपूर्वींचे फडणवीस(१८७२), यांनीं सोन्याच्या नाण्यासंबंधानें पुष्कळच आग्रह धरला व तेव्हांपासून आजपर्यंतची परंपरा पाहिली तर तुम्हींही हिंदुस्थानसरकारच्या सोन्याच्या

नाण्याला अनुकूल असण्याची परंपरा राखली आहे, ही गोष्ट खरी. फार काय, पण ही परंपरा राहावी म्हणूनच कीं काय, तुमच्या चलनखात्याचे मुख्य अधिकारी मि० डेनिंग यांनीं आणि सर बेसिल ब्लॅकेट यांनीही हल्लींच्या करन्सी-कमिशनापुढें सोन्याच्या नाण्याला अनुकूल अशीच पुरशीस मांडलेली होती. पण तींतही जातां जातां एक धक्का देऊन सुवर्णचलनाचा हा मनोरा ढांसळून पाडण्याची त्यांनीं एक युक्ति केली आहे. तिच्यासंबंधानें पुढें वेगळें बोलूं. पण तूर्त इतकें म्हणण्यास आम्ही तयार आहों कीं, सोन्याचें नाणें चालू होऊन हुंडणावळीचा सगळा घोंटाळा मोडावा, चलनपद्धतीला स्थिरता आणावी व याकरितां थोडीबहूत झीज सोसावी लागली तरी ती सोसावी अशाच मताचें तुम्ही हिंदुस्थानसरकार असतां स्टेटसेक्रेटरी दरवेळीं या योजनेला आडवे पडत व त्यांनीं तुमचेंही कांहीं चालू दिलें नाहीं.

सरकार—पण तुमच्या कानांत म्हणून सांगतों, स्टेटसेक्रेटरीला बिचाऱ्याला कां दोष देतां ? त्याच्याही डोक्यावर ब्रिटिश प्रधानमंडळ बसलें आहे. त्यानें म्हणजे ब्रिटिश खजिनाखात्यानें हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें चालू करण्याला काय थोडें विघ्न आणलें ?

लोक—ठीक बोललां. पण गुन्हेगारांची माळच लावावयाची तर तेथें तरी कां थांबतां ? बिचारें प्रधानमंडळ तरी काय करणार ? त्याच्याही डोक्यावर विलायती व्यापारी लोकांचें सल्लागारमंडळ आहे. त्याला हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें चालू झालेलें पाहवत नाहीं. त्याला कोण काय करणार ? शेळीचे कान गोसाव्याच्या हातीं हीच म्हण खरी. आम्ही हिंदुस्थानचे लोक हीच गरीब बिचारी शेळी आणि खरा गोसावडा म्हणजे विलायतेचें स्वार्थी, हुषार व दक्ष व्यापारी-मंडळ. हें सारें खरें; पण तुम्ही हिंदुस्थानसरकारनें तरी या बाबतींत सत्याग्रह कितीसा केला ! हुंडणावळीची नड आम्हां लोकांना व्यवहारांत नडते तशीच ती तुम्हांला वार्षिक जमाखर्चाचा मेळ घालतांना नडते. पण कोणता व्हाइसरॉय किंवा फडणवीस आपलें चालत नाहीं म्हणून राजिनामा देण्याला तयार झाला ? ही तुमची कर्तव्यनिष्ठा आणि ही जबाबदारीची जाणीव ! तुमचें हें जबाबदारीचें ढोंग पाहिलें म्हणजे आमच्या इकडील मुलींच्या खेळांतील टक्क्याच्या खेळाची आठवण होते. चारपांच मुली मिळून टक्का तर लपवितात व लांबवितातच; पण विचारावयाला गेलें म्हणजे एक दुसरीचें नांव, दुसरी तिसरीचें नांव, तिसरी चौथीचें नांव घेते. अशा रीतीनें टक्का आणि चोरीचा आरोप यांची एकत्र गांठ कधींच पडत नाहीं. ग्रीक पुराणांत तीन देवता बहिणी होत्या आणि तिघींना मिळून देवानें एकच डोळा दिलेला होता. कोणाचा घातपात करावयाचा झाल्यास यांच्यांतील कोणीही तो डोळा मागून घेऊन व घालून आपलें काम करी. पण कोणी त्याबद्दल जबाबदार धरूं लागला कीं, तो डोळा दुसरीला देऊन करणारी स्वतः नामानिराळीच ! हिंदुस्थानसरकार, स्टेट-सेक्रेटरी, प्रधानमंडळ आणि विलायती व्यापारी यांचा हा असा डोळस-आंधळ्या बहिणींचा कारभार आहे.

सगळ्यांचा मिळून डाव एकच; तो हा कीं, हिंदुस्थानांतील लोकांना सोनें सरास मिळूं द्यावयाचें नाहीं.

सरकार—पण हल्लींच्या कमिशनानें तर आतां लोकांना हक्कानें सोनें सरकारकडून मागतां यावें अशी व्यवस्था सुचविली आहे कीं नाहीं? तसेंच रुप्याच्या मुख्य नाण्याला सोन्याच्या किंमतीचें प्रमाण जोडण्याचेंही सुचविलें आहेच कीं नाहीं?

लोक—सूचना आम्हीं वाचल्या आहेत. पण त्या दोनही निरर्थकच आहेत. एक तर सरकार रुपये घेऊन कोणालाही सोनें देणार नसून कमींत कमी चारशें औंस म्हणजे एक हजार तोळे एकदम घेणाराला देणार. एक हजार तोळे सोनें म्हणजे सुमारें २१।२२ हजार रुपये होतात. इतकें सोनें व्यक्तिशः घेणारे धनत्तर घेवारी कितीसे निघणार? या सोन्याचा उपयोग परदेशी व्यापाराची किंमत पटविण्याकरितां होईल. पण त्यानें खरी नड निघून जात नाहीं. रुपयाची किंमत सोन्याच्या किंमतीला जोडली जाणार हें खरें, पण हा नुसता कागदी मेळ आहे. यांत प्रत्यक्ष सोनें कोठेंच नाहीं. समजा, रुपयाची किंमत उद्यां सोळा पेन्सांनीं किंवा अठरा पेन्सांनीं विकत मिळणाऱ्या सोन्याइतकी ठरली तरी सरकार जेव्हां रुपया घेऊन त्या किंमतीचें सोनें द्यावयाला किंवा त्या किंमतीचें सोनें घेऊन रुपया द्यावयाला खजिन्याच्या अधिकाऱ्यांना सरास हुकूम देईल तेव्हांच रुपयाची ही सोन्यांतील किंमत खरी ठरणार. पण हें जोंपर्यंत प्रत्यक्ष व्यवहारांत घडत नाहीं तोंपर्यंत रुपयाची किंमत १६ पेन्स ठरविली काय अगर १८ पेन्स ठरविली काय सारखीच. एखाद्यानें घरच्या मुलाचें नांव सोन्या असें ठेविलें व त्याची कुंची दुसऱ्या एखाद्या मुलाला दिली आणि प्रौढी मिरविली कीं मीं गरिबाला सोन्याची कुंची दिली तरी ती जितकी फुकट तितकीच रुप्याची किंमत सोन्यांत ठरविणें हें फुकट आहे. सांकेतिक शब्दांची भाषा तो संकेत ठरविणारांना कदाचित् कळेल; पण सांकेतिक शब्दांचा अर्थ सार्वजनिक नसल्याकारणानें कृत्रिम व फुकट ठरतो. त्यांतलाच हाही प्रकार आहे. सोन्याचें नाणें बनविलें तर त्याच्या किंमतीचा मेळ सोन्याशीं घालणें सयुक्तिक होईल. तसेंच रुपयाचें नाणें व रुप्याची किंमत यांचा मेळ घालणें हें ठीक होईल. कारण सोन्या-चांदीचे बाजारभाव कमीजास्ती होत असले तरी नाण्यांत कांहीं तरी खरेपणा आहे असें कोणीही म्हणेल. पण आधीं रुपयाचें नाणें कृत्रिम म्हणजे त्याच्या व त्यांतील चांदीच्या किंमतीला बरोबर मेळ नाहीं. मग सोन्याच्या किंमतीशीं मेळ बसणें दूरच

सरकार—पण असे एक घाव दोन तुकडे करण्यांत काय अर्थ? कमिशनाची विचारसरणी पहा व त्याच्या एकेक शिफारशीला बरें किंवा वाईट काय म्हणावयाचें तें म्हणा.

लोक—ठीक आहे. तुम्ही एक एक मुद्दा मांडा म्हणजे बरें-वाईट काय हें आम्हीही सांगण्यास तयार आहों.

सरकार—कामिशनानें हल्लींच्या पद्धतीला दोष दिला आहे कीं नाहीं ?

लोक—यांत आमचें व कमिशनचें मत जुळतें.

सरकार—कमिशन म्हणतें कीं, रुप्याची किंमत सोन्यांत किती केव्हां मानावयाची याला कांहीं ठराविक नियम आजवर नव्हता. अमुक इतकी किंमत मानूंच असें सरकारनें आपलें धोरण निश्चित केलें नव्हतें. निदान तसा जाहिरनामा काढला नव्हता.

लोक—बरोबर आहे. रुप्याच्या नाण्यासंबंधानें वेळोवेळीं जे कायदे करण्यांत आले तेवढ्यांवरूनच त्यांच्या धोरणाचें काय अनुमान निघेल तितकेंच कोणींही समजावें. पण तुम्ही तरी आतां जास्त काय सुचवीत आहां ? पूर्वी एक वेळ रुपयांत ११ ग्रेन सोनें आहे असें समजावें असा कायदा होता. तो आतां रुपयांत ८॥ ग्रेन सोनें आहे, असा ठराव करण्याचें बिल सर बेसिल ब्लॅकेट यांनीं पुढें आणलें आहे. पण रुप्याची किंमत किंवा सोन्याची किंमत ठरविणें हें सरकारच्याही हातीं नसल्यामुळें रुप्याचें व सोन्याचें हें प्रमाण यापुढेंही कागदांतच राहणार. कायद्यांत हें प्रमाण कितीही असलें तरी त्यानें रुपयाचा व सोन्याचा मेळ कायद्याच्या हिशेबानें पडला तरी प्रत्यक्ष व्यवहारांत पडत नाहीं. कारण सोन्यारुप्याच्या किंमतींत फेरफार झाल्यास विलायती सरकारनें हिंदुस्थानसरकारवर, हिंदुस्थानसरकारनें विलायतसरकारवर हुंड्या केव्हां, किती व कोणत्या भावानें विकाव्या याला कायदेशीर बंधन नाहीं. रुपयाचा भाव १६ पेन्स ठरविला काय, १८ ठरविला काय किंवा २४ ठरविला काय तो सारखाच. हुंडणावळीचा कायदेशीर भाव म्हणजे रुपयाची सोन्यांत ठरविलेली किंमत टिकविण्यासाठीं सरकार हवा तो प्रयत्न करतें. पण त्यांची हुकमत जगांतील सोन्याचांदीच्या व्यवहारावर चालत नाहीं, म्हणून त्यांचा हा प्रयत्न कांहीं मर्यादेपलीकडे सफळ होऊं शकत नाहीं. महायुद्धांत १६ पेन्सांचा भाव २४ वर सरकारनें नेला व पौंडाची किंमत १५ रुपये होती ती १० रुपये ठरविली. परंतु हा प्रयत्न फुकट गेला. अवघ्या सहा महिन्यांत हुंडणावळीचे भाव बारसहा वेळां बदलले. १९२० सालीं रुपयाचा भाव २४ पेन्स ठरविण्यांत आला, पण बाजारांत तो १६ पेन्सांइतका खालीं उतरला. १९२४ सालीं तो चढूं लागला व १८ पेन्सांवर येऊन बसला. तात्पर्य, हुंडणावळीचा भाव तर सरकारास पक्का डांबून ठेवता आला नाहींच, पण उलटसुलट हुंड्या विकून तो डांबून ठेवण्याच्या प्रयत्नांत हिंदुस्थानाच्या तिजोरीला नुकसान पुष्कळ आलें.

सरकार—पण पेपरकरन्सी रिझर्व्ह आणि गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह या नांवाच्या दोन गंगाजळी वरील कामाकरितांच निर्माण करण्यांत आल्या होत्या तेव्हां त्यांचा उपयोग त्या कामाकडे केला यांत काय चुकलें ?

लोक—वास्तविक दोनही गंगाजळींचा उद्देश मूळ हुंडणावळ स्थिर करण्याचा नव्हता. पहिल्या गंगाजळीचा हेतु चलनी नोटांना केव्हांही भरपूर तारण राहावें

म्हणजे एकदम पुष्कळ नोटा खजिन्यांत परत आल्या तर त्याच्या मोबदला रुपये देण्याला साधन राहावें हा होता. पण हें तारण एकंदर चलनी नोटांच्या मानानें जितकें भरपूर राहावयास पाहिजे तितकें तें ठेवलें गेलेलें नाहीं. किंबहुना विलायते-पेक्षांही हिंदुस्थानांतील नोटांना हें तारण नेहमीं कमी पडलें आहे. तें पहिल्यापासून भरपूर ठेवण्यांत आलें असतें तर रुप्याच्या किंमतीची पर्वा न करतांही मनास वाटतील तितके रुपये पाडण्याचा प्रघात सरकारनें ठेवला तो ठेवावा लागला नसता. शिवाय या गंगाजळीचा उपयोग फक्त देशांतील अंतर्गत चलन सुरक्षित ठेवण्याचा असतां सरकारनें त्या गंगाजळींतील ठेवीचा उपयोग केव्हां केव्हां हुंडणावळ स्थिर करण्याकडे केला.

सरकार—पण गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह या गंगाजळीचा उपयोग तरी हुंडणावळ स्थिर करण्याचाच होता कीं नाहीं ?

लोक—होय. पण या गंगाजळीचा हेतु सरकानें नेहमीं एकच ठेवला नाहीं. केव्हां म्हणावें कीं, तिचा उपयोग हुंडणावळ स्थिर करण्याचा आहे. आणि हुंडणावळ स्थिर आहे या सबबीवर तिच्यावर व्याज मिळवून उत्पन्नांत भर टाकण्याचा व खर्चाचीं तोंडें मिळविण्याचा सरकारनें प्रयत्न केला ! केव्हां म्हणावें कीं, या गंगाजळीचा उपयोग ती तुडुंब फुगवून पुढेंमागें लवकरच देशांत सोन्याचें नाणें चालू करण्याकरितां करावयाचा आहे. पण हुंडणावळींत इतर कारणांनीं चलबिचल झाली कीं स्वतः ठरविलेला हुंडणावळीचा दर स्थिर करण्याकरितां या गंगाजळींतील रकमेचा उपयोग हव्या तशा हुंड्या देण्याकडे सरकारनें केला व त्या वेळीं पुढें सोन्याचें नाणें करण्या-करितां ही गंगाजळी आहे या दिखाऊ हेतूचाही त्यांना विसर पडला.

सरकार—मग हुंडणावळ स्थिर करणें हें तरी सरकारचें कर्तव्यच आहे कीं नाहीं !

लोक—सरकार इतर अनेक उपद्व्यापांना कर्तव्य हें गोंडस नांव ठेवतें त्यांतलाच हा एक प्रकार आहे. गंगाजळीचा ऐवज खर्च केल्यास हुंडणावळीचा दर स्थिर करतां येईल हा सरकारचा भ्रम आहे व याचा त्यांना आजवर काय थोडा अनुभव आला? उलट या उपद्व्यापानें हिंदुस्थानाचें पांचपन्नास कोटी रुपयांचें नुकसान मात्र झालें. येऊनजाऊन सोन्याला येण्याजाण्याला मुक्तद्वार ठेवलें आणि लोकांना सोन्याऐवजीं नाणें व नाण्याऐवजीं सोनें असा मोबदला सर्रास देतां येत असला म्हणजे हुंडणावळ शक्य तितकी स्थिर आपोआप होते. पण हा स्वाभाविक सरळ मार्ग टाकून भलता मार्ग सरकारनें पत्करला तेव्हां असेंच व्हावयाचें. बरें, हुंड्या विकतांना तरी स्टेट सेक्रे-टरीनें फक्त आपल्या खर्चापुरत्या हुंड्या विकाव्या. पण तें न करतां ज्याप्रमाणें हव्या तितक्या हुंड्या विलायती व्यापाऱ्यांच्या सोईकरितां विकल्या, त्याचप्रमाणें हिंदुस्थान-सरकारनें उलट्या हुंड्या विकतांना दरांत आपला नफा आहे कीं तोटा आहे याचाही पुष्कळ वेळां विचार ठेवला नाहीं. पंधरा किंवा तेरा रुपयांनीं पौंड खरेदी केला आणि तोच दहा किंवा सात रुपयांनीं विकला तर हा काय व्यापार झाला ! साधु तुकाराम-

बुवांनीं केलेल्या व्यापारापेक्षांही हा व्यापार तोट्याचा नव्हे काय? पण तुकारामबुवा हे साधु तरी होते. हुंड्या विकण्याच्या सरकारी व्यापाराचें हें यंत्र मात्र असें आहे कीं, तें भोळसर मनुष्यही बिघडवूं शकतो; मग स्वार्थी दुष्ट मनुष्य तें बिघडवून टाकील यांत काय आश्चर्य? पण गंगाजळी आयती विलायतेंत ठेवलेली, मग आपल्या देशबांधवांचा फुकट फायदा करून देण्याचा मोह सरकारला कां आवरावा? झालें तर हिंदुस्थानाचेंच परस्पर नुकसान होईल.

सरकार—पण हिंदुस्थानांत रुप्याचें नाणें पाडण्याकरितां वगैरे सरकारला विलायतेंत रुपें खरेदी करावें लागतें त्याला आयता तेथल्या तेथेंच या गंगाजळींतला हा पैसा उपयोगी पडतो हा फायदा नव्हे काय?

लोक—पण विलायतेंत स्टेट सेक्रेटरीनें गुप्तपणानें दलालामार्फत आमच्याकरितां रुपें खरेदी करावेंच कशाला? जाहीर नोटीस देऊन टेंडरें मागवून व्यापाऱ्यांत चढाओढ लावून धरबसल्या हिंदुस्थानांत रुपें विकत मिळण्यासारखें आहे, तेव्हां हा विलायतेंतील व्यवहार कशाला?

सरकार—बरें, स्टेट-सेक्रेटरीच्या खर्चाकरितां विलायतेंत तजवीज व्हावयाला पाहिजे. ती विलायतेंतल्या विलायतेंत सोनें घेऊन त्याच्या मोबदला इकडे रुपये देवविल्यानें होत नाहीं काय?

लोक—पण तेथें घेतलेलें सोनें तेथेंच खर्च व्हावयाचें असलें. त्याची भर गंगाजळींत पडत नाहीं. गंगाजळी निर्माण होण्यापूर्वीं ज्या पद्धतीनें स्टेट-सेक्रेटरीचा खर्च भागत होता तसाच गंगाजळी नसती तरी भागवितां आला असता. स्टेट-सेक्रेटरीनें आपल्या खर्चापेक्षां अधिक हुंड्या सोडून त्याऐवजीं मिळणारें सोनें गंगाजळींत अधिक भरतीला घालतां येतें असें म्हणाल तर तेंही फुकट. कारण अशा रीतीनें या गंगाजळीची भर करावी असा ती निर्माण करतांनाही हेतु नव्हता.

सरकार—पण हिंदुस्थानांत एखाद्या वेळीं दुष्काळ पडला आणि हिंदुस्थानांतून विलायतेस जाणाऱ्या मालाच्या किंमतीपेक्षां तिकडून इकडे येणाऱ्या मालाची किंमत एखाद वेळ अधिक भरली आणि तें व्यापारी देणें विलायतेंत देण्याची गरज पडली तर गंगाजळीचा आयता उपयोग होतो कीं नाहीं?

लोक—अशी गोष्ट झालीच तर क्वचित् होते. ती नेहमीं घडणारी नाहीं. अर्थात् अपवादात्मक प्रसंगाकरितां नित्य नियमानें अशुद्ध गोष्ट करीत रहावें हा न्याय कोठला? इतर देशांच्या परस्पर व्यापारांत उलटसुलट देणें केव्हां केव्हां निघतेंच. पण त्या वेळेपुरतें सोनें वगैरे पाठवून हिशेब पुरा करण्यांत येतो. अशा कामाकरितां इतर कोणा राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रांतून गंगाजळी ठेवल्या आहेत काय? आमचा माल किंमतीनें अधिक भरतो, तेव्हां विलायती व्यापारी जसें आम्हांला सोनें देऊन हिशेब पुरा करतात, तसाच उलटा प्रसंग आल्यास आम्हीही करूं.

*

सरकार—पण गंगाजळी ती गंगाजळी आणि तिचा हुंडणावळीशीं संबंध; मग ती हिंदुस्थानांतल्यापेक्षां विलायतेंतच असलेली अधिक बरें नव्हे काय ?

लोक—याचें उत्तर अगदीं सोपें आहे. जेथें गंगा तेथेंच गंगाजळी असली पाहिजे हें अगदीं उघड आहे. गोल्ड स्टँडर्ड रिझर्वच्या गंगाजळींतील पाणी हिंदुस्थानांतील लोकांना रुप्याचें नाणें पाडून दिल्यामुळें होणाऱ्या नफ्यांतून येतें, मग ती गंगाजळी त्या लोकांच्या फायद्याकरितां हिंदुस्थानांतच रहावयास नको काय ?

सरकार—पण विलायतेंत ती ठेवल्यानें तेथेंही थोडेंबहुत व्याज मिळतेंच.

लोक—आधीं एक तर गंगाजळींतील पैसा व्याजाकरितां कर्जाऊ गुंतवून ठेवणें योग्य नाहीं. अमेरिका किंवा इंग्लंड या देशांतील बँका कोट्यवधि पौंड सोन्याच्या रूपानें तिजोऱ्यांतून नुसते भरून ठेवतात. ती रकम व्याजीं लावीत नाहींत. गंगाजळीचा अर्थच हा आहे. त्यांतूनही व्याजच हवें तर हिंदुस्थानांतील व्यापारी गंगाजळींतून घेतलेल्या कर्जाऊ रकमेवर व्याज देणार नाहींत असें थोडेंच आहे ? पैसा व्याजींच लावणें झाला तर त्याला हिंदुस्थानांत काय थोडा वाव आहे ? विलायत सरकारचे कर्जरोखे काय किंवा हिंदुस्थान सरकारचे कर्जरोखे काय, दोनही सारखेच. व्याज मिळावयाचें तर दोहोंलाही मिळेल, उलट कर्जरोखे हवे तेव्हां विकून रोख पैसा उभा करण्याची अडचण जशी इकडे तशीच ती तिकडेही अनुभवास आलेली आहे. हल्लींचे विलायती कर्जरोखे विकून त्याचें सोनें हिंदुस्थानांत गंगाजळी म्हणून आणून ठेवल्यास आज हुंडणावळीला व उद्यां सोन्याचें नाणें चालू करण्याला त्यांचा उपयोग होईल. युद्धकाळीं आमचा विलायतेशीं व्यापार फारच वाढला होता त्या वेळीं आम्हांला मोबदला मिळणारें सोनें सरकारनें इकडे येऊं दिलें असतें व उलट्या हुंड्या विकून तें खर्चून टाकलें नसतें तर आज गंगाजळी किती तरी मोठी झाली असती.

सरकार—पूर्वीं कांहीं झालें असो. पण यापुढें आम्ही ही भानगड काढून टाकणार आहों.

लोक—ती कशी काढणार ?

सरकार—प्रथम या दोनही गंगाजळींचें प्रमाण काय असावें तें कायद्यानें ठरविणार व दोहोंची मिळून एकच गंगाजळी असें मानून त्यांच्या रकमेपैकीं शेकडा ४० इतकी रकम सोनें किंवा सोन्याच्या किंमतीचे कर्जरोखे यांचे स्वरूपांत ठेवावी असें ठरविणार. दहा वर्षांत या गंगाजळींत तीस कोटींचें तरी सोनें कमींत कमी जमावें असें ठरवूं. कदाचित् उद्यां सोन्याचें नाणें सुरू करण्याचें ठरलें तर त्याला उपयोगच होईल. आपल्या घरचेंच सोनें असल्यावर मग दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावयास नको.

लोक—गंगाजळी हिंदुस्थानांत ठेवून तींत सोन्याचा ऐवज ठेवण्याची कल्पना ठीक आहे. सरकारनें कमिशनाची ही शिफारस मान्य केली आहे. पण त्याचें बिल

मात्र अजून पुढें आलेलें नाहीं. चलनी नोटा ज्या आज लोकांच्या हातीं आहेत त्यांच्या किंमतीच्या अमुक प्रमाणानें सोनें गंगाजळींत शिल्लक राहिलें तरच लोकांचा या चलनावर विश्वास बसेल.

सरकार—गंगाजळींतील रुप्याच्या ऐवजाचें प्रमाण हळुहळू कमी करावें असेंही ठरवीत आहों.

लोक—ठीक आहे. रुपयाच्या नाण्याची संख्या आजपर्यंत तुम्हीं बेसुमार वाढविली आहे ती हळुहळू कमी करून व लोकांची खरी गरज असेल तेव्हांच, केवळ तुमच्या इच्छेप्रमाणें नव्हे, नवीन रुपये पाडण्याचें धोरण स्वीकाराल तर गंगाजळींतील रुपें आपोआपच कमी ठेवलें तर चालेल. सोन्याचें नाणें चालू झालें तर हा प्रश्न अधिकच सोपा होणार आहे.

सरकार—गंगाजळींत ठेवण्याचे कर्जरोखे अस्सल कर्जरोखे असावेत; तसेंच सरकारचे हातच्या प्रॉमिसरी पोकळ नोटा त्यांत न ठेवतां भरीव ऐवजाच्या व्यापारी हुंड्या ठेवाव्या असेंही आम्ही करणार आहों.

लोक—ठीक आहे. तसें केल्यानें पोकळ प्रॉमिसरी नोटा ठेवून चलन वाढविण्याचा जो हल्लीं प्रकार आहे तो कमी होईल.

सरकार—आजपर्यंत चलनी रुपये व नोटा यांचा ऐवज किती वाढवावा व किती कमी करावा याला कांहींच बंधन नव्हतें. चलन-खात्याचे अधिकारी मर्जीप्रमाणें नोटा व रुपये नवे काढीत होते तें यापुढें बंद होईल.

लोक—योजना ठीक आहे; पण तिचा अधिक तपशील कळेल तेव्हां त्याविषयीं बरेंवाईट म्हणतां येईल. आजवर विलायती व्यापाऱ्यांच्या सोयीकरितां वाटेल तितके रुपये सरकार पाडून देत असे आणि देशी व्यापाऱ्यांनीं बाजार नडला असें म्हटलें तरी सरकार रुपये पाडून देत नसे ! उलट अनेकदां नडीच्या वेळीं सरकारनें चलन आंखडतें घेतलें, असें झालें आहे.

सरकार—पण पुष्कळ वेळां आम्हीं केलें तें विलायतसरकारच्या हुकुमानें करावें लागलें.

लोक—असेल. पण तो मुद्दा जुना आहे व त्याचें उत्तर पूर्वी एकदां दिलेलेंच आहे.

सरकार—वरील सुधारणा झाल्या म्हणजे लोकांच्या नाणें सांठवून ठेवण्याच्या संवयी कमी होतील व त्यांचा चलनपद्धतीवर विश्वास बसेल.

लोक—म्हणतां त्या सुधारणा आधीं होऊं द्या मग पाहूं. पण लोकांचा चलनपद्धतीवर विश्वास नाहीं व ते नाणें सांठवून ठेवतात याला सरकारच कारण आहे. रुपया खरा दहा अकरा आणे किंमतीचा म्हणून नव्हे, ८॥ ग्रेन सोन्याच्या किंमतीचा म्हणून हातीं धरावा अशी तुम्हीं कायद्यानें कारवाई केली. रुपयाला सोनें भेटूं नये अशी कायमची व्यवस्था; आणि यापुढें तर नोटांचे रुपयेही देऊं नयेत

अशी नवीन व्यवस्था तुम्ही करणार. तात्पर्य, एका चीनखेरीज ज्या इतर सर्व देशांशीं हिंदुस्थानाची देवघेव सुरू त्यांचा सर्व व्यवहार सोन्यानें चालावा आणि हिंदुस्थानाचा सर्व रुप्यानें चालावा, हा तुमचा डाव लोकांना उघड दिसत असतां चलनपद्धतीवर त्यांचा विश्वास बसावा कसा ? हिंदी लोक नाणें पुष्कळसें संग्रहीं भरून ठेवतात, व्यापाराला बाहेर काढीत नाहींत ही गोष्ट थोडीशी खरी आहे. पण तें अगदींच निष्कारण नाहीं. देशांतील मुख्य धंदा शेतकीचा. त्याला वर्षांतून कांहीं एका ठराविक वेळीं नाण्याची विशेष गरज लागते. इतर उद्योगधंद्यांचें तसें नाहीं. त्यांना बारमास खेळतें भांडवल हवें असतें. पण तसे उद्योगधंदे देशांत थोडे आहेत. शिवाय बँकांतून पैसे ठेवून चेकच्या चिठीचपाटीनें व्यवहार करण्याची नवी संवय त्यांना अद्यापि विलायतेंतल्या लोकांइतकी लागलेली नाहीं. पण या संवयीचें शिक्षण देण्याला सरकारनें तरी जिल्हानिहाय किंवा तालुकानिहाय बँकांच्या शाखा घालून सवलती कितीशा दिल्या आहेत ? येऊनजाऊन सरकारी बँक पोस्टाची. तिचा उपयोग लोक पुष्कळ करतात हें सरकारला कबूल करावें लागेल. पण इतर खासगी बँकांच्या मानानें पाहिलें तर पोस्टल बँकेशीं व्यवहार करणें सुरक्षित असें लोकांना वाटलें तरी फायदेशीर वाटत नाहीं. सरकारचा सगळा खजिना इंपीरियल बँकेच्या उपयोगी पडतो. पण तिचाही व्यवहार फार मर्यादित, म्हणजे शाखा फार कमी आणि तिच्याशीं व्यवहार करणें सामान्य माणसाला नफ्याचें नसतां जिगजिगीचें मात्र होतें. इंपीरियल बँकेचा फायदा मोठमोठ्या व्यापारी कुळांना काय होत असेल तो असेल. पण पोस्टल बँक सुरक्षित असली तरी फायद्याची नाहीं व इंपीरियल बँक मुळींच लोकप्रिय नाहीं. रुपयाचें नाणें संग्रहीं ठेवण्याचें दुसरें कारण असें कीं, हिंदुस्थानांत आज मुख्य मूर्धाभिषिक्त असें नाणें तेंच आहे. त्याच्या मानानें चलनी नोटा या लोकांना महत्त्वाच्या वाटत नाहींत. कारण रुपयाचें नाणें कोणीं आटवलें तर त्यांत दहा-अकरा आणे किंमतीची तरी चांदी निघेल. पण चलनी नोटा म्हणजे नुसता कागदाचा तुकडा, एक पैच्या एका दशांशइतकाही खऱ्या म्हणजे जगन्मान्य किंमतीचा ऐवज नाहीं ! अर्थात् अडीअडचणीकरितां, अस्मानीसुलतानीकरितां व युद्धासारख्या संकटाच्या काळाकरितां राखून म्हणून ठेवावयाचें तर लोक चलनी नोटांपेक्षां रुप्याचें नाणेंच ठेवणार हें स्वाभाविक आहे. पण उद्यां सोन्याचें नाणें करा म्हणजे मग असें दिसून येईल कीं, लोक रुप्याच्या नाण्यांऐवजीं संग्रह करावयाचा तर सोन्याच्या नाण्यांतच करतील. कारण जगन्मान्यतेंत कागदापेक्षां रुपें जसें अधिक तसें रुप्यापेक्षां सोनें अधिक.

## सरकारची नवी लहर.

**सरकार—पण आम्ही आतां रुप्याला सोन्याच्या पायावर अधिष्ठित करणार आहों.**

लोक—म्हणजे काय करणार?

सरकार—प्रथम असें कीं, रुप्याची किंमत आणि विलायती पौंडाची किंमत यांचा आम्ही आजवर मेळ घातला होता तो काढून टाकून त्याचा मेळ यापुढें प्रत्यक्ष सोन्याशीं घालणार.

लोक—म्हणजे काय करणार?

सरकार—आजवर पौंड घेऊन त्याचे रुपये देत असूं किंवा रुपये घेऊन त्याचे पौंड देत असूं ही पद्धत नाहींशी करून रुपये देऊन सोनें घ्यावें व सोनें देऊन रुपये घ्यावे ही पद्धत सुरू करणार.

लोक—याचा अर्थ इतर कांहीं असो, पण प्रथम हाच कीं, आंतबाहेर मोहरे-अर्ध-मोहरेइतक्या किंमतीचीं सुटसुटीत सोन्याचीं नाणीं व्यवहारांत कायदेशीर रीतीनें देतांघेतां येत असत, तीं बंद करून एक हजार तोळे सोन्याच्या गटाच्या द्वारें सोन्याचें दर्शन लोकांना देणार? अलीकडे पौंडाचा भाव भलताच ठेवला गेल्यानें या नाण्याचें चलन कमी झालें होतें हें खरें, तरी पण तुमचा १८ पेन्सांचा आवडता हुंडणावळीचा भाव का होईना, तो पुनः स्थापित झाला असता तर पौंड व अर्ध पौंड हीं नाणीं पुनः व्यवहारांत आलीं असतीं. ही सोयदेखील तुम्ही काढून टाकणार. आम्हांला जुनी पद्धत म्हणजे पौंडाचा रुपयाशीं मेळ घातलेली पद्धत आवडत होती किंवा उत्कृष्ट वाटत होती असें नाहीं. पण त्यांत व्यावहारिक सोय काय होती येवढेंच येथें दर्शविलें आहे. वास्तविक तुम्ही हल्लीं काढून टाकणार ती पद्धत मूळ तुम्हींच चांगली म्हणून अमलांत आणली होती. खरें, खुद्द पौंड व सोनें यांच्या किंमतीचा जो बेबनाव मध्यंतरीं युद्धांत झाला होता तोही आतां निघून गेला असल्यामुळें पौंड हा तुम्हांला स्थिर व सुरक्षित असा वाटावयास पाहिजे होता. तुमच्या योजनेप्रमाणें खुद्द सोन्याशीं रुपयाचा मेळ घातला तरी सोन्याचें नाणें चालू होणार नसल्यानें चांदीच्या जिवावर रुपयाचें सौभाग्य पूर्वी अवलंबून राही तें आजही राहणार. तात्पर्य, नव्या योजनेंत तुमची एक नवी लहर पुरविणार आणि ती मोठी सुधारणा म्हणून दडपून देणार इतकाच त्याचा अर्थ. पण यावरून मात्र असें समजूं नका कीं, रुपयाचा व पौंडाचा मेळ मोडून टाकण्याची तुमची योजना आम्हांला नापसंत आहे. ती लहानशी सुधारणा, पण सुधारणाच आहे. आमच्या दृष्टीनें तुमची योजना आम्हांला, आमच्या मुक्कामावर आजच नेऊन पोंचविणारी नसली तरी, त्यायोगें तुम्ही वांकडी वाट टाकून सरळ मार्गावर तरी आलां इतकाच आम्ही ग्राह्यांश समजतों. सरळ वाटेवर आल्यानंतर मुक्कामाला तुम्ही आम्हांला नेऊन घालविणार कीं नाहीं किंवा बशा बैलाप्रमाणें हजार तोळे सोन्याच्या तळावरच मुक्काम करणार. हें तुमचें आमचें बळ चालेल तसें पाहून घेऊं. तूर्त आनंद इतकाच कीं, एका नव्या लहरींत तरी आपली जुनी चूक तुम्हीं कबूल केली.

सरकार—कसेंही म्हणा, पण जुन्या पद्धतीचे दोष किती निरनिराळे होते ते सांगूं का ?

लोक—नको, ते सांगून वेळ व्यर्थ घालवूं नका. ते दोष तुमच्यापेक्षां आम्हांला अधिक चांगले माहीत आहेत व आमच्यांतील जाणते लोक त्याविरुद्ध एकसारख्या कागाळ्या करीत आलेच आहेत. तेव्हां आतां चलनपद्धति स्थिर करण्याची नवी योजना काय आहे तेवढी नक्की सांगा म्हणजे झालें.

सरकार—नवी योजना हीच कीं, रुपया व प्रत्यक्ष सोनें यांचेंच प्रमाण कायमचें ठरवून द्यावयाचें व तें असें ढळढळीतपणें कीं धावत्या माणसाच्या डोळ्यालाही तें स्पष्ट दिसेल. उगीच नुसता सोन्याचा आभास नव्हे तर खरें अस्सल सोनें, मग काय म्हणतां ?

लोक—अगदीं हजार तोळे सोन्याचा गट ना ? सोन्याकरितां हापापलेल्या हिंदी लोकांचे पांगच तुम्ही फेडणार म्हणतां ! बरें, पण योजना तर खुलासेवार सांगा.

सरकार—योजना हीच कीं, कमींत कमी एक हजार तोळे सोनें देणाराला ८॥ ग्रेन सोनें म्हणजे एक रुपया या भावानें मोबदला रुपये द्यावे व उलट तितके रुपये देणाराला, तितकें सोनें द्यावें. विशेष हा कीं, आजपर्यंत रुपये व सोनें यांची सरकारी देवघेव करण्याला आजवर कायदेशीर सक्ती नव्हती, ती आम्ही यापुढें घालणार ! तसेंच किमान प्रमाण जरी एक हजार तोळे सोन्याचें ठरविलें तरी कमाल मर्यादा आम्ही घालीत नाहीं. हवे तितकें सोनें व हवें तितके रुपये यांची देवघेव होऊं शकेल. शिवाय तुम्हांला इतके रुपये कां हवे, सोनें किंवा इतक्या सोन्याचें तुम्ही काय करणार असें आम्ही कोणास विचारणार नाहीं. सोनें घेऊन वाटेल तर तें तोडून विका, नाहीं तर दागिने करा, नाहीं तर परदेशीं व्यापारी देणें देण्याला पाठवा. मात्र सोनें देण्याघेण्याचे दर व्यापारी पद्धतीप्रमाणें आतबट्ट्याचा व्यापार न होईल असे आम्हांस ठरवावेच लागतील व ते आम्ही ठरविणार आहों.

## या योजनेनें काय साधणार ?

लोक—आणि ह्या योजनेनें तुम्ही काय साधणार म्हणतां ?

सरकार—साधणार हेंच कीं, रुपयाची सोन्याच्या भावानें किंमत स्थिर होईल व हुंडणावळही कायम होईल आणि सोनें व नाणें यांची देवघेव सुरू झाली म्हणजे देशांत व्यवहाराकरितां लागणारा पैसा कमी किंवा जास्ती हवा तसा आपोआप मिळेल.

लोक—परदेशीं पाठवायला व्यापाऱ्यांना सोनें मिळेल ही गोष्ट खरी आणि त्यानें हुंडणावळीच्या दरावर परिणाम होईल हेंही खरें. परंतु रुपया रुप्याचा, त्याच्या किंमतीचें सोन्याशीं प्रमाण आणि सोन्या-रुप्याचे भाव कोणाच्याच हातीं नाहींत. यामुळें लोकांना असलेली रुपयाची किंमत कितपत खरी स्थिर होईल याची शंकाच

आहे. चांदीची किंमत आज कमी आहे म्हणून ठीक आहे. पण उद्यां जर ती बेसुमार वाढली तर रुपये वितळविण्याचा प्रसंग येणार. तेव्हां सरकार काय धोरण ठेवणार हें स्पष्ट नाहीं. रुपये वितळविणें कदाचित् बेकायदेशीर ठरेल. परंतु वीस हजार रुपये किंमतीचें सोनें ज्याला घेववत नाहीं त्याला फिरून रुपये लागल्यास सरकाराकडून पाडून मिळण्याला सवड नाहीं. सोन्याचें नाणें चालू असलें म्हणजे असली मर्यादा राहात नाहीं. तात्पर्य, रुपयाला सोन्याचें पाठबळ तुमच्या योजनेंत आहे. पण तें असावें तितकें नाहीं. म्हणून रुपयाच्या नाण्यावर लोकांचा विश्वास बसणें सुलभ नाहीं.

## सोन्याचें नाणेंच कां देत नाहीं ?

सरकार — पण सामान्य लोकांनाही या योजनेचा फायदा मिळावा म्हणून आम्हीं असें योजिलें आहे कीं, लोकांकडून रुपये घेऊन त्यांना ठराविक मुदतीची सेव्हिंग सर्टिफिकिटें द्यावीं; असें केल्यानें लोकांच्या खासगी ठेवींतले रुपये बाहेर निघतील व त्यांचें सोन्यांत रूपांतर होईल व त्यांनीं सोन्याच्या नाण्याचेंही काम भागेल.

लोक—पण लोकांच्या सांठवणींतले रुपयेच जर बाहेर काढावयाचे तर सोन्याचें नाणें देऊं केल्यानें ते अधिक बाहेर निघतील कीं नुसतें सोनें दिल्यानें ? हातांत सोन्याची लड किंवा चीप असली तरी तिची देवघेव सोपी नाहीं. बाजारांत गिनी किंवा मोहोरा जितक्या हातोहात फिरतील व व्यापाराला मदत करतील तितक्या सोन्याच्या चिपा करणार नाहींत. ज्याला परदेशीं सोनें पाठवावयाचें नाहीं तो तें घेऊन काय करील ? फिरून त्याचे रुपये करणार किंवा त्याचे दागिने करण्याचा मोह त्याला होणार. उलट सोन्याचें नाणें असलें म्हणजे त्याला टीप नको, वजन नको, सरकारी छापानें त्याला चलनवलन सुलभ होतें. रुपयाचें नाणें बाजारांत व्यवहाराला उपयोगी पडतें व दागिने हे शोभा तरी देतात. पण सामान्य मनुष्याला सोन्याच्या चिपेचा कांहींच उपयोग नाहीं. उलट ती संभाळण्याची अड-चणच ! बँकेशीं व्यवहार करावयाचा तर अनगड वेडीवांकडी आणे–पैपर्यंतही रक्कम असेल ती बँकेंत भरतां येते. पण सरकारी छापाच्या चिपेशिवाय तुटके-फुटके सोन्याचे तुकडे घेत बसण्याचा उद्योग बँका सहसा करणार नाहींत. सोन्याचें नाणें चालू केल्यास लोक दागिने मोडून नाणें करण्याचाही संभव आहे. सोनें देणार, सोनेरी सर्टिफिकिट देणार मग त्याबरोबर निदान पौंड अर्धपौंड हीं नाणीं आहेत तशींच चलनांत कां ठेवीत नाहीं ?

सरकार — हीं नाणीं चालू ठेवल्यानें गंगाजळीची ठेव कमी होण्याचा संभव आहे. शिवाय रुप्याचें नाणें पाडून द्यावें लागेल तें लागेलच. शिवाय हीं नाणीं हल्लीं फारशीं चलनांतही नाहींत.

लोक—पण त्याचें कारण रुपयाचा भाव दोन शिलिंग म्हणजे पौंडाची

किंमत दहा रुपये करून तुम्ही बसलां आहां म्हणून. पौंडाची किंमत पूर्ववत् १५ रुपये झाल्यास लोक ते फिरून वापरूं लागतील.

सरकार—पण विश्वास पटण्याला सोन्याच्या पौंडापेक्षां स्वतः सोनेंच अधिक समर्थ नाहीं काय ?

लोक—खरोखरच नाहीं. कारण व्यवहाराला सोन्याच्या तुकड्यापेक्षां सोन्याच्या नाण्याचा उपयोग अधिक असतो. विश्वास बसविण्याची तुमची रीत फारच चमत्कारिक दिसते. कारण सोन्याच्या नाण्याचा निःपात करण्याकडे नोटां-ऐवजीं रुपये मिळूं नयेत असेंही तुम्ही ठरविणार आहां. नोटांबद्दल लोकांना—विशेषतः शहर सोडून बाहेर—किती अविश्वास वाटतो याचें प्रत्यंतर युद्धाच्या कालांत आलेंच आहे. त्या वेळीं वरतवळा देऊन तरी नोटांचे रुपये होत आणि तुमच्या योजनेप्रमाणें तर यापुढें नोटांना रुपये मिळणारच नाहींत.

सरकार—कां बरें ? नोटांऐवजीं रुपये न मिळाले तरी २१।२२ हजार रु. किंमतीच्या नोटा दिल्या म्हणजे १००० तोळे सोनें देऊं. मग सोन्याचे रुपये करावेत. शिवाय आम्हीं योजिलें आहे तें इतकेंच कीं, नोटांऐवजीं रुपये मिळण्याचा आज जो कायदेशीर हक्क म्हणून आहे तो तेवढा नाहींसा व्हावा. पण सरकारी बँका आपल्या खुषीनें कांहीं एका प्रमाणांत नोटाऐवजीं रुपये देतीलच; अगदींच न देऊन त्यांचें भागणार नाहीं.

लोक—कायदेशीर हक्क गेला म्हणजे सगळें कांहीं गेलें. बँकांच्या खुषीवर ठेवलें म्हणजे खात्री कांहींच राहिली नाहीं. नोटांचे रुपये करून मिळावे अशी इच्छा उत्पन्न झाली व ती भागली नाहीं म्हणजे लोकांच्या दृष्टीनें रुपयाला अधिकच महत्त्व आलें. पण रुपया आधींच कृत्रिम कमी किंमतीचा. त्यांतूनही तो दुर्मिळ; यामुळें एकंदरीनें चलनपद्धतीबद्दल विश्वास वाढेल का अविश्वास वाढेल ? तुमच्या योजने-प्रमाणें हळुहळू रुपये कमी होऊन नोटाच लोकांच्या हातीं राहणार. नोट म्हणजे मुख्य नाणें. रुपया हें त्यांचें परचुरण आणि एक रुपयाच्या नोटेला नाण्याचा मोबदलाच नाहीं अशी स्थिति तुम्ही करून ठेवणार.

## यांत सांगण्यासारखें काय केलें ?

सरकार—नोटांशिवाय रुपयालाही आम्हीं कायदेशीर चलनाचें स्वरूप कायम ठेवलें आहे. रुपयाला आम्हीं कसा तो धक्का म्हणून लावला नाहीं.

लोक—फार मेहरबानी केली ! कारण सोन्याचें नाणें नाहीं. नोटाऐवजीं रुप्याचें नाणें मागण्याचा लोकांना कायदेशीर हक्क नाहीं. अशा स्थितींत रुपयाचाही चलनाचा अधिकार काढून घेतला असता म्हणजे मग बहार झाली असती ! आम्ही सोन्याचें नाणें मागणारे परंतु तें सुरू झालें तरी रुपया हाही कांहीं रकमेपर्यंत कायदे-शीर नाणें म्हणून चालू रहावा असें आम्हीही म्हणतों, मग सोन्याचें नाणें चालू न

करतां रुपयाचा अधिकार तुम्हीं कायम ठेवला यांत सांगण्यासारखें काय केलें ? पण रुपया मोठा त्रासदायक आहे म्हणून त्याचा अधिकार काढून घ्यावा असेंही म्हणणारा कोणी बदसल्लागार तुम्हांला भेटला होता असें तुमच्या म्हणण्यावरून दिसतें. नांव सांगितलें नाहीं म्हणून त्याची शोभा वांचली !

सरकार—तें कांहीं म्हणा. पण एक मोठी सुधारणा आम्हीं योजली आहे ती तरी तुम्हाला पटेल असें वाटतें.

लोक—ती कोणती ?

सरकार—ती अशी कीं, हल्लींच्या इंपीरियल बँकेची नवी आवृत्ति काढून तिच्याच हातीं, बँकेच्या व्यापारी व्यवहाराशिवाय, चलनी नाण्यासंबंधीं सरकारचे सर्व अधिकार आम्ही देणार आहों. टांकसाळ ही पूर्वीसारखीच सरकारी राहील. परंतु तींत नाणें केव्हां किती पाडावें हें नवी बँक ठरवील. बँकेची व्यापारी शाखा व चलनी शाखा या वेगळ्या ठेवूं. सोनेंखरेदीचे दर ठरवून देऊन लोकांना सोनें देण्याघेण्याची जबाबदारी बँकेवर टाकूं. स्टेट सेक्रेटरी यांना पैसे पाठवावयाचे वगैरे गोष्टी या बँकेकडे सोंपवूं. व्यापारी दृष्टीनें देशांत चलन किती राहावें हें ठरवून रुपये पाडून मागणें, न मागणें किंवा लोकांकरितां रुपये पाडवून घेणें याचाही अधिकार बँकेला देऊं आणि चलनी नोटा छापण्याचा अधिकार बँकेला देऊन त्या नोटांना सरकारी तारण देऊं. तात्पर्य, हल्लीं या एकंदर बाबींवर स्टेट सेक्रेटरीचा जो अप्रत्यक्ष अधिकार चालतो तो काढून घेऊन यांतील पुष्कळसा अधिकार स्वतंत्रपणें या बँकेकडे देऊं व तिच्यावर हिंदुस्थानसरकारची देखरेख ठेवूं.

## मुख्य गोष्टीबद्दल काय तें बोला.

लोक—बँकेची ही कल्पना कांहीं अंशीं ग्राह्य आहे. चलनपद्धतीचें नियंत्रण विलायतेंतून निघून हिंदुस्थानांत आलें तर तें आम्हांलाही हवें आहे. परंतु सरकार या बँकेविषयीं बिलाच्या रूपानें तपशीलवार योजना लोकांपुढें मांडील तेव्हां तिची योग्य ती चर्चा होईल. स्वतंत्र देशांतही अशा बँका असतात हें आम्हांला माहीत आहे व जवळजवळ तशा प्रकारची एखादी बँक इकडे झाली तर ती आम्हांला नको आहे असें नाहीं. नव्या बँकेंत इंपीरियल बँक समाविष्ट करावी कीं वेगळी करावी याविषयीं तज्ज्ञ लोकांत मतभेद दिसतो. तथापि बँकेच्या या सूचनेला महत्त्व असलें तरी कितीही चांगली बँक निघाली म्हणून मुळांत चलनपद्धतिच सदोष राहील तर काय उपयोग ? म्हणून मुख्य गोष्टी ज्या दोन म्हणजे हुंडणावळीचा दर काय ठरविणार आणि सोन्याचें नाणें चालू करणार कीं नाहीं यांविषयीं काय तें बोला.

सरकार—हुंडणावळीच्या दरासंबंधानें आम्हीं असें ठरविलें आहे कीं, तो दर रुपयास एक शिलिंग सहा पेन्स असा असावा. हुंडणावळीचा दर कायम करणं म्हणजेच रुपयाची किंमत सोन्याच्या प्रमाणानें कायम करणें होय. हें प्रमाण एक

रुपया म्हणजे साडेआठ ग्रेन सोनें असें ठरतें व पूर्वीचा कायदा बदलून एक रुपयास दोन शिलिंग म्हणजे रुपयांत ११ ग्रेन सोनें हा भाव बदलून रुपयास ८॥ ग्रेन सोनें असें ठरविण्याचा कायदा करूं.

लोक—एक रुपयास १८ पेन्स हा भाव तुम्ही कोठून घेतला?

सरकार—जो हल्लीं प्रचारांत आहे तोच.

लोक—पण हा भाव प्रचारांत आहे म्हणजे तुम्हीं धडपड करून प्रचारांत मुद्दाम ठेवला तो व्यवहारांत कायम झाला असें नाहीं. पण कायम नसला तरी कागदोपत्रीं तो कोणता असावा हा प्रश्न उरतो म्हणून १६ किंवा १८ पेन्स यांपैकीं कोणत्याही भावाला आपण प्रचलित असें न म्हणतां सयुक्तिक कोणता हें पाहूं. प्रचलित याचा अर्थ आजच्या क्षणीं चालू येवढाच घेतला, तर १८ पेन्सांपेक्षां १६ पेन्स भाव किती वर्षें अधिक चालू होता हें आंकड्यांनीं दाखवितां येतें. हिंदुस्थानाच्या फडणविसांनीं १८ पेन्सांचा भाव आज दोन वर्षें मनानें ठरवून ठेवला होता. तोच कमिशन नेमून कायम करवून घेतला आणि त्यालाच प्रचलित, चालू, स्वाभाविक असलीं नांवें देण्यांत येतात.

सरकार—मग तुम्ही तरी १६ पेन्सांच्या भावाचा आग्रह धरितां, तो तरी स्वाभाविक कसा?

लोक—स्वाभाविक म्हणजे कायम असें नव्हे. कारण हुंडणावळीच्या बाबतींत फेरबदल हीच प्रकृति आणि स्थिरपणा हीच विकृति, चलबिचल हाच नियम व स्थैर्य हाच अपवाद. पण ज्याला पुष्कळ वर्षांची परंपरा आहे तेंच त्यांतल्या त्यांत स्वाभाविक. इतक्या अर्थानें सोळा पेन्सांना आम्ही स्वाभाविक म्हणतों. तुमच्या १८ पेन्सांची परंपरा दोन वर्षांची तरी आहे काय? उलट १६ पेन्सांची परंपरा कमींत कमी २० वर्षांची आहे. १९२४ च्या सप्टेंबरांत हुंडणावळीचा भाव १६ पेन्स युद्धाच्या चलबिचलीनंतर पुनः झाला होता व सरकारी भाषेंत तेव्हां त्याला प्रचलित चालू स्वाभाविक असें म्हणतां आलें असतें. मग कायद्याची खुंटी ठोकून तिला तो दर तेव्हांच कां बांधून टाकला नाहीं? तसें न करतां उलट तो १६ पेन्स राहूं नये, १८ पेन्स राहावा मात्र त्यावर चढूं नये याकरितां देशांतील पैसा कमी करणें, किंमती मंदावणें वगैरे प्रयत्न सरकारनें मुद्दाम केले.

## १८ पेन्सांचा कृत्रिम दर

सरकार—आम्हीं प्रयत्नानें १८ पेन्सांचा भाव टिकविला हें नाकबूल कोठें करतों?

लोक—नाकबूल करून चालावयाचेंच नाहीं. पण आमचा तुमच्यावर आक्षेप हाच कीं, तुम्ही प्रयत्न केलें पण १८ पेन्सांच्या भावाकरितां केले; १६ पेन्सांच्या भावाकरितां केले नाहींत.

सरकार—पण १८ पेन्सांचा हुंडणावळीचा भाव व पदार्थांचे बाजारभाव यांचा तरी आज मेळ पडला आहे कीं नाहीं ?

लोक—बाजारभावाचा हा सगळाच प्रश्न अत्यंत वादग्रस्त आहे. कारण या भावाच्या प्रश्नांत इतके निरनिराळे बाजारी जिन्नस येतात, एकाचा चढ तर दुसऱ्याचा उतार हें इतकें एकसारखें घडत असतें, आणि सर्वांवरून मिळून संकीर्ण अनुमान काढणें ही गोष्ट इतकी कठीण असते कीं, हुंडणावळीचा भाव ठरवितांना अमुक एक वेळच्या किंमतीचा मेळ त्याशीं पडला आहे हें म्हणणेंच निरर्थक होय. या विषयांत केव्हांही एकाला दुसऱ्याची खात्री करून देतां येणार नाहीं. बाजारभाव कमजास्त होण्याला सोन्यारुप्याची किंमत किंवा हुंडणावळीचा दर हें एकच कारण असत नाहीं, इतर अनेक कारणें असतात.

सरकार—आम्हीं धडपड केली ती तुमच्या फायद्याचीच केली. आम्ही ती केली नसती तर काय नेम सांगावा ? तो दर १८ पेन्सांवरही गेला असता.

लोक—होय. केव्हां १८ पेन्सांवर गेला असता तर तुम्ही मध्यें न पडतां तर उलटदिशेला १५ पेन्सांपर्यंतही खालीं गेला असता.

सरकार—असा चढउतार होणारच. पण तुम्हांला चढत्या हुंडणावळीचा दर एकंदरीनें नको. तो मानवत नाहीं म्हणून आम्हीं प्रयत्न केला, यांत काय बिघडलें ?

लोक—मग १८ पेन्सांचा भाव आज प्रचारांत आहे म्हणून तो कायम ठेवतों असें कां म्हणतां ? कृत्रिम प्रयत्नसिद्ध गोष्टीला ती स्वाभाविक आहे असें कां भासवितां ? आम्हांला हा दर पूर्वीच्या १६ पेन्सांपेक्षां थोडा चढा हवा होता म्हणून आम्हीं तो वाढूं दिला व १८ पेन्सांवर राहणें हें आम्हांला बरें वाटलें म्हणून तो वर जाऊं न देण्याचा प्रयत्न केला असें म्हणा. तात्पर्य, आम्ही ठरवूं ती पूर्व दिशा, तिकडेच सूर्य उगवला पाहिजे. आणि ठरवूं तोच हुंडणावळीचा दर त्यानेंच व्यवहार चालविला पाहिजे इतकेंच तुमचें म्हणणें.

## आमच्या हातीं सत्ता असती तर

सरकार—मग तुम्ही १६ पेन्स हा भाव असावा असें म्हणतां तेव्हां तरी तुम्ही आपल्याच मनचा भाव सांगतां कीं नाहीं ?

लोक—तुमच्यासारखी सत्ता आमचे हातीं असती तर आम्ही प्रयत्न करून भाव १६ पेन्सांवर ठेवला असता आणि मग त्याला प्रचलित चालू भाव असें साळसूद नांव दिलें असतें आणि त्या मानानें रुपयांत सोनें किती समजावयाचें हें ठरविलें असतें. पण आम्ही अशा आडमार्गांत शिरत नाहीं कारण आम्ही ही गोष्ट प्रांजलपणें कबूल करतों कीं, रुपयांत सोनें किती ग्रेन आहे असें मानानें ठरविलें म्हणून हुंडणावळ थोडीच स्थिर राहणार ! युद्धकालीं तर हुंडणावळीनें झोके किती खाल्ले ही गोष्ट सर्वांना माहीतच आहे. पण शांततेच्या काळांतदेखील हुंडणावळी-

त्या दरांत पुष्कळ फरक होत असतो आणि तें अपरिहार्यही आहे. कारण सर्वांना मुख्य आधार सोन्याचा असला तरी प्रत्येक राष्ट्रांतील नाण्यांत सोनें कमजास्त प्रमाणानें असतें आणि व्यापारी हुंड्यांनीं राष्ट्राराष्ट्रांच्या देण्याघेण्याचा संक्षेप पडल्या-वरही उरलेलें देणेंघेणें सोन्यानेंच भागवावें लागतें. यामुळें सोन्याच्या किंमतींत चढ-उतार झाला म्हणजे हुंडणावळीचा भाव बदलणारच. त्यांतूनही हिंदुस्थानांतील मुख्य नाणें रुप्याचें. तेव्हां इकडील हुंडणावळीला सोन्याच्या किंमतीप्रमाणें रुपयाच्या किंमतींतील चढउतार हेंही एक आणखी कारण आहे. तात्पर्य, हुंडणावळीचा दर तराजूच्या काट्याप्रमाणें फार वेळ स्थिर न राहतां खालवर होत असतो. तेव्हां प्रचलित हुंडणावळीचा दर याला केवळ नैमित्तिक स्वरूप आहे. आणि तो १८ पेन्स ठरविला म्हणून पाऊस कमजास्त पडणें, मागणी कमजास्त होणें, वाहतुकीचीं साधनें व भांडीं कमजास्त होणें, उद्योगधंद्यांचा चढउतार होणें, बाजारांत पैसा कम-जास्त असणें इत्यादि अनेक गोष्टींनीं बाजारभाव ठरतात. लहरी हौशी व्यापारी व सट्टेबाज व्यापारी यांच्या खेळाचीही त्यांतच भर पडते, म्हणून कायमचा मेळ बसला म्हणण्याइतके स्थिर बाजारभाव असतच नाहींत. युद्धांत किंमती भडकल्या होत्या त्या चोहोंकडेच आतां मंदावल्या आहेत. पण त्यांचीं कारणें वेगवेगळीं आहेत. कोठें बंद पडलेले उद्योगधंदे पुन्हा चालू झाले म्हणून, कोठें सरकारी मागणी कमी झाली म्हणून, कोठें अधिक लोक व्यापारांत पडूं लागून व्यापारांत चढाओढ सुरू झाली म्हणून, कोठें पूर्वीं चलनी पैसा बेसुमार वाढला होता तो कमी झाला म्हणून, कोठें सरकारचें नियंत्रण कमी होऊन व्यापार खुला झाला म्हणून आणि कोठें इतर देशांतले बाजारभाव कमी झाले म्हणून संसर्गानें किंवा सहानुभूतीनें किंवा अनुकारणानें.

## विलायती भांडवलवाल्यांची सोय

सरकार—मग आम्ही हुंडणावळीचा कोणताच भाव असा ठरवूं नये कीं काय ?

लोक—ठरवावा; पण तो फक्त आपल्या व्यवहारापुरता. येऊनजाऊन तुमचा स्टेटसेक्रेटरींशीं जो व्यवहार चालतो त्याकरितां तुम्हांला विलायतेस सालीना सुमारें तीस कोटी रुपये पोंचवावे लागतात येवढीच तुमची नड. तेवढ्यापुरता तुम्ही आपा-पसांत दर ठरवून घ्यावा. स्टेटसेक्रेटरींच्या ऑफिसचा खर्च तिकडील पेन्शनर लोकांचें पेन्शन इतक्यापुरतें तुम्हीं पाहावें. परंतु शेंकडों कोटींच्या खासगी व्यापाराला धक्का पोंचेल असे कृत्रिम दर ठरविण्याचा तुम्हांला काय अधिकार ? सोन्याचें नाणें चालू केलें असतें तर तुम्हांला मुळींच हात उचलावा लागला नसता. तें नाहीं म्हणून दर ठरविण्याची भानगड करावी लागते; तर ती तुम्ही आपल्या व्यवहारापुरती करा. विलायती भांडवलवाले यांना कोणता दर फायदेशीर यांत तुम्ही लक्ष कां घालावें ? विलायती भांडवलवाले हिंदुस्थानांतच आहेत असें नाहीं. इतर राष्ट्रांतूनही आहेत. मग हुंडणावळीचे भाव त्या त्या राष्ट्रांच्या सरकारांनीं ठरविल्याशिवायच त्यांचें भागतें कीं

नाहीं ! उलट हिंदुस्थानसरकारला विलायतेंतून पुष्कळसा माल आणावा लागतो. पण त्याकरितांही सोयीचा हुंडणावळीचा दर ठरवून द्या असें आम्ही म्हणत नाहीं. सोन्याच्या बाजारभावाप्रमाणें जी हुंडणावळींत वटघट होते ती सर्वांनाच पत्करावी लागते. युद्धाचे वेळीं धंद्याचे निरख सरकारनें ठराविले म्हणून नेहमींच्या काळांत लोकांच्या हिताकरितां म्हणून सरकार ते ठरवूं लागेल तर तें कसें चालेल ? तीच गोष्ट हुंडणावळीची आहे. युद्धाच्या काळीं सोन्यारुप्याच्या आयातनिर्गतीला सरकार एखादे वेळीं बंधन घालतें. तें विशेष कारण म्हणून खपलें जातें; पण एरवींच्या दिवसांत तें कसें खपेल ? इतर कोणतेंही राष्ट्र जी गोष्ट करीत नाहीं ती गोष्ट हिंदुस्थान-सरकार येथें करीत आहे व हें करावें लागण्याचें खरें कारण असें कीं, त्यांनीं आपलें नाणें सोन्याचें न ठेवतां रुप्याचें व तेंही कृत्रिम किंमतीचें ठेवलें आहे. वैद्यकशास्त्रांत ज्याप्रमाणें मूळ रोग व हटवितां वरच्या तात्पुरत्या लक्षणावर उपचार करणें हें चुकीचें तसें अंतर्गत चलनपद्धति स्थिर व शुद्ध न ठेवतां हुंडणावळीचा भाव कसा स्थिर होईल यावर सर्व करामत व कारवाई चालविणें हें वेडेपणाचें आहे.

## १६ विरुद्ध १८

सरकार—पण हुंडणावळ स्थिर करण्यांत फायदा आहे कीं तोटा आहे ?

लोक—स्थिर हुंडणावळ असण्यांत फायदा आहे, पण ती स्थिर राहील तर ! गेलीं पांचसहा वर्षें कायद्यानें २४ पेन्सांचा भाव ठरविला असतां प्रत्यक्ष किती पेन्सांचा भाव अमलांत होता ?

सरकार—स्थिर म्हणजे ठेवतां येईल तितका स्थिर. थोडाबहुत चढउतार होणारच. पण हल्लींसारखा तुम्ही म्हणतां तसाच कायद्यांत व व्यवहारांत फरक असला म्हणजे चांगल्या व्यापाऱ्यांना अनिश्चितपणामुळें व्यापार करण्याला नडतें व वाईट सट्टेबाज व्यापाऱ्यांचें फावतें.

लोक—सट्टेबाजीच्या या आरोपाचा रोख कोणावर आहे हें आम्हांला कळतें. पण सगळा बाजार कांहीं सट्टा करीत नाहीं. एखादा व्यापारी सट्टेबाजी करणारच. आणि हुंडणावळीचा भाव स्थिर असतांही वायद्याचे सौदे करून तो थोडीबहुत सट्टेबाजी करतोच. चांगले व्यापारी देखील आपल्या हातीं हुंडणावळ नाहीं म्हणून एक्स्चेंज बँकांशीं आगाऊ वायदे करतात. त्यांनींही हुंडणावळ थोडी खालवर होतेच.

सरकार—पण ती होऊं नये म्हणून आम्ही शक्य तो प्रयत्न करीत असतों.

लोक—मग प्रयत्नच करावयाचा तर चढी हुंडणावळ ठेवण्याचा प्रयत्न कां करतां ? १८ पेन्साऐवजीं १६ पेन्सांचा भाव राहाण्याचाच प्रयत्न कां करीत नाहीं? हुंडणावळ स्थिर राहात नाहीं व ती स्थिर करण्याकरितां प्रयत्न करावा लागतो या दोनही गोष्टी सारख्याच जमेस धरून १८ पेन्स भाव करावा का १६ पेन्स करावा

हा वाद शिल्लक राहातोच. प्रयत्न करण्याच्या दृष्टीनें हा १६ पेन्सांचा भाव टिकविला तर तो अधिक रास्त होईल व तो टिकविण्याचा प्रयत्नही अधिक यशस्वी होईल.

सरकार—पण जो भाव आज प्रत्यक्ष आहे तो टाकून १६ पेन्सांचा भाव स्थिर कां करावा ?

लोक—१८ पेन्सांचा भाव आज आहे या म्हणण्यांत अर्थ नाहीं. दोन वर्षांपूर्वी आम्ही म्हणत होतों तेव्हां भाव स्थिर केला असता तर आज तुमच्या १८ पेन्सांला जो युक्तिवाद लावतां तोच आमच्या १६ पेन्सांलाही तेव्हां लागला असता.

सरकार—पण हुंडणावळीचा भाव स्थिर करतांना पदार्थांच्या बाजारभावांचा त्याशीं मेळ पडला आहे कीं नाहीं हेंही पाहावें लागतें. दोन वर्षांपूर्वी हा मेळ पडला नव्हता.

लोक—हुंडणावळीचा दर अमुकच असला म्हणजे बाजारभाव त्या वेळीं अमुकच असतात असा कोठेंही अनुभव नाहीं. बाजारभाव बराच काळपर्यंत स्थिर राहिलेले आहेत अशा योग्य वेळीं हुंडणावळीचा भाव निश्चित करावा व तो टिकवावा हें तुमचें म्हणणें कांहींसें बरोबर आहे. पण तसें पाहिलें तर बाजारभाव अजूनही स्थिर झाले आहेत असें म्हणतां येत नाहीं. ते स्थिर होईपर्यंत आणखी तुम्हाला वाट तरी पाहिली पाहिजे, ती पाहा. दरम्यान आपल्याला आवडता दर टिकविण्याकरितां गंगाजळींतलें सोनें खर्च करूं नका आणि मग जो दर टिकेल तो कायद्यानें ठरवा.

सरकार—पण दोन वर्षांपूर्वी बाजारभाव व्हावे तितके ढिले झाले नव्हते, आतां ते झाले आहेत म्हणून आतां हा प्रयत्न.

लोक—बाजारभाव फार कडकले होते ते उतरावेत व युद्धकाळापूर्वीसारखे व्हावेत अशी आमचीही इच्छा आहे. पण तुम्ही अजून थांबलां तर अजूनही भाव आणखी ढिले कां न होतील ? पण तुम्ही म्हणाल ती पूर्वदिशा व ठरवाल तीच उत्तम वेळ. बाजारभाव किंवा हुंडणावळ यांपैकीं कोणत्याही दृष्टीनें आजची घटका हीच उत्तम असें म्हणतां येणार नाहीं. दोन वर्षांपूर्वी हें काम हातीं घ्या असें आमचे प्रतिनिधी म्हणाले, तेव्हां तुम्ही म्हणालां, अजून वेळ आली नाहीं, थांबा. बरें, उलट आम्ही आतां म्हणतों अजून थांबा, त्याला तुम्ही म्हणतां याहून अधिक थांबणें योग्य नाहीं. तात्पर्य, तुम्ही म्हणाल तें खरें, इतकेंच ! दोन वर्षांपूर्वी विलायतेंत हुंडणावळ स्थिर झाली नव्हती. पौंडाच्या व सोन्याच्या भावांत अंतर होतें. तें जाण्याची वाट इंग्लंड पाहात होतें आणि गतवर्षी कायदा करून त्यानें आपली सर्व व्यवस्था करून टाकली, तेव्हां आतां तुम्हांलाही तसें करावेंसें वाटतें, म्हणून तुम्ही करीत आहां. इंग्लंडच्या पौंडाचें व रुपयाचें लग्न लागलें होतें तें तुम्ही सोडविलें आणि त्याऐवजीं इंग्लंडचें चलनाविषयक धोरण व

हिंदुस्थानाचें धोरण याचें नवें लग्न लावूं पाहात आहां. म्हणूनच गोल्ड स्टँडर्ड तुम्हांला आतां प्रिय झालें आणि सोन्याचें नाणें खासगी लोकांना खजिन्यांतून देण्याचें बंद करून सोन्याचे नुसते तुकडे देण्याचें धोरण तुम्ही कमिशनच्या तोंडून वदवून पुढें आणलें आहे. तुम्ही खरोखर बाजारभाव स्थिर होण्याची वाट पाहात नव्हतां. पण पुढें १८ पेन्सांचा चढा हुंडणावळीचा दर कायम करावयाचा या हेतूनें गंगाजळींतील सोनें देऊन टाकणें आणि नाण्याची तंगी करणें या दोनही गोष्टी तुम्ही चालू ठेवल्या होत्या.

सरकार—पण जगांतील बाजारभाव व हिंदुस्थानांतील बाजारभाव यांचा मेळ दोन वर्षांपेक्षां आज अधिक पडला आहे हें तुम्हांला मान्य नाहीं काय?

लोक—या मेळाशीं हुंडणावळ चढी ठेवावी कीं कमी ठेवावी याचा मेळ नाहीं. इतर राष्ट्रें असा मेळ कधींच घालीत नाहींत. तीं युद्ध नसेल तेव्हां बाजार मोकळा सोडतात व स्वाभाविक तेजी, मंदी, मागणी, पुरवठा वगैरेंच्या योगानें हुंडणावळीचा जो दर बाजारांत पडेल तो पडूं देतात. तुम्हांला हा उपद्याप करण्याचें खरें कारण हिंदुस्थानांतील तुमच्या व लोकांच्या सर्व गरजा भागण्याचें कृत्रिम रुपया हें साधन तुम्ही चालू ठेवलें आहे. सोन्याचेंच नाणें जेथें चालू असेल तेथें ही भानगड पडत नाहीं व पडली तरी तितकी पडत नाहीं. शिवाय जगाच्या किंमती व हिंदी बाजाराच्या किंमती यांचा मेळ हुंडणावळ केवढीही ठेवली तरी अखेर पडल्याशिवाय राहणार नाहींच. समुद्राला मिळणारी नदी लहान असली, मोठी असली तरी भरती आली किंवा ओहोटी झाली म्हणजे सगळ्या नद्यांतून पाणी सारखेंच चढावयाचें किंवा उतरावयाचें. युद्धकाळीं भरती पुरी भरली होती. हल्लीं ती उतरत आहे; पण अजून ती पुरी उतरली नाहीं. पण पौंडाचा जगाच्या बाजारभावाशीं जितका मेळ बसला तितकाच हिंदुस्थानांत रुप्याचाही बसला होता. २ शिलिंग हुंडणावळ ठेवली म्हणून त्या वेळीं बाजारभाव कमी झाले नाहींत व आज १८ पेन्स भाव ठेवला म्हणून ते उतरावयाचे तर उद्यां उतरल्याशिवाय राहणार नाहींत!

## नफा-नुकसान कोणाचें?

सरकार—मग तुम्ही मुख्य गोष्ट कोणती पाहाणार?

लोक—हीच कीं, १६ पेन्सांचा भाव हा सनातन आहे कीं १८ चा? १६ पेन्सांनीं कोणाला अधिक फायदा-नुकसान व १८ पेन्सांनीं कोणाला अधिक फायदा-नुकसान? वास्तविक कांहीं कांहीं वर्गांचा तर असा प्रकार आहे कीं, तुम्ही हुंडणावळीचा भाव चढता किंवा पडता ठेवला तरी त्या मानानें लागलेच त्यांचे पगार कमजास्त होत नाहींत. परंतु कांहीं वर्ग असे आहेत कीं, त्यांचें नफानुकसान कमजास्त हुंडणावळीनें लागलीच करतां येतें हें सिद्ध करतां येतें. उदाहरणार्थ, ठराविक पगाराचे नोकर घ्या; मग ते सरकारी असोत वा खासगी असोत. गेल्या

दहावीस वर्षांत १५ पेन्सांपासून ३० पेन्सांपर्यंत हुंडणावळीचे सरासरी दर कमजास्त झालेले आढळतील. हुंडणावळच काय, प्रत्यक्ष बाजारभावाशींही पगारांचा हटकून मेळ पडत नाहीं. युद्धकाळीं हुंडणावळ व बाजारभाव दोनही बेसुमार कडकले होते तरी सरकारी नोकरांचे पगार वाढावयाला किती तरी दिवस लागले. बरें, आतां बाजारभाव कमी झाले म्हणून ते पगार सरकार कमी करूं शकत नाहीं. विलायती गोऱ्या कामगारांचें पडत्या हुंडणावळीनें नुकसान होतें अशी ओरड झाल्यामुळें त्यांचे पगार वाढवून दिले! पण हुंडणावळ चढली तेव्हां ते कमी केले काय? १६ पेन्स भाव असतांना, २४ पेन्स असतांना व उद्यां १८ पेन्स ठेवला तरी एकदां पगार चढवून ठेवले ते कांहीं आतां कमी होण्याची गोष्ट कोणी बोलत नाहीं. जी गोष्ट सरकारी पगारदारांची तीच गोष्ट पुष्कळशी खासगी नोकरींतील ठराविक पगारदारांचीही आहे. दुकानचे नोकर–फार काय गिरण्यांतील नोकर, यांचे पगार मालक हातांत बाजारभावाचें कोष्टक घेऊन दरसाल बदलीत नसतो. असें करणें शक्यही नाहीं. मधून मधून पण मोठ्या कालांतरानें होणाऱ्याच या गोष्टी आहेत. किंमती वाढल्या म्हणून वाढवून दिलेल्या पगाराचा फायदा किंमती उतरल्या तरी पगारी नोकर हक्कानें घेणारच. उलट पगार कायम राहून किंमती वाढल्या तरी नशिबाला बोल लावून तो कसा तरी गुजारा करणारच. अशा दृष्टीनें पडणारा मिळकतीचा व बाजारभावाचा मेळ हा केव्हांही पडावयाचाच. म्हणून तो खरा मेळ नव्हे, आणि तसा मेळ घालण्याच्या कांटेकोर पद्धतीनें कोणी बोलूंही नये.

सरकार—मग हुंडणावळ चढल्याउतरल्यानें या हातचें या हातावर नुकसान कोणाचें होतें?

लोक—परदेशांशीं व्यवहार करणारांचें असें नुकसान होतें. हुंडणावळीचा दर चढला कीं परदेशाहून पैसे भरून माल आणणारांचा नफा होतो आणि हिंदुस्थानांतून परदेशाला माल पाठवून पैसे वसूल करणाऱ्यांचें नुकसान होतें. तसेंच हुंडणावळीचा दर उतरला म्हणजे बरोबर याच्या अगदीं उलट परिणाम होतात. १६ पेन्सांचा भाव असतांना १०० पौंडांच्या किंमतीच्या कापसाबद्दल व्यापाऱ्याला जर १५०० रुपये मिळतात तर १८ पेन्स भाव झाला असतां १५०० च्या ऐवजीं १३३७ रुपयेच त्याला मिळतात. हें नुकसानीचें प्रमाण शेंकडा १२॥ इतकें आहे. अशा रीतीनें कापूस, गहूं, गळिताचीं धान्यें वगैरे परदेशीं जाणाऱ्या मुख्य मुख्य जिनसांचे व्यापारी व त्याहूनही ते उत्पन्न करणारे शेतकरी वगैरे यांचें नुकसान होतें. उलट १६ पेन्सांचा १८ पेन्स भाव झाला म्हणजे परदेशी माल, यंत्रें, मोटारी, कापड व हरतऱ्हेचे चैनीचे पदार्थ हे विकत घेणाराचा त्याच प्रमाणानें नफा होतो. शिवाय मुख्य गोष्ट ही कीं, हें नफानुकसान स्वतंत्र व स्वतःसिद्ध आहे. जगांत माल कमी उत्पन्न झाला, जास्ती उत्पन्न झाला अशावरही अवलंबून नाहीं. मालाची पैदास व मागणीपुरवठा यांत कमजास्त झाल्यानें फरक होईल, तो विलायतेच्या

बाजारांत होणारच. परंतु भाव कमी किंवा जास्ती झाल्यानें होणाऱ्या फरकाहून वर सांगितलेलें हुंडणावळीच्या दरानें होणारें नफा-नुकसान वेगळेंच होतें. कापडाची किंमत बाजारांत केव्हां चढेल, केव्हां उतरेल. पण कापडाच्या व्यापाऱ्यानें गजाची लांबी बोटभर कमी केली किंवा शेतकऱ्याचें धान्य मोजून घेतांना दलालानें किंवा घाऊक व्यापाऱ्यानें पायलीचें माप थोडें मोठें आणलें तर कापड विकत घेणाराचें व धान्य विकत देणाराचें नुकसान होणार; मग त्या वेळीं कापडाचे भाव किंवा धान्याचे भाव हे कसेही असो. किंमतीनें होणारें नफा-नुकसान व मापानें होणारें नफानुकसान हें वेगळें आहे.

## गोऱ्याचें घेऊन सोम्याला कां देतां ?

सरकार—पण विलायतेला माल पाठवणारा शेतकरी याला विलायतेहून आणलेलें लोखंड, राकेल, पेट्रोल, कापड हे जिन्नस लागतातच; मग हुंडणावळीच्या दरानें होणाऱ्या नफा-नुकसानीचा संक्षेप परस्परच जाणार नाहीं काय ?

लोक—आयात व निर्गत मालाच्या किंमतीच्या रकमा बरोबर तितक्याच असतील तर तो संक्षेप जाईल. पण आधीं आयात मालापेक्षां निर्गत मालाची किंमत दरसाल पुष्कळच अधिक असते. त्याकरितां तर विलायतेंतून इकडे सोनें खासगी खात्यावर पुष्कळसें येतें. या सोन्याबद्दलच हिंदुस्थानांत सोनें जिरतें, सोनें जिरतें अशी गोऱ्या लोकांची तक्रार आहे. पण हें सोनें विलायतेचे लोक कांहीं धर्मादाय म्हणून इकडे पाठवीत नाहींत. पण या सोन्याचा उल्लेख करण्याचें कारण इतकेंच कीं, हिंदुस्थानांत विलायतेहून पुष्कळ सोनें येतें याचाच अर्थ हा कीं, विकाऊ पण अर्थात् कच्चा माल हिंदुस्थानांतून विलायतेंत जितका जातो तितका माल विलायतेहून आणावयास आम्ही अद्यापि शिकलों नाहीं. तें होईल तो सुदिन. पण तोंपर्यंत तरी हुंडणावळीचा दर वाढल्यानें शेतकऱ्यांचें नुकसान व चैनीचे पदार्थ उपभोगणारांचा फायदा हें ठरलेलें आहे. शेतकऱ्यालाही विलायती माल घ्यावा लागतो; पण त्याला पाठवावा लागतो त्याच्या मानानें थोडा, म्हणून चढ्या हुंडणावळीनें त्याचें नुकसान आहे.

सरकार—पण हें अंतर कमी झाल्यावर तरी तुमच्या तक्रारीला जागा राहणार नाहींना ?

लोक—सबंध देशाच्या दृष्टीनें विचार केल्यास तक्रारी राहणार नाहींत. पण या अन्यायाच्या पोटांत दुसरा एक मोठा अन्याय आहे तो कायमच राहणार.

सरकार—तो कोणता ?

लोक—समजा, हिंदुस्थानांतून २०० कोटींचा माल परदेशास गेला व तितकाच माल परदेशांतून इकडे आला तर हुंडणावळीचा भाव तेजीचा किंवा मंदीचा कसाही असला तरी बजावाट सारखीच होईल. परंतु परदेशाला जो माल पाठविला

जातो त्याचे मालक आणि परदेशाहून येणाऱ्या मालाचें गिऱ्हाईक हे वेगवेगळे असल्यास एकाला नागवून दुसऱ्याची भर केली आहे हा अन्याय नव्हे काय? कापूस, गहूं, गळिताचीं धान्यें हीं पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या हातांत १५०० रुपयांच्या जागीं अवघे १३३७ रुपये आले तर त्यांचें समाधान करण्यासाठीं तुम्ही सांगणार कीं, रावसाहेबांच्या मोटारीला १५०० रुपयांच्या ऐवजीं १३३७ रुपये पडले यांत तुमचें नुकसान भरून आलें! हें खासें समाधान! गोम्याला नागवून सोम्याची भर करावयाची हा न्याय कोठला?

सरकार—पण हुंडणावळीचा भाव उतरविला तरी दुसरीकडून तक्रार येणारच कीं, शेतकऱ्यांचा नफा व्हावा म्हणून आमच्या मोटारींची किंमत कां चढवितां?

लोक—याकरितांच आम्ही म्हणतों कीं, तुम्ही कृत्रिमरीत्या भाव चढवूंही नका अगर उतरवूंही नका; म्हणजे मग नफा-नुकसानीला ज्याचा तो जबाबदार राहील; तुम्हांवर बोल राहणार नाहीं. पण कृत्रिम स्थिरता आणावयाचीच तर लक्षावधि शेतकऱ्यांचें नुकसान करून हजारपांचशें मोटारवाल्यांचा फायदा करण्यापेक्षां चैनीचा आयात माल महाग झाला तरी चालेल; परंतु शेतकऱ्यांच्या खिशाला चट्टा बसूं नये हेंच धोरण अधिक न्यायाचें व मुत्सद्दीपणाचें नव्हे काय?

सरकार—पण हुंडणावळीचा दर कमी झाल्यानें हिंदुस्थानसरकारला विलायतेस सरकारी खर्चाकरितां जे पैसे पाठवावे लागतात त्यांत तीन-चार कोटी रुपयांची वाढ होते. ही वाढ झाली म्हणजे आमच्याइकडील जमाखर्चाची तोंडमिळवणी होत नाहीं, मग त्याकरितां अधिक कर बसवावे लागतात. तें तुम्हांला चालेल काय?

लोक—तुमच्या या अशुद्ध पद्धतींतलें आम्हाला हल्लीं कांहींच पसंत नाहीं. कारण मूळ तुमच्या आमच्या उपाययोजनेंतच फरक आहे. एका वैद्याचें औषध दुसऱ्या वैद्याला पसंत पडेनासें झालें तर औषधाचें प्रमाण कमी करूं का जास्ती करूं किंवा अमुक औषध दिल्यानें अमुक गुणदोष संभवतात कीं नाहीं याची चिकित्सा कां करावी! तुमचा कृत्रिम रुपया व तुमचा हुंडणावळीचा दर दोनही आम्हांला मान्य नाहींत, तर या तीन-चार कोटींची कर्मकथा कां सांगतां? व नव्या कराबद्दल कां जाणवितां? जमाखर्चाला मेळ बसत नसेल तर तो बसविण्याच्या रीति इतर आहेत. ही एकच आहे असें नव्हे. बरें, करच बसवावयाचा तर हुंडणावळीचा कर म्हणून प्रत्यक्ष कर बसवा व हुंडणावळीशीं ज्यांचा प्रत्यक्ष संबंध येतो अशा व्यापाऱ्यांकडून तो वसूल करा. पण विडी चेतविण्याकरितां घर जाळावें त्याप्रमाणें सरकारी खर्चांत ३।४ कोटींची बचत करण्याकरितां हिंदुस्थानांत माल पिकवून परदेशीं पाठविणाऱ्या शेतकऱ्यांचें तीसचाळीस कोटि रुपयांचें नुकसान कां करतां?

सरकार—मग १८ पेन्सांऐवजीं १६ पेन्स हा भाव ठरविला तरी तुमचें समाधान कोठें आहे?

लोक—समाधान कसें होणार? हुंडणावळीचा दर ही विशिष्ट बाब झाली.

पण या दराची भानगडच मिटावी म्हणजे निदान सरकारास त्यांत कांहीं लक्ष घालावें लागूं नये व लोकांनाही हुंडणावळीच्या चलबिचलीपासून फारसा उपद्रव होऊं नये असा जो मुख्य उपाय तो अमलांत आणाल तेव्हांच या एकंदर विषयांतील तुमचें आमचें भांडण संपेल.

सरकार—तो उपाय कोणता?

लोक—तो उपाय हल्लींचें कृत्रिम रुप्याचें नाणें, कमाल मर्यादेचें कायदेशीर चलन न ठेवतां त्याचेऐवजीं सोन्याचें नाणें मुख्य करा व रुपया हा दुय्यम नाणें ठरवा.

सरकार—पण करन्सी-कमिशन तसा सल्ला देत नाहीं त्याला काय करावें?

लोक—कमिशनची सबब आम्हांला कां सांगतां? सोन्याचें नाणें चालू करण्याविषयीं पूर्वीच्या अनेक कमिशनांनीं सल्ला दिला होता तो तेव्हां तुम्हीं कोठें ऐकला? तुम्ही याचा अर्थ तुम्ही किंवा विलायतसरकारनें, कसाही घ्या; पण आम्हांला दोघेही तुम्हीच आहां.

सरकार—पण सोन्याचें नाणें चालू करणारच नाहीं असें आम्हीं केव्हां म्हटलें? उलट आमच्या कांहीं अधिकाऱ्यांनीं करन्सी-कमिशनपुढें लेखी साक्षी दिल्या; त्यांत सोन्याच्या नाण्याची प्रत्यक्ष योजनाही त्यांनीं रेखाटली आहे.

लोक—होय. त्या योजना आम्हीं वाचल्या आहेत. परंतु तेही कागदी घोडे नाचविले आहेत असा संशय येतो. या प्रश्नावर हिंदुस्थानसरकारच्या मताची परंपरा कायम राहावी येवढ्याकरितांच त्या योजना मांडलेल्या दिसतात. पण विंचवाच्या शेपटींत जशी त्याची नांगी असते तसेंच या योजनांचें शेवटच्या कलमांत संशयविष किंवा मोहविष भरलेलें आहे. करन्सी-कमिशनपुढील युरोपियन साक्षीदारांच्या साक्षी, सरकारी योजनेंतील हें शेवटचें कलम, त्यावर विलायतसरकाचा अभिप्राय आणि शेवटीं कमिशनचा अभिप्राय या तिहींचा इतका बेमालूम मेळ पडतो कीं, एकाच बुद्धीला तीन ठिकाणीं वाचा फुटल्या असें वाटतें.

सरकार—सोन्याचें नाणें चालू करणें हें काम खर्चाचें आहे ही गोष्ट आम्हीं योजनेंतच नमूद केली आहे .तो खर्च करण्यास लोकांची तयारी आहे काय?

लोक—तसा प्रत्यक्ष सवाल असेंब्लींत लोकांपुढें टाका व हा खर्च पत्करल्यास आम्ही करतों असें जाहीर आश्वासन द्या व खात्री करा म्हणजे उत्तर देऊं.

सरकार—तुम्हांस कसली चलनपद्धति दिली असतां तुमचें समाधान होईल तें तरी एकदां स्पष्ट सांगा.

लोक—एकदां का दहादां सांगितलें आहे, आणि आणखी दहादां सांगूं; पण ऐकतां कोठें? १ हिंदुस्थानांत चलनपद्धति सोन्याची चालू केली आहे असें जाहीर करा; २ इंग्लंडच्या सॉव्हरिन नाण्याच्या तंतोतंत वजनाचें आणि कसाचें नाणें येथें पाडूं लागा व त्या नाण्याची किंमत १५ रुपये ठरवून टाका; ३ हल्लीं जे रुपये व सॉव्हरिन्स आणि अर्धसॉव्हरिन्स प्रचारांत असतील ते तसेच प्रचारांत राहूं द्या.

मात्र यापुढें नवीन रुपये पाडावयाचें बंद करा आणि नवे १५ रुपये किंमतीचें सोन्याचें नाणें पाडा. तुमच्याजवळ सोनें शिल्लक नसल्यास जो कोणी सोनें आणून देईल त्यास तरी सोन्याचें नाणें पाडून द्या. यांत अशक्य असें काय आहे ?

सरकार—पण ज्यांच्याजवळ आज नोटा किंवा रुपये आहेत ते जर तें चलन देऊन सोन्याचें नाणें मागूं लागले तर ?

लोक—कल्पित अडचणी उत्पन्न करावयाच्या आणि त्या दूर करतां येत नाहींत म्हणून साधी मागणीही अमान्य करावयाची, हाच तर नोकरशाहीचा नेहमींचा कावा आहे. अशी मागणी एकदम होऊं नये असा बंदोबस्त तुम्हांस कायद्यानें करतां येणार नाहीं काय ?

सरकार—परंतु असें क्रमाक्रमानें सोन्याचें नाणें व्यवहारांत आल्याचें उदाहरण कोठें आढळलें आहे काय ?

लोक—अमेरिकेंतील संयुक्त संस्थानासारख्या श्रीमंत देशानेंही हाच क्रम स्वीकारला, मग हिंदुस्थानसरकारला त्यांत कमीपणा किंवा धोका कां वाटावा ?

सरकार—नवीन नाणें सोन्याचेंच पाडावयाचें असें ठरल्यावर दरसाल ३०–४० कोटि रुपये किंमतीची मागणी होईल व एवढें सोनें दरसाल हिंदुस्थानाच्या नाण्यांत गुंतवावयाचें म्हटल्यास जगांतील इतर देशांना सोन्याचा पुरवठा कसा होईल?

लोक—हिंदुस्थानसरकारनें हिंदुस्थानाची सोय आधीं पहावयाची कां जगाची पहावयाची ?

सरकार—हिंदुस्थानांतील गिऱ्हाइकांच्या हितासाठींदेखील आम्हांस असें सांगणें प्राप्त आहे कीं, जुनें सगळें चलन कायम राहून शिवाय दरसाल ३०–४० कोटींच्या नव्या सोन्याच्या चलनाची त्यांत भर पडत गेल्यास या देशांत चलन बेसुमार वाढेल आणि महर्घता होईल. मग तिकडूनही आमच्या नांवानें ओरड करूं लागाल.

लोक—महर्घता झालीच तर निर्गत कमी होईल आणि परदेशांतून येणाऱ्या सोन्याचा पुरवठाही कमी झाल्यानें नव्या नाण्याची मागणीही आपोआप कमी होईल. लक्षांत ठेवा कीं, आम्हीं सुचविलेल्या पद्धतींत कृत्रिमपणा मुळींच नसल्यानें जरूरी-पेक्षां किंवा हातांत सोनें असेल त्यापेक्षां अधिक नाण्याची मागणी होऊंच शकत नाहीं आणि त्याचा जो कांहीं परिणाम व्हावयाचा त्याला आमचे आम्ही जबाबदार असल्यानें त्याबद्दल सरकारला मुळींच तोशीस लागणार नाहीं.

सरकार—पण हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें चालू करावें असें मत तज्ज्ञांनीं दिलें नाहीं त्यास आम्हीं काय करावें ?

लोक—सुवर्णचलन किती दिवसांत अमलांत येऊं शकेल याविषयीं मतभेद असला तरी सोन्याचें नाणें या देशांत नकोच असें निक्षून सांगणारे साक्षीदार फारच क्वचित् आढळतील. सोन्याचें नाणें चालू केल्यास रुपयाचा भाव किती पेन्स असावा

याविषयीं साक्षीदारांत जितका मतभेद आहे तितका सुवर्णचलनाविषयीं नाहीं हें कळण्याकरितां साक्षीदारांचीं मतें कोष्टकरूपानेंच (लेखाच्या पुढील कोष्टक पाहा.) देत आहों. या कोष्टकावरून सुवर्णचलन नको म्हणणारे साक्षीदार हाताच्या बोटावर मोजण्याइतकेही सांपडत नाहींत हें आपल्या लक्षांत येईल.

सरकार—सोन्यांचें नाणें हवें का नको एवढाच प्रश्न केल्यास सोन्याचें नाणें नको असें कोण म्हणेल ? परंतु रुपयाचा भाव सोन्याच्या किती भार असावा आणि किती वर्षांत सुवर्णचलन पूर्णपणें अमलांत यावें याविषयीं मतभेद आहे व तो विसरून चालणार नाहीं.

लोक—आणि संपूर्ण स्वराज्य तरी आम्ही देणारच नाहीं असें तरी तुम्ही कोठें म्हणत आहां ? तें पांच वर्षांत द्यावयाचें का पांचशें वर्षांत द्यावयाचें एवढाच काय तो तुमच्या डोक्यांत विचार चालला असेल ? पण लक्षांत ठेवा कीं, स्वराज्य कांहीं अडवकुणीनें अगर जबरीनें घेणें तसें शक्य नाहीं; परंतु सुवर्णचलनाच्या संबंधांत तुमची ही टाळाटाळ टिकूं शकणार नाहीं. तुम्ही जरी आतां सुवर्णचलन चालू न केलें तरी हिंदुस्थानाकडे येणारा सोन्याचा प्रवाह कांहीं तुम्हास बंद पाडतां येत नसल्यानें सोन्याचें नाणें सुरू केलेलें पुरवलें, पण ही कुचंबणा नको असें म्हणण्याची तुमच्यावर पाळी येईल व तुम्ही सोन्याचें नाणें घ्या असें म्हणून आपोआपच पाठीस लागाल असेंच आम्ही यापुढें धोरण ठेवूं.

## कमिशनपुढें मांडलेले तज्ज्ञांचे अभिप्राय

| अ. नं. | साक्षीदाराचें नांव | हुंडणावळीचा भाव काय असावा ? १६ कीं १८ पेन्स | सोन्याचें नाणें चालू करावें कीं नाहीं ? होय कीं नाहीं. |
|---|---|---|---|
| १ | मि. मॅकवॉटर्स हिं. स.चे सेक्रेटरी | × | × |
| २ | मि. डेनिंग स. चलन खा.चे मुख्य अधि. | × | × |
| ३ | सर बेसिल ब्लॅकेट हिं. स.चे फडणवीस | × | × |
| ४ | डॉ. प्रफुल्लचंद्र बसू, प्रो. होळकर कॉ. इंदूर | तूर्त कांहींच ठरवूं नये. | |
| ५ | प्रो. छबलानी, दिल्ली युनिव्हर्सिटी | × | × |
| ६ | प्रो. भट नागर, अलाहाबाद युनिव्हर्सिटी | × | × |
| ७ | प्रो. ग्यानचंद, बनारस हिंदु युनिव्हर्सिटी | आज कांहीं ठरवूं नये. | |
| ८ | सेक्रेटरी चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई | × | × |
| ९ | मि. मादन, मुंबई | × | × |
| १० | प्रो. वकील, मुंबई युनिव्हर्सिटी | × | × |
| ११ | प्रो. वाडिया, वुइल्सन कॉ. मुंबई | × | × |
| १२ | प्रो. जोशी, वुइल्सन कॉलेज, मुंबई | × | × |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ सेक्रेटरी इंडियन मर्चंट चेंबर | × | | × | |
| १४ मि. किकाभाई प्रेमचंद, मुंबई | | × | | × |
| १५ मि. फिरोजशहा दलाल, मुंबई | × | | × | |
| १६ सेक्रे. मिल-ओनर्स असोसि., मुंबई | × | | × | |
| १७ प्रो. बाळकृष्ण, राजाराम कॉ. कोल्हापूर | × | | × | |
| १८ मि. जमशेटजी वाडिया, मुंबई | × | | × | |
| १९ सेक्रे. अहमदाबाद मिल-ओनर्स असोसि. | × | | × | |
| २० डॉ. आंबेडकर, मुंबई | | × | × | |
| २१ से. मारवाडी चेंबर्स ऑफ कॉमर्स | × | | × | |
| २२ मि. चुनीलाल मेथा दलाल, मुंबई | × | | × | |
| २३ मि. लॉरेन्स, मेंबर मुंबई कौन्सिल | | × | | × |
| २४ डॉ. प्रमथनाथ बानर्जी, कलकत्ता युनि. | × | | × | |
| २५ मि. व्यंकटपतिराज, मद्रास | × | | × | |
| २६ मि. रामचंद्रराव, कलकत्ता | | × | × | |
| २७ प्रो. सिंह, डाका युनिव्हर्सिटी, बंगाल | | १७ पेन्स | × | |
| २८ से. बंगाल चेंबर ऑफ कॉमर्स, कलकत्ता | | × | × | |
| २९ बॅ. चक्रवर्ती, कलकत्ता | × | | × | |
| ३० से. इंडियन चेंबर ऑ. कॉमर्स, कलकत्ता | × | | × | |
| ३१ मि. रामय्या वकील, मदुरा | | × | × | |
| ३२ से. मारवाडी ट्रेडर्स असोसिएशन | × | | × | |
| ३३ प्रो. के. टी. शहा, मुंबई युनिव्हर्सिटी | × | | × | |
| ३४ से. बंगाल नॅशनल चें. ऑफ कॉ., कलकत्ता | × | | × | |
| ३५ प्रो. जीव्हॉन्स, रंगून युनिव्हर्सिटी | | × | × | |
| ३६ प्रो. दोरायस्वामी अय्यर, मद्रास युनिव्हर्सिटी | × | | × | |
| ३७ प्रो. हॅमिल्टन, पाटणा युनिव्हर्सिटी | | × | | × |
| ३८ से. चेंबर ऑफ कॉमर्स, मद्रास | | × | × | |
| ३९ से. इंडि. चेंबर ऑफ कॉ., रंगून | × | | × | |
| ४० से. कराची चें. ऑफ कॉमर्स | | × | | × |
| ४१ से. इं. मर्चंटस् असोसिए., कराची | × | | × | |
| ४२ सर दिनशा वाच्छा, मुंबई | | × | × | |
| ४३ मि. हरकिसनदास भट्टर, व्यापारी कलकत्ता | × | | × | |
| ४४ प्रो. जुब्बरकर, डाका युनि. बंगाल | × | | × | |
| ४५ मि. जे. फॉरेस्टर, दलाल रंगून | | × | | |
| ४६ मि. चिटणीस, दिल्ली | | × | × | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४७ ना. फिरोज़ सेठना, मुंबई | × | | × | |
| ४८ प्रि. शहाणी, सिंध कॉलेज, कराची | × | | × | |
| ४९ मि. बी. दास, कटक | × | | × | |
| | २९ | १७ | ४१ | ६ |

या कोष्टकावरून पाहतां अवघे ६ साक्षीदार सुवर्णचलनाच्या विरुद्ध आहेत; ४१ अनुकूल आहेत, दोन तटस्थ आहेत. अठरा पेन्सांच्या भावाला १७ अनुकूल असून सोळा पेन्सांच्या भावाला २९ साक्षीदार अनुकूल आहेत. एकाच साक्षीदारानें १७ पेन्स हा दर सुचविला आहे व दोन तटस्थ आहेत.

'इंडियन करन्सी लीग—महाराष्ट्र शाखा', ह्या संस्थेमार्फत हिंदी चलनविषयक प्रश्नासंबंधीं निरनिराळीं पत्रकें प्रसिद्ध होतात. राष्ट्रीय महत्त्वाच्या ह्या प्रश्नाचा सर्वत्र अभ्यास होऊन त्यासंबंधीं यथार्थ ज्ञान महाराष्ट्रांतील बहुजनसमाजांत पसरणें अत्यंत अवश्य आहे. म्हणून ज्यांस हिंदी चलनपद्धतीची माहिती करून घेण्याची इच्छा असेल त्यांस हीं पत्रकें वांटण्याची व्यवस्था केलेली आहे. तरी गरजूंनीं खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकीट पाठवून मागणी केल्यास त्यांस पत्रकें पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.

**प्रो० दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम्. ए.**

फर्ग्युसन कॉलेज,

पुणें (Deccan Gymkhana.)

किंवा

सेक्रेटरी, इंडियन करन्सी लीग—महाराष्ट्रशाखा,

गायकवाडवाडा, नारायण पेठ, पुणें.

# इंडियन करन्सी लीग

## संस्थेचे उद्देश

### उद्देश

१ हिंदुस्थानच्या हितसंबंधास पोषक होईल अशी चलनपद्धति अस्तित्वांत यावी ह्या हेतूनें चलनविषयक प्रश्नांचा पद्धतशीरपणें व निःपक्षपातबुद्धीनें अभ्यास करण्यास लोकांस उत्तेजन देऊन त्यांस जरूर त्या सोई उपलब्ध करून देणें.

२ हिंदुस्थानांत सुवर्णमूल्यमापनपद्धति अस्तित्वांत येण्याची व सोन्याचें नाणें चलन म्हणून वापरलें जाण्याची आवश्यकता लोकांस पटवून देणें; व मध्यवर्ती कायदेमंडळानें ही गोष्ट घडवून आणण्याकरितां पुढील उपाय तावडतोब योजावे अशी खटपट करणें.

(अ) इंग्लंडांतील सॉव्हरीनच्या वजनाचें व तितक्याच कसोटीच्या सोन्याचें स्वतंत्र व प्रमाणभूत हिंदी नाणें ठरवून त्याचें रुपयाशीं १:१५ हें प्रमाण मुक्रर करणें.

(ब) तसेंच सोनें देऊन सोन्याचें नाणें मिळविण्यास सर्वांस मुभा असावी, ह्यास्तव हिंदुस्थानांत टांकसाळ प्रस्थापित करणें व ज्या पद्धतीनें इंग्लंडमधील सरकारी टांकसाळींत सोन्याचीं नाणीं पाडून देण्याची व्यवस्था केलेली आहे तीच पद्धत येथें चालू करणें.

नवें सोन्याचें नाणें पाडून देणारी टांकसाळ प्रस्थापित झाली तरी सध्यां प्रचलित असलेले रुपये अगर नोटा ह्या देऊन त्यांच्या मोबदला सरकारकडून सोन्याचें नाणें मिळालेंच पाहिजे अशी चलनखात्याच्या अधिकाऱ्यांवर कायद्यानें सक्ति करूं नये.

### तात्कालिक उद्दिष्ट

करन्सी कमिशननें १ शिलिंग ६ पेन्स ह्या दरावर हुंडणावळ स्थिर करावी अशी जी बहुमतानें सूचना केली आहे ती नुकसानकारक असून सर पुरुषोत्तमदास यांनीं आपल्या भिन्नमतप्रदर्शक पत्रिकेंत १ शिलिंग ४ पेन्स या दराबद्दल जी शिफारस केली आहे ती हिंदुस्थानास हितावह आहे, हें लोकांस समजून सांगणें.

इंडियन करन्सी लीग—महाराष्ट्रशाखा

पत्रक नं. ६

# हुंडणावळ व सुवर्णचलन

भाषण

श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर,

बी. ए., एल्‌एल्. बी., एम्. एल्. ए.,

संपादक केसरी

[ ता. १२ मार्च १९२७ रोजीं दिल्ली येथें लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत करन्सी बिलावरील वादविवादांत केलेलें.]

अनंत सखाराम गोखले, 'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें यांनीं छापिलें तें दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम्. ए. सेक्रेटरी, इंडियन करन्सी लीग-महाराष्ट्रशाखा, यांनीं पुणें, पेठ नारायण, गायकवाडवाडा येथें प्रसिद्ध केलें.

## पूर्वी प्रसिद्ध झालेलीं पत्रकें

पत्रक १ लें

### करन्सी कमिशनच्या शिफारसी

पत्रक २ रें

### हुंडणावळीच्या दरासंबंधीं वाद

पत्रक ३ रें

### अठराविरुद्ध सोळा पेन्सांचा लढा

पत्रक ४ थें

### चलनी नाण्याचा चालू वाद

पत्रक ५ वें

### हुंडणावळीचें स्वरूप

# हुंडणावळ व सुवर्णचलन

## [ न. चिं. केळकर यांचें भाषण ]

तारीख १२ मार्च १९२७ रोजीं दिल्ली येथील असेंब्लीच्या बैठकींत श्री. न. चिं. केळकर ह्यांनीं सोन्याच्या नाण्यासंबंधानें आपली उपसूचना मांडतांना, करन्सी बिलावर जें विस्तृत भाषण केलें त्याचा थोडक्यांत सारांश खालीं दिला आहे :—

हुंडणावळीच्या बिलावर सुवर्णचलनाची उपसूचना मांडून उगीच कांहीं तरी वेळ खावा अशी माझी इच्छा नाहीं. हुंडणावळीच्या दराचा निकाल झाला. आतां तो वाद वाढवून काय उपयोग ? पण हुंडणावळीचा दर आणि सोन्याचें नाणें ह्यांचा अवश्य संबंध आहे. तो तोडून तुटत नाहीं. असें असतां गेले दोन दिवस सोन्याच्या नाण्यासंबंधानें कोणीं अवाक्षरही काढलें नाहीं. म्हणून ह्या उपसूचनेच्या द्वारें तो विषय मीं सभेपुढें मुद्दाम मांडण्याचें योजिलें आहे. करन्सी कमिशनच्या रिपोर्टानें हुंडणावळीचा भाव १८ पेन्स ठरविला पण इतरहि अनेक घोटाळे करण्याचें योजिलें. चलनी नोटांच्या मोबदला रुपये मिळण्याचा 'हक्क' काढून घेणें, चालू सोन्याचें नाणें (सॉव्हरिन) आहे तेंही काढून टाकणें, आणि सोन्याचें नाणें पुन्हा केव्हां चालू होईल ही आशा निर्मूल म्हणून काढणें अशा प्रकारचे उपद्व्याप कमिशननें केले आहेत.

सर बेसील ब्लॅकेट :—कमिशनच्या रिपोर्टानें कांहींहि केलें असलें तरी बिलांत ह्या गोष्टी कोठें आहेत ? ह्यापुढें गोल्ड स्टॅंडर्ड बिल येणार आहे तेव्हां ह्या गोष्टी केळकरांनीं वाटल्या तर पुढें आणाव्या. हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें चालू व्हावें कीं न व्हावें हें पुढच्या बिलाचे वेळीं ठरेल. मग आज तो प्रश्न पुढें आणून पुढच्या निर्णयासंबंधानें पूर्वग्रहदोष उत्पन्न कां करावा ?

केळकर :—पुढच्या बिलाची गोष्ट मलाहि माहीत आहे, पण त्यावर विश्वास कसा ठेवावा ? आमचे फडणवीस त्या वेळीं टोपी कशी फिरवतील त्याचा नेम कोणीं सांगावा ? चालू बिलाचीच गोष्ट घ्याना. कमिशनच्या रिपोर्टांत सरकारनें सोनें विकत घेण्याप्रमाणें सोनें विकण्याचेंही बंधन आपणावर घ्यावें असा अभिप्राय दिला आहे. पण बिल पाहावें तों त्यांत सोनें विकण्याची जबाबदारी मात्र हळूच अंगाबाहेर लोटलेली; म्हणून पुढच्या बिलाचे वेळीं तरी सुवर्णचलनाचा प्रश्न निघेल किंवा हे निघूं देतील असा ह्याचा विश्वास कोणीं धरावा ?

सर बेसील ब्लॅकेट :—तें बिल तुमच्याच पुढे आहे. त्यांत पाहाना !

केळकर :—पण सोनें विकण्याच्या बंधनाविषयीं मीं रिपोर्टांत आणि बिलांत फरक दाखविला त्याला उत्तर कां द्या ना ? कमिशननें दोन बंधनें सुचविलीं. तुम्हीं एकच पत्करलें; तें कां ?

सर बेसील ब्लॅकेट:—केवळ तात्पुरतें.

केळकर:—तात्पुरतें तरी तें असें कां असावें! पुढच्या बिलाचे वेळीं जर सगळाच प्रश्न निपटावयाचा होता तर थापुरतीच एव्हांच घाई कां केली ? तीन बिलांचें हें संयुक्त बिल असें म्हणतां; मग त्यांतील एकच आज कां काढलें ? हुंडणावळीचा भाव आणखी चार महिने तसाच कागदावर राहता. व्यवहार चालावयाचा तो चाललाच होता. पण खरी गोष्ट अशी कीं, रिपोर्टानें जें दिलें तेंहि आमच्या पदरांत न टाकण्याची फडणिसांची इच्छा दिसते. लोकांना फार आशा होती कीं, रुपयाची किंमत सोन्यांत ठरली जाणार. तेव्हां सोन्याचें नाणेंही हलुहळू सुरू होणार! पण बिलानें रिपोर्टापेक्षां अधिक निराशा केली. बिचारा सॉव्हरिन कायदेशीर होता तोहि काढून टाकण्याला ते सरसावले. असें काय हिंदी लोकांना सोन्याच्या नाण्याचं दर्शनच घडूं नये ! जुन्या कायद्यानें सॉव्हरिनची किंमत जर १० रुपये होती तर आतां ठरणाऱ्या नव्या दरानेंच बिलांत त्याची किंमत १३रु. ५आ. ४पै अशी जाहीर केली असती तर काय गेलें होतें ? पण फडणवीससाहेबांना सोन्याच्या नाण्याचा निःपात करण्याची घाई सुटली. म्हणून, मींहि पण सांपडलेली पहिलीच संधि साधून ह्या प्रश्नासंबंधानें लोकांचें म्हणणें असेंब्लीपुढें मांडणार.

माझ्या उपसूचनेंत सोन्याची मोहोर चालू करावी अशी सूचना आहे ती सर्वस्वीं सयुक्तिकच आहे. हिंदी लोकांना सोन्याच्या नाण्यांची ओळख हजारों वर्षांची आहे. सुवर्णचलनाचा मनानें विचार आणि हातानें व्यवहार करण्याची त्यांना संवय आहे. बरें, मोहोर पाडून द्यावयाची म्हणतों ती तरी लोक आपलेंच सोनें टांकसाळींत नेऊन देतील त्याची. नाणें पाडण्याचा खर्च वास्तविक कोणीच संभावित सरकार घेत नाहीं. पण मीं म्हणतों वाटेल तर तोहि घ्या. कारण तो खर्च सरकारावर टाकला तर लगेच हे उपसूचनेला कायद्याची हरकत आणतील ! मला वास्तविक मोहोर आणि सावरिन दोन्ही नाणीं एकाच वेळीं हवीं असें नाहीं. पण सॉव्हरिन मागितला तर विलायतसरकारची हरकत ! म्हणून म्हटलें ती हरकत टाळावी आणि वेगळी मोहोरच मागावी. कारण ती पाडण्याला कांहीं विलायतसरकारची परवानगी नको. आपलीच टांकसाळ आणि आपलेंच नाणें. मात्र मोहोर ही सॉव्हरीनच्या तोडीची असावी, ही अशी सूचना मी करीत आहें, त्याचें कारण ती मोहोर अशीच आहे तशीच आहे अशी अडचण कोणीं काढूं नये. नांवाचें हिंदी नाणें, पण सगळ्या परीनें तुमच्याच विलायती सावरिनशीं तोलून पारखून घ्या मग तर हरकत नाहीं ! बरें, टांकसाळींत मोहोर पाडण्याची सोय नाहीं म्हणावें तर, १९१८ सालीं सरकारनें प्रथम ऑर्डिनन्स काढून आणि मग कायदा करून मुंबईच्या टांकसाळींत सावरिन पाडण्यास सुरुवात केली होती. १९१८ सालीं सुमारें ३६ लक्ष सोन्याचीं नाणीं मुंबई टांकसाळींत पाडलीं. पण युद्ध संपतांच सरकारनें गाशा गुंडाळला. मग आम्हीं म्हणतों कीं, गोल्ड स्टँडर्ड सुरू करणार तर, लोकांच्या सोयीकरितां तुम्ही मोहोर कां पाडून देऊं नये !

इमारत, कारागीर, ठसे, यंत्रें सगळें कांहीं तयारच आहे. पण मौज अशी कीं, एवढी टांकसाळ आज चालत असून रुपया हें नाणें फार झालें म्हणून तें पाडण्याचें तर बंदच आहे, आणि सोन्याचें नाणें पाडण्याचा हुकूम नाहीं. मिळून नांवाची टांकसाळ आहे, खर्च भरपूर आहे, आणि त्यांत नाणें पाडतात काय तर निकलच्या चवल्या पावल्या ! ! फार तर कधीं पदकें बिल्ले पाडण्याचें सरकारी किंवा खाजगी काम करतात ! टांकसाळीचा हाच का उपयोग ?

लोकांनीं आपलें सोनें दिलें आणि त्याची मोहोर पाडून मागितली तर त्यांत तुमचें काय गेलें ? उद्यां गोल्ड स्टँडर्ड सुरू करावयाचें म्हणून तुम्हांला सोन्याचा सांठा भरपूर करावयाला पाहिजे हें मला कबूल आहे. पण आमचेंच सोनें आणि आमचीच मोहोर ! यांत आम्हीं तुमचें सोनें काय खर्चलें ? आमच्या सोन्यावर आमच्या खर्चानें सरकारी छाप पाडून द्या एवढेंच मागतों. आणि तुम्ही असे कीं, तेंही देत नाहीं म्हणतां. हा हिंदुस्तानापुरता सोन्याच्या नाण्याचा द्वेष नव्हे तर काय ? लोकांना मोहोर पाडून मिळाली तर तुम्ही म्हणतां तें, लोकांनीं पुरून दडवून ठेवलेलें, सोनें बाहेर निघण्याला मदत होणार नाहीं काय ? हिंदी लोकांना सोन्याचें नाणें वापरण्याची संवय नाहीं म्हणतां, पण हातचें सोन्याचें नाणें काढूनच घेतल्यावर मग संवय राहणार कशी ? आणि संवय व्हावी असें वाटत असेल तर मी म्हणतों त्याप्रमाणें नाणें पाडून द्या. सोन्याच्या विटा किंवा अनगड लहानसहान तुकडे हातीं कसे खेळावे ? त्याचा व्यवहार कसा करावा ? तेंच नाणें म्हटलें म्हणजे त्याचा कोठेंहि जाहीर प्रवेश आणि सगळीकडे सरास उपयोग. कोणाला त्याची शिफारस करीत असावें लागत नाहीं. नाण्यांत भरपूर ऐवज आणि तो किती हेंहि जगजाहीर. हातीं सोन्याचें नाणें खेळलें तर, नोटा आणि रुपये हातीं खेळण्याइतकेंच किंबहुना अधिकहि बँकांचे व्यवहार करण्याची संवय त्यांना लागेल. ती कमी होणार नाहीं. मुख्यतः अडीअडचणीच्या वेळीं बाजारांत चळवळ झाली, दंगेधोपे युद्धें ह्यांनीं बाजाराला धक्का बसला, तर हातीं सोन्याचें नाणें ही मोठी हुकमाची सोईची आणि लोकांच्या विश्वासाची गोष्ट असते.

मी म्हणतों बाकी सर्व राहिलें, पण मोहोर पाडून दिल्यानें एका आक्षेपाला तरी उत्तर मिळण्यासारखें आहे. कारण कांहीं लोक असेंच म्हणणारे भेटतात कीं, " अहो हिंदी लोकांना मूळ सोन्याचें नाणें नकोच असतां त्यांच्यावर तें उगीच कां लादतां ? " मीं म्हणतों होय; मोहोर पाडून द्या आणि मग हा तरी एकदां निर्णय होईल कीं लोकांना सोन्याचें नाणें हवें कीं नको ! नुसता काल्पनिक आक्षेप कां घेतां ? हातांत सोन्याचें नाणें असल्याशिवाय सुवर्णमापनपद्धतीवर, म्हणजे एका रुपयांत अमुक इतके ग्रेन सोनेंहि या सरकारी सिद्धान्तावर लोकांचा विश्वास कसा बसावा ? हातांत नाणें असल्याशिवायहि अगदीं तज्ज्ञ जाणते सुरतीं तत्त्वज्ञानी असतील त्यांचा विश्वास कदाचित बसूं शकेल. सामान्य

माणसाचा, निदान सरकारच्या विश्वासभंगानें वेळोवेळीं हात भाजलेल्या लोकांचा, विश्वास कसा बसावा !

बरें, सोन्याचें नाणें चालू करून आज रुप्यांचें नाणें बंद करा असें अगदी म्हणत नाहीं. कारण तसें करण्यानें कदाचित् जो तो आपलें रुप्याचें नाणें सरकारच्या अंगावर आणून टाकील आणि सोन्याचें नाणें मागूं लागेल, आणि सगळ्या देशानें असें केलें तर इवें तितकें सोनें पदरीं नसल्यानें सरकारला अडचण होईल ही गोष्ट मलाहि समजते. आणि म्हणूनच मी जरी मोहोर पाडून मागतों तरी रुप्याचें नाणें एकदम चलनांतून काढून टाका असें म्हणत नाहीं. पण दोन्ही नाणीं बाजारांत बरोबरीनें चालायला हरकत कोणती ! सोन्यारुप्याचें लग्न लावून तुम्ही देणार. मग सोन्यारुप्याचीं नाणीं बाजारांत जोडीनें खेळत राहिलीं तर त्यांचा परस्पर संबंध दृढच होईल. आणि लोकांनाहि तें डोळ्यांनीं दिसेल व पटेल. सरकारी चलनपद्धतीवर लोकांचा विश्वास बसावा असें सरकारला वाटत असेल तर मी म्हणतों हीच गोष्ट सरकारच्या फायद्याची आहे.

केवळ मोहोरेविषयीं येथवर मी सांगितलें. आतां सुवर्णचलनाविषयीं सर्वसामान्य कारणें सांगतों. ह्या विषयावर माझ्यासारख्या अतज्ज्ञ माणसांनीं जपून बोललें पाहिजे हें खरें. कारण फडणीससाहेबांचें ज्ञान किती तरी अगाध ! त्यांच्यापुढें कोण बोलेल ! पण तज्ज्ञ माणसापुढें बोलावयाचें झालें तरी, आपलें मत सांगूं नये असें कांहीं शास्त्र नाहीं. आणि तज्ज्ञ तज्ज्ञ म्हणजे तरी काय ! शेराला सवाशेर हा न्याय जगाचा चालूच आहे. प्रोफेसर कीन्स ह्यांनीं नाहीं नाहीं तें बोलून विलायतसरकारचे फडणीस चर्चिल आणि त्यांचे मुरब्बी तज्ज्ञ सल्लागार ह्यांची खरडपट्टी काढली हें मीं जेव्हां परवां नुकतेंच वाचलें, तेव्हां मलाहि धीर आला कीं फडणीस झाले म्हणून काय झालें? आपण मनाला योग्य वाटेल तें बोलावें. बरें तज्ज्ञ झाले म्हणून ते चूक करीत नाहींत असें थोडेंच आहे. मुंबई बँक बेंच्या कामीं तज्ज्ञ लोकांनीं इतके घोटाळे केले आणि लोकांनीं त्यांना इतक्या शिव्या दिल्या कीं, लाज असती तर या तज्ज्ञांनीं गळ्यांत दगड बांधून ह्या बँक बेंतच जीव दिला असता. पण तज्ज्ञ झाले म्हणून ते ज्ञानानें जुलूमजबरदस्ती करूं पाहातात ! आणि त्यांतूनहि सरकारी अधिकारी तज्ज्ञ असला म्हणजे कांहीं बोलावयासच नको. पण तज्ज्ञांना सारासारविचार सांगणें हेंच त्यांच्या डोळ्यांत अंजन घालण्यासारखें आहे. सामान्य लोकांनाच हा सारासारविचार फार चांगला असतो. आणि सामान्य लोकांचा प्रतिनिधि म्हणून तेच विचार आज फडणीससाहेबांना मी सांगणार आहें.

सुदैवानें कित्येक तज्ज्ञ लोक आपल्या हातून चूक होईल असें म्हणण्याइतके नम्र असतात, आणि म्हणूनच ते लोकांची सल्लामसलत घेतात. पण आमच्या फडणीससाहेबांनीं करन्सी कमिशन नेमून सल्लामसलतीचा फक्त बहाणा केला. त्यांनीं ही गोष्ट नम्रताबुद्धीनें केली असें मात्र नाहीं. रस्त्यांत एखादा धडधाकट मनुष्य खाकेंत कुबड्या घेऊन चाललेला मला दिसला म्हणजे, मी अवश्य तर्क

करितों कीं, ह्या कुबड्या त्याला चालण्याकरितां नको आहेत, तर कोणाच्या तरी डोक्यांत हाणण्याकरितां काठ्या पाहिजे असतील म्हणून त्या खाकेंत घेऊन चाललेला आहे! पण कमिशनचे सभासद पाहिले म्हणजे, फडणीससाहेबांच्या ह्या काठ्या कच्च्या बोरूसारख्या आहेत, त्यांचा मार आम्हांला बसणें शक्य नाहीं, उलट आम्हींच त्या मोडून टाकूं शकूं असें मला वाटतें.

बरें, सुदैवानें सुवर्णचलनपद्धति आणि हुंडणावळ हे विषय झाले तरी केवळ तज्ज्ञ माणसाचेच आहेत असें नाहीं. फडणीससाहेबांनीं ही गोष्ट कबूल केली आहे कीं चलनपद्धति हा पुष्कळसा भावनेचाच प्रश्न आहे. अर्थात् फडणिसांची भावना आणि आमची भावना ह्या वेगळ्या प्रकारच्या आहेत आणि आमच्या भावने-प्रमाणेंच चलनपद्धति हवी असें मी मागतों. ह्यांत विलायती प्रोफेसर किंवा पेढीवाले यांच्या भावनेची सबब आम्हांला सांगून मी कसें ऐकणार! हिंदी लोकांना सुवर्ण-चलन हवें असेल तर तें त्यांना दिलें पाहिजे, व देणें योग्यच आहे असेंच आजवर सर्व म्हणत आले. आणि सुदैवानें फडणीससाहेबांनीं कमिशन नेमून घेतलें त्यांत आमचेंच आयतें काम झालें. कारण कमिशनपुढें आलेले म्हणून छापलेले किंवा न छापलेलेहि सर्व पुरावे लक्षांत घेऊन मीं असें गणित केलें आहे कीं, एकंदर साक्षीदारांपैकीं ९३ साक्षीदार सोन्याचें नाणें हवें म्हणणारे निघतात आणि फक्त ८ (आठ) नको म्हणणारे निघतात.

रिपोर्ट बाहेर पडल्यावरहि फडणीससाहेबांकडे निरनिराळ्या ठिकाणांहून पत्रें आणि अभिप्राय आले. ते त्यांनीं खाजगी पत्रव्यवहार समजून फेंकून दिले असेंहि एक पिलूं बाहेर निघालेलें आहे. तो पुरावा जमेस धरला तर माझेंच म्हणणें आणखी खरें ठरतें. असो. चलनपद्धति हा भावनेचा विषय होय. ही गोष्ट ह्याच पुराव्यानें अशी ठरते कीं, ९३तील सुमारें ९० साक्षीदार हिंदी आणि ८ पैकीं दोन साक्षीदार गोरे युरोपिअन. ह्यांमध्यें इकडे तिकडे मला एखाददुसरा अपवाद आढळला नाहीं असें नाहीं; पण ह्या अपवादानें मीं घातलेला नियमच खरा ठरतो. हिंदी साक्षीदार म्हटला म्हणजे त्यानें सोन्याचें नाणें चालू करा असें म्हणावें, आणि गोरा युरोपिअन म्हटला म्हणजे त्यानें नको असें म्हणावें, हा नुसता योगायोग खचित नव्हे. ह्यांत मोठें मर्म आहे. आणि तें मर्म परस्पर हितसंबंधाच्या विरोधाचें, हिंदी मनुष्य हिंदुस्थानाला सोन्याचें नाणें मागतो आणि गोरा युरोपिअन नको म्हणतो ह्यांतच एका अर्थानें माझा न्याय झाला.

बरें ह्या ९० हिंदी साक्षीदारांत, शास्त्रज्ञ, प्रोफेसर, शिक्षक, व्यापारी, दलाल तात्पर्य सर्व प्रकारचे व्यवहार करणारे चतुर, चाणाक्ष, जाणते लोक आहेत. अर्थ-शास्त्राचा हिंदी प्रोफेसर म्हटला, कीं तो म्हणे पढतमूर्ख, पण मीं जे दुसरे इतके लोक सांगितले त्यांचा तर पुस्तकी अभ्यास नाहींना! पैचें नफानुकसान पाहणारे व्यवहारचतुर असे हे लोक आहेत. सोन्याचें नाणें चालू झाल्याकारणानें जर खरोखरच हिंदुस्थानचा तोटा असता तर हे लोक तें कां मागते! देशाचें नुकसान

व्हावें म्हणून ? बरें, कमिशनच्या रिपोर्टलाच असें काय सोनें लागलें आहे ! तो रिपोर्ट प्रसिद्ध होतांच, लंडनच्या रॉयल सोसायटी ऑफ आर्ट्सपुढें सर चार्लस ॲडीस विलायतचे पहिल्या प्रतीचे एक पेढीवाले ह्यांनीं असें म्हटलें आहे कीं, "ह्या रिपोर्टांत मला नुसती तात्त्विक पुस्तकी बडबड दिसते. मला ह्यांत व्यवहार-चातुर्य कांहींच दिसत नाहीं!"

तात्पर्य, आधार दाखवूनच निर्णय करावयाचा तर, फडणवीससाहेबांनीं माझ्याशीं आधारांचें युद्ध करावें किंवा आमच्या हिंदी पध्दतीप्रमाणें मजबरोबर खेळावयाला बसावें. म्हणजे त्यांनीं एक आधार दाखवावा मीं दुसरा आधार दाखवावा, असें करीत करीत शेवटीं जो राहील तो जिंकील तसें ते करतील तर मी तयार आहें. फडणवीससाहेब प्रो॰ कीन्सचा आधार दाखवतील तर मी त्यांना त्यांच्या तोडीचे प्रोफेसर ग्रेगरी व कॅनन ह्यांचे आधार दाखवीन. हेहि बडे प्रोफेसर आहेत आणि त्यांनीं असा स्पष्ट आभिप्राय दिला आहे कीं, हिंदी लोकांची भावना सुवर्णचलनाविषयीं आहे म्हणून तें त्यांना दिलेंच पाहिजे. उलट प्रो॰ कॅनन ह्यांनीं तर असें समर्थन केलें आहे कीं फडणवीसांचे मुख्य आक्षेपच त्यामुळें ढासळले जातात. हे आक्षेप असे कीं, हिंदुस्तानांत आज सुवर्णचलन सुरू करावयाचें तर त्याला सोन्याचा फारच सांठा लागेल, तो आमच्या जवळ नाहीं इत्यादि. पण प्रोफेसर कॅनन म्हणतात कीं, "जर पश्चिमदेशांतील लोक आतां सोन्याचें नाणें टाकून देऊं लागले आहेत, आणि कागदी चलन व बाजारी पत ह्यांवरच सर्व व्यवहार भागवूं लागले आहेत, तर त्यांना सोनें कमीच लागणार ! अर्थात् हिंदुस्तानासारख्या पौर्वात्य देशांत जर दिवसेंदिवस अधिक सोन्याचा उपयोग केला तर, पश्चिमदेशांतील लोकांचा सोन्याचा रोग आयता थोडा हटेल. कारण बेसुमार सोनें सांठविल्यामुळें, ह्या पाश्चात्य देशांतून अस्वस्थता, बंडें व लढाया होत आहेत. हिंदुस्थानानें सोनें अधिक घेतल्यामुळें त्यांचेंच काम होईल, आणि पश्चिमदेशांतील लोकांचें हें श्रीमंती दुःख थोडेंतरी हलकें होईल." देशांत सोन्याचा सांठा बेसुमार होणें ही एका दृष्टीनें खरोखर आपत्तीचे होय. युद्ध चालू असतां स्वीडन व नार्वे ह्या दोन देशांनीं आपल्या किनाऱ्याला बाहेरच्या सोन्याचा स्पर्शही होऊं नये अशी खबरदारी घेतली होती म्हणतात. अमेरिकेचेंहि घर युध्दामुळें सोन्यानें भरलें आहे. कसेंहि असो. सोन्याची वांटणी होऊन त्यांचें व आमचें काम झालें तर त्यांत वावगें तें काय !

असो; हुंडणावळीच्या दराचें युद्ध संपलें. आतां तोंड फिरलें असून पिछाडीच्या बाजुला लहानशी चकमक झडविण्याचें काम माझी उपसूचना करीत आहे, आणि तिचा हेतु सुवर्णचलन वांचविण्याचा आहे. सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांना गेले दोन दिवस विश्रान्ति मिळाल्यानें आतां ते माझ्या मदतीला येतील अशी मला आशा आहे. हुंडणावळीच्या दरांत आमचा पराभव झाला तथापि एकाद्या तत्त्ववेत्याप्रमाणें मी त्याचें दुःख विसरूं शकतों. कारण माझें मन

मला सांगतें कीं, फडणवीससाहेब तोंडानें किती बोलले व कायदे किती केले तरी हुंडणावळीचा भाव स्थिर म्हणून कधीं राहूंच शकत नाहीं. खेचरासारखी ती हट्टी जात आहे. वेळोवेळीं आपण मनानें उभा राहील तेथेंच राहील दुसरीकडे जावयाचा नाहीं. हुंडणावळीचा खरा स्वाभाविक दर म्हटला म्हणजे जो आज एक आणि उद्यां एक असा अनिश्चित असतो तोच. हें दिसण्याला चमत्कारिक पण सर्वस्वीं खरें आहे. सोन्याची व रुप्याची किंमत नित्य बदलते. ह्यामुळें, त्या दोहोंचा संबंध ठरविणारें समीकरणहि बदलणारच. अर्थात्, अनिश्चित किंवा चलंबिचलीचा हाच त्या बाबतींत स्वाभाविक दर.

युद्धांत पाश्चिमात्य राष्ट्रांनीं हुंडणावळीचा दर ठरविण्याचे काय वाटेल ते प्रयत्न केले म्हणजे हास्यास्पद गोष्टी केल्या आणि जुलूमहि केले; परंतु त्यांतला एकहि उपाय टिकाऊ ठरला नाहीं. सरकार तरी दर टिकवणार म्हणजे एरवीं काय करणार ? सरकारची विलायतेंत स्वतःची एक पेढी, हिंदुस्थानांत एक पेढी. सरकार हव्या तशा तिकडून इकडे, इकडून तिकडे सरकारी हुंडया लिहिणार. बाजारनिरख ढळला असें वाटलें तर नाणें सैल सोडणार किंवा कडकला तर नाण्याची नाकेबंदी करणार. मिळून काय ? केव्हांहि कृत्रिम उपायांवरच अवलंबून राहणार ! ! सत्ता असली म्हणजे सर्व कांहीं शोभतें किंवा संपादून जातें, त्यांतलीच ही गोष्ट आहे. ह्या सत्तेच्या बळावर हवा तो चढउतार सरकारला करितां येतो. इंग्रजी लहान मुलांच्या गोष्टींच्या पुस्तकांत एका जादूच्या 'मश्रूम'चें वर्णन केलें आहे. त्याची मौज अशी कीं, उजव्या बाजूचा तुकडा मोडून खाल्ला कीं, माणसाचा आकार हनवटी पायाला भिडण्याइतका लहान होतो; आणि डाव्या हाताचा तुकडा तोडून खाल्ला कीं, आकार इतका उंच होतो कीं, डोकें आभाळाला जाऊन लागतें! पण हुंडणावळीचा खरा मेळ पाडावयाचा तर ह्याला एकच रीत. देशांतील नाणें आणि सर्व देशांना सामायिक अशी किंमत मोजण्याचें माप म्हणजे सोनें ह्यांच्या परस्पर किंमतीचा मेळ पडावा. तो सोन्याच्या नाण्याशिवाय कसा पडणार? असो, दरांत चलबिचल झाली असतां सरकारच्या हातीं जें साधन आहे त्याचा उल्लेख केला आहे. राहतां राहिले लोक. पण त्यांचे हातीं स्वतःचें असें साधन काय आहे ? आणि मी म्हणतों कीं, सगळ्या जगांत जर सोन्यानें मोजमाप होणार, तर हिंदुस्तानांत सोन्याचें नाणें चालू असलें तरच ह्या चलबिचलीवर लोकांचे हातीं असा कांहीं स्वावलंबी इलाज राहील. १९१३च्या कमिशनपुढें, सर मॉंटेग्यु वेब सर भूपेंद्रनाथ मित्र वगैरे लोकांनीं, सोन्याच्या नाण्याचा मुख्य उपयोग म्हणून हाच उपाय सांगितला होता. सोन्याचें नाणें हातीं राहिल्यानें चणचणीच्या किंवा घाल-मेलीच्या वेळीं, हुंडणावळीच्या बाबतींत, सरकारावर लोकांना फारसें अवलंबून राहावें लागत नाहीं. हातांत सोन्याचें नाणें खेळल्यानें, अंगावर मूठभर मांस चढतें असें नाहीं, तर प्रजा स्वावलंबी होते, हाच खरा उपयोग ! आणि सुवर्ण-चलनासंबंधानें हिंदी लोकांची म्हणून जी भावना सांगितली ती ह्यामुळें म्हणजे

स्वावलंबी होण्याच्या इच्छेमुळें. पण फडणिसांची भावना पाहावी, तर ती अशी कीं, हिंदुस्थाननें सोन्याच्या नाण्यांपासून जितकें दूर राहावें तितकें बरें !

सर बे. ब्लॅकेट: —पण मी असें कोठें म्हणतों हें कागदोपत्रीं काढून दाखवा.

केळकर:—ह्या बिलाच्या कागदोपत्रांतच तें दिसून येतें. कमिशननें शिफारस केली कीं, लोकांना सोनें विकण्याचें बंधन सरकारनें आपल्यावर घ्यावें व बिलांत तें तुम्ही काढून टाकतां. तुम्हांला शंका आली असेल कीं, सोनें हातीं आहे, आतां नाणें द्या असें म्हणून लोक पाय पुढें टाकतील. पण तसें घडेलच असें नाहीं. मी तुमच्याच साक्षींतिल कांहीं उतारे काढून दाखवितों. त्यावरून सोन्याचें नाणें हवें तितकें हातीं आल्यास तें पुरून न ठेवतां व्याजीं किंवा कारखानदारीकडे लावण्याची इच्छा लोकांना होईल असें तुम्हींच म्हटलें आहे. पण उलट असेंहि म्हटलें आहे कीं, "पोरांना जशा खेळाच्या वस्तु आवडतात तसेंच हिंदी लोकांना सोन्याचें नाणें आवडतें ! पण मी म्हणतों कीं, हिंदी लोकांना प्रौढ माणसें तुम्ही म्हणतां तेव्हां त्यांच्या विचारांना आणि मतांना किंमत द्यावी ती तुम्ही देत नाहीं. बरें; त्यांना मुलें म्हणतां तर म्हणांना; पण मग मुलांप्रमाणें त्यांचे हट्ट तरी पुरवा. पण प्रौढ माणसांच्या विचाराला दाखवावा तो हिंदी लोकांच्या मताला तुम्ही मान देत नाहीं; आणि मुलांशीं वागतांना जो प्रेमळपणा व जें ममत्व असावें तेंहि तुमच्याजवळ नाहीं. मग आमच्याशीं तुम्ही वागणार कसे तें तरी सांगा ?

सर बेसील ब्लॅकेट:—माझ्या साक्षींतील शब्दाचा हा विपर्यास आहे. पण मी त्याचें उत्तर पुढें देईन.

केळकर:—हिंदी लोक राहिले; पण गबे, नॉरमन, वुइल्सि, हॅमिल्टन, ॲन्थॅम, डेनिंग, किश हे युरोपिअन साक्षीदारहि हिंदी लोकांच्या ज्या भावनेला प्राधान्य देतात ती भावना फडणिसांनीं कां मानू नये ? बरें, ह्या भावनेलाहि सबळ कारण आहे ! आणि तें असें कीं, हल्लींच्या चलनी नोटा आणि रुप्याचीं नाणीं ह्यांवरील त्यांचा विश्वास अगदीं उडाला आहे. बिचारी कागदी नोट आढ्यता तरी मिरवीत नाहीं. ती म्हणते "मी काय बोलून चालून कागदच. माझ्यावर विश्वास ठेवा म्हणून म्हटलें तरी कोण ठेवणार ?" पण रुप्याचा रुपया असला तरी तो किती किंमतीचा ? त्यांवर तरी विश्वास कोणीं ठेवावा ? प्रोफेसर रॉबर्टसन यांच्या एका पुस्तकांत चलनी नोटांचे कागद आणि त्यांचा निंदक ह्यांचा एक झगडा दिला आहे. त्यांत ह्या कागदी चलनानें हिंदी रुपयांची पूजा अशा शेलक्या शब्दांनीं बांधली आहे कीं ती वाचून हसू येतें. तुम्ही कायद्यानें चलनी नोटा आणि चांदीचे रुपये हिंदुस्तानांत पायावर खडे केले खरे, पण परदेशांत त्यांना कोण विचारतो ? म्हणून नोटा व रुपये दिले असतां सरकारनें आपणांस ठराविक दरानें कां होईना पण सोनें द्यावें अशी लोक स्वाभाविकच मागणी करतात. नोटा रुपये दिले असतां सोनें देऊं असा सरकारनें जाहीरनामा काढला म्हणून जो तो उठून सोनें मागेल असें थोडेंच आहे ! कारण सोन्याप्रमाणें रुप्याच्या नाण्यांचा आणि चलनी नोटांचाहि

लोकांना उपयोग आहे. पण एकाचा दुसऱ्याशीं इटकून मोबदला होईल अशी कायदेशीर व्यवस्था पाहिजे. रुपयाचें रूपांतर आपणाला वाटेल तेव्हां सोन्यांत हटकून हुकूमी करतां येतें अशी खात्री मनाची असणें हाच निश्चयाचा मूळ पाया !

होतां होईतों प्रत्यक्ष सोन्याचें नाणें न वापरतां नोटा, चेक, हुंडया ह्यांनीं होईल तितका व्यवहार करावा हें इकडील लोकांनाहि समजतें. पण ही गोष्ट कालांतरानें पटणारी आहे. एकदम पटणारी नाहीं. आणि ती पटेपर्यंत सोन्याचें नाणें चालू करा एवढेंच आम्ही म्हणतों. पावलें टाकून चालावयाला शिकण्या-प्रमाणेंच हें आहे; त्यांतून गेल्याशिवाय हें कसें येईल ? तुम्ही विलायतच्या लोकांचें उदाहरण सांगतां. त्यांचा तर बँक ॲक्ट १९२५ सालींच पास झाला कीं नाहीं ? मग अवघ्या दोन वर्षांपूर्वी इंग्लंडांत सोन्याचें नाणें कायदेशीर म्हणून चालू होतें तर तें आज हिंदुस्थानांत असावें असें म्हणण्यांत काय चूक ?

कांहीं लोक असें म्हणणारे आढळतात कीं, हिंदी लोकांना सोन्याची कांहीं बेसुमारच आवड आहे. पण हें खोटें. कोणी म्हणतात हिंदी लोक औषध म्हणून सोनेंच खातात! वर्ख खात असतील, पण इंग्लंडांत दांताच्या कवळ्या बांधाय्याला अधिक सोनें लागतें; आणि दन्तवैद्य हे तिकडे सोन्याचें ठरीव गिऱ्हाईकच झालें आहे. जगांत तरी काय दिसतें ! अजून सोन्याचाच अम्मल सर्वत्र आहे. सगळे व्यवहारी लोक त्यालाच अधिक मान देतात. आणि तो तरी कां! तर सोन्यामध्यें आज सत्ता नांदते म्हणून. युद्धापूर्वीच्या तुमच्या देशाचीच आठवण करा. पण आतां शांतता प्रस्थापित झाल्यावर त्याचें नवें सोंग कायम टिकेल कशावरून ? सोन्याला बहिष्कृत मानणें हा आजाहि प्रचलित विचार म्हणून दिसतो, पण ती केवळ तात्पुरती लहर न ठरेल कशावरून ? मला तरी असें दिसतें कीं, अमेरिका इंग्लंड वगैरेंचा डाव असा असावा कीं, जगांतील सगळें सोनें अमेरिका इंग्लंड वगैरे देशांतील तीन चार बँकांत सांठवून सगळ्या जगाला त्यांच्या जोरावर आपल्या पायांशीं फुटबॉलप्रमाणें पराधीन करून खेळवावयाचें. हिंदुस्तानाला हक्काचें सोनें मिळत असतां असें त्यानें पराधीन कां राहावें ? इंग्लंडांत अमेरिकेंत सोन्याचा सर्व संचय झाला म्हणजे, हिंदुस्तानच्या पायाला आणखी एक नव्या सांखळ-दंडाचा वेढा पडलासें होईल. हा सांखळदंड शब्दशः सोन्याचा खरा पण तो सांखळदंडच !

आम्हांला असें सांगण्यांत येतें कीं, इंग्लंडांत १९२५ च्या कायद्यानें, सोन्या-च्या नाण्याचा व्यवहार करण्याला फक्त लंडन बँकेलाच परवानगी दिली असून सोनें असें व्यवहारांतून काढून टाकलें आहे. पण मींहि कित्येक अर्थशास्त्रज्ञांचीं मतें वाचलीं आहेत. त्यांवरून पाहतां युरोपमधील हा सोन्यावरचा बहिष्कार लवकरच निघून जाईल; आणि बाजारनिरखांत अदलाबदल करण्याऐवजीं, कांहीं ठरावीक दरानें—वाटलें तर एखाद्या नव्या दरानें—सोन्याची देवघेव सुरू होईल. कोणी गरजेपेक्षां अधिक सोनें संग्रहीं ठेवणें अनिष्ट आहे

असें प्रो० कीन्स ह्यांचेंहि मत आहे. मि० मेकीना यांच्या मतें, अमेरिकेंत जरूरीपेक्षां जास्त सोनें असल्यामुळें तें लवकरच बाहेर पडेल. मग तें हिंदुस्तानाला नाणें चालू करायला कां मिळूं नये? पण आमच्या फडणिसांची योजना अशी कीं, आम्ही केव्हांहि इतर राष्ट्रांच्या मागेंच राहिलें पाहिजे, आणि लोकांकडून मूर्ख म्हणवून घेतलें पाहिजे.

सगळेंच जग जेव्हां सोन्याला तुच्छ मानूं लागेल तेव्हां आम्हीहि त्यांच्या रांगेंत जाऊन बसूं. जगाबरोबर आमचीहि बुद्धि कां पालटणार नाहीं ? डायोजिनीअसप्रमाणें पुढें एखाद्या काळीं सोन्याला आम्हीहि कचरा मानूं. जुन्या ग्रीकराज्यांत लायकरगसनें असा कायदा केला होता कीं, घरीं सोनें कोण ठेवतो ह्याचा पोलिसांकडून तपास करवून, जो सांपडेल त्याला शिक्षा करावी. न जाणो पुढें मागें आमची ही दिल्लींतील असेंब्लीदेखील सोन्याविरुद्ध असा एखादा कायदा करणार नाहीं असें कोणीं म्हणावें? पण तो दिवस येईल तो दूर आहे. अर्थात् १९२५ च्या पूर्वी खुद्द इंग्लंड ज्या तऱ्हेनें सोन्याच्या नाण्यांचा व्यवहार करीत होतें तसाच आम्हांला करण्याची इच्छा असली तर कां करूं देऊं नये ? युद्धापूर्वी इंग्लंडजवळ ८३ कोटि साव्हरिनचें नाणें होतें. म्हणजे इंग्लंडांत दर डोईस १८ साव्हरिन नाणीं हें प्रमाण पडतें. सन १९१५ पर्यंत दरसाल इंग्लंड २॥–३ कोटि साव्हरिन नवे पाडी. युद्धापूर्वी दोनच वर्षें सर्वांत जास्ती म्हणजे ३॥कोटि साव्हरिन विलायतच्या टांकसाळींत पाडले गेले. १९१५ सालीं सगळ्या जगांत नाण्याकरितां जितकें सोनें खर्च झालें त्यापैकीं ७५टक्के इंग्लंड आणि अमेरिका ह्यांच्या वांट्याचें होतें. सोन्यावर बहिष्कार टाकून व्यवहार भागविणारीं अशीं हीं राष्ट्रें मानावयाचीं तर त्यांना इतकें नाणें पाडण्याची काय गरज होती ? हिंदुस्थानांतील लोकच तेवढें सोन्याचें नाणें जपून दडवून ठेवतात असें नाहीं. युद्धापूर्वी ७॥ कोटि साव्हरिन इंग्लंडांत खासगी लोकांच्या हातीं खेळत होते. मग ह्यांतील पुष्कळसे सॉव्हरिन खाजगी लोकांनीं आपल्या संग्रहीं जपून ठेवले असतील ह्यांत काय संशय ? आणि जादूगार किंवा गारुडी जसा लोकांच्या नाकांकानांतून पायांतून रुपये काढतो, त्याप्रमाणें, युद्धाच्या प्रसंगानें किती तरी सॉव्हरिन इंग्रज लोकांच्या खाजगी सांठ्यांतून बाहेर पडलेले दिसले ! प्रसिद्ध पेढीवाला बेंजामिन व्हाईट म्हणतो, " अगदीं फॅशनेबल म्हटल्या जाणाऱ्या आमच्या लोकांनासुद्धां सॉव्हरिन जपून दडवून ठेवण्याची संवय असतेच ती जात नाहीं." म्हणून मी म्हणतों कीं, उगीच हिंदी लोकांच्या सोनेंनाणें पुरून ठेवण्याच्या संवयीवर कोणीं तोंडसुख घेऊं नये.

करन्सी कमिशननें हा दोष हिंदी लोकांना दिला; आणि आमच्या हिंदी सभासदांनींहि खुशाल त्यावर सह्या केल्या. सर माणेकजी दादाभाई हे त्यांतील एक होत. १९१२ सालीं ह्याच आपल्या कौन्सिलांत, कै० सर विठ्ठलदास ठाकरसी ह्यांनीं सोन्याचें नाणें प्रचलित करण्याचा ठराव आणला, तेव्हां ह्याच दादाभाईंनीं त्यांना पाठबळ दिलें. आणि ह्याच मुद्द्यावर ते असेंहि म्हणाले कीं,

"हिंदी लोक सोनेंनाणें दडवून ठेवतात ह्या म्हणण्यांत अगदींच अतिशयोक्ति आहे. निदान त्यांना ती संवय पूर्वी असली तरी, हल्लीं ती बदललेली आहे." आतां मौज ही पहा कीं, ह्यानंतर लवकरच युद्ध सुरू झालें. आणि युद्धानंतर सोन्याच्या नाण्यावर बहिष्कार पडला. अर्थात् तेव्हां जें सोन्याचें नाणें दृष्टीला पडतहि नव्हतें त्याचा संग्रह सांठा कोण कसा करणार ? हेच दादाभाई माणेकजी रिपोर्टांत म्हणतात कीं, अलीकडे हिंदी लोक सोन्याचें नाणें उगीच दडवून संग्रहीं ठेवतात. दादाभाईंनीं तेव्हां सोन्याचें नाणें सुरू करण्याचा सल्ला दिला, आणि आता सल्ला देतात कीं तें सुरू करूं नये. आणि असल्या लोकांच्या फुसक्या अभिप्रायावर जोर देऊन आमचे फडणवीस आम्हांला मोडून काढणार; ही त्या रिपोर्टांची किंमत ! मि० गिलन वगैरे कित्येक लोकांनीं १९१२ सालीं हिंदी लोकांवरचा हा आरोप काढून टाकला आहे. प्रो० कीन्सहि म्हणतात कीं, सोन्याचें नाणें हातीं मिळालें असतां हिंदी लोकांची संग्रहाची संवय असलेली निघून जाईल. सर सॅम्युएल मॉंटेग, सर जेम्स बेगबी इत्यादि किती तरी इंग्रजांचे अभिप्राय असेच आहेत. सर जेम्स बेगबी हे मुंबई बँकेचे गव्हर्नर होते. १९१३ सालच्या करन्सी कमिशनचे ते सभासद होते. त्यांनीं भिन्नमतपत्रिकेंत असें स्वच्छ लिहून ठेवलें आहे कीं, हिंदुस्तानांत सोन्याचें नाणें बेलाशक चालू करावें.

जुना इतिहास सांगत बसत नाहीं. पण १८९३ सालापासून, एकसारखी ह्याच विचाराची परंपरा सुरू आहे. ह्या सालीं चांदीचें घोंटाळे झाल्यानें, अनेक योजना सरकारपुढें असतां त्यांनीं सुवर्णमापन आणि सुवर्णचलन हेंच आपलें धोरण म्हणून निश्चित केलें. तेव्हांपासून हिंदुस्थानांत सरकारचे प्रत्येक फडणीस ह्याच धोरणाचें समर्थन करीत आले आहेत. १९२२ सालीं, कै० सर विठ्ठलदास ठाकरसी त्यांनीं फिरून सोन्याच्या नाण्यांचा ठराव ह्याच कौन्सिलांत मांडला तेव्हां सर मालकम् हेले ह्यानीं उघड सांगितलें कीं " हिंदुस्थानांत इवी म्हणाल त्याक्षणीं सोन्याची टांकसाळ आम्ही चालू करूं अशी मी जाहीर रीतीनें हमी देतों. पण हल्लींच्या कमिशनपुढें जो पुरावा आला त्यावरून पाहातां आतां सोन्याची टांकसाळ चालू करा असें हिंदी लोकांनीं म्हणण्याचें आणखी तें काय राहिलें ? १०४ साक्षीदारांपैकीं ९८ साक्षीदार सोन्याचें नाणें तावडतोब चालू करा म्हणतात, आणि फक्त ६ विरुद्ध मत देतात ह्यावरून अनुमान उघडच होत नाहीं काय ? शिवाय मीं वर युरोपिअन लोकांचे अभिप्राय दिले आहेत. हिंदी लोकांचे नांवांचा मीं उच्चारच केला नाहीं. हिंदुस्थान सरकारहि आजपर्यंत नाहीं म्हणालें नाहीं. खुद्द सर बेसिल ब्लॅकेट आणि करन्सी कंट्रोलर मि० डेनिंग ह्यांनीं स्वतःच करन्सी कमिशनपुढें सगळ्या हिशेबासह सोन्याच्या नाण्यांची योजना मांडली. आणि त्यांत लिहिलेले शब्द खरे करा एवढेच मी ब्लॅकेटसाहेबांना म्हणतों.

पूर्वी सरकारच्या मताविरुद्ध कोणी असला तर, फक्त स्टेट सेक्रेटरी. आणि स्टेट सेक्रेटरी जेव्हां अनुकूल होता तेव्हां वरिष्ठ ब्रिटिश सरकार एवढेंच

प्रतिकूल होतें. इकडे टांकसाळ सुरू करण्याचें ठरलें तेव्हां त्यांनीं नसतें विघ्न उत्पन्न केलें, आणि आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला. आज इवें तितकें सोनें मिळण्याला पंचाईत पडण्यासारखी दिसते परंतु ही अडचण कशी तरी काढतां येईल असेंहि ब्लॅकेटसाहेबांनींच आपल्या योजनेंत लिहिलें आहे. खर्च किती लागेल ह्याचाहि हिशेब आणि तरतूद त्यांनीं केली आहे. तेव्हां आतां ज्या एका गोष्टीनें हिंदुस्थानच्या चलनपद्धतीचा कायमचा समाधानकारक निकाल लागण्यासारखा, तिचाच एकदम अंमल कां करीत नाहीं ? उगीच इकडे तिकडे भलत्याच ठिकाणीं तुंबड्या कां लावीत बसलां ? हुंडणावळ बिघडेल, चलनपद्धतींत घोंटाळा होईल, तेव्हां लोकांचे स्वतःचे हातीं कांहीं साधन राहावें एवढ्याच करितां आम्ही सोन्याचें नाणें मागतों.

तात्पर्य, हिंदी लोकमत, फडणिसांचे विरुद्ध आहे. हिंदी प्रोफेसर व तज्ज्ञ त्यांचे विरुद्ध आहेत. स्वतः त्यांची योजना त्यांचे विरुद्ध साक्ष देते. पण कमिशनपुढें पुरावा देतांना त्यांनीं आपल्या योजनेइतकाहि भलेपणा ठेवला नाहीं. त्या पुराव्यांत जितका भलेपणा आहे तितका ब्लॅकेटसाहेबांच्या पहिल्या बिलांत उरला नाहीं. पहिल्या बिलांत आहे तितका दुसऱ्या बिलांत उरला नाहीं. आणि दुसऱ्या बिलांत भलेपणा उरला आहे तितका खुद्द त्यांच्यांत आज दिसत नाहीं. अशी त्यांच्या भलेपणाची उतरती भांजणी आहे. कारण गोल्ड स्टँडर्ड आणि सोन्याचें नाणें ह्या योजनेवरून खालीं येत येत आतां फक्त शिल्लक उरली इंग्लंडवर हुंडी आणि तीहि कमींत कमी १०६५ तोळे सोन्याचे पैसे भरा म्हणजे त्या ऐवजाच्या हुंड्या विलायतेवर किंवा परदेशावर देतों इतक्यापर्यंत मजल येऊन ठेपली आहे. तात्पर्य, सोनें म्हणून हिंदी लोकांच्या हाताला लागावयाला नको एवढाच काय तो मतलब! पण अशा रीतीनें, कमिशनच्या शिफारसी बाजूला ठेवण्यासाहि जर ब्लॅकेटसाहेबांना अधिकार पोंहचतो तर, त्या बाजूला ठेवून सोन्याचें नाणें चालू करा असें म्हणण्याचाहि अधिकार आम्हांला कां पोंहचूं नये ? त्यांचें अतिक्रमण तर आमचेंहि अतिक्रमणच ! फरक एवढाच कीं, त्यांचें अतिक्रमण प्रतिगामी स्वरूपाचें आणि आमचें प्रगतीच्या स्वरूपाचें. म्हणून असेंब्लीनें ती गोष्ट करावी असें मी म्हणतों. आपण जर ह्या गोष्टींचा सूक्ष्म विचार कराल तर माझ्या बोलण्याचा आपणाला कंटाळा येणार नाहीं. माझा युक्तिवाद वाटेल त्यांनीं खोडून काढावा मला कबूल आहे. माझी चूक दाखवून द्यावी मला कबूल आहे. पण एकंदरीनें पाहतां, माझा युक्तिवाद जर साधार आणि समर्पक असला तर ह्या सभेनें मी म्हणतों असें आपलेंहि मत द्यावें.

# करन्सी कमिशनपुढें मांडलेले तज्ज्ञांचे अभिप्राय

## प्रसिद्ध न झालेले

| अ. नं. | साक्षीदाराचें नांव | हुंडणावळीचा भाव किती असावा ? १६पेन्स कीं १८पेन्स | सोन्याचें नाणें हवें कीं नको ? |
|---|---|---|---|
| १ | प्रोफेसर ए. जे. सँडरस अमेरिकन कॉलेज, मदुरा | × | × |
| २ | मि० के. एम. पुरकयास्त सेक्रेटरी, इंडियन मायनिंग फेडरेशन | × | × |
| ३ | मि० बी. के. भार्गव, मिलिटरी ऑडिट ऑफिसर जयपूर. | ! | × |
| ४ | मेसर्स. आरदेसर आर. सुभेदार, | ×( 1-4 to 1-5 ) | × |
| ५ | मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स | × | × |
| ६ | ले.क.डब्ल्यू.सी.रॉय,आय्.एम्.एस्. डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ पाटणा | No fixed exchange × | Present gold st. |
| ७ | मि० बेगराज रामसरूप रेवारी, रेवारी | × or below | × |
| ८ | मि० ज्वालाप्रसादसिंग, डि. ए. व्ही. कॉलेज, डेहराडून | × | |
| ९ | मि० एम्. एम्. रॉय, कलकत्ता | × | × |
| १० | मि० एच. सिंह, लेक्चरर कलकत्ता युनिव्हर्सिटी, कलकत्ता | × | × |
| ११ | मि० हारजीवन वालजी, ऑनररी सेक्रेटरी, बाँबे नेटिव्ह मर्चंट्स असोसिएशन मुंबई | No opinion expressed but wants free exchange. | × |
| १२ | मि० इ. ए. डब्ल्यू. फिलिप्स ब्रायडन | ! | × |
| १३ | नेटिव्ह शेअर ॲण्ड स्टॉक ब्रोकर असोसिएशन | No opinion expressed ? | |
| १४ | ए. एस्. बोस ॲण्ड ब्रदर्स, रंगून | Boycotts Commission | |
| १५ | मि० ए. डी. शॉफ, मुंबई | × | × |
| १६ | डॉ० प्रभाकर एस. शिलोत्री | × | × |
| १७ | डेक्कन सभा, पुणें | × | × |
| १८ | इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पोलिटिकल ॲण्ड सोशल सायन्स | . × | × |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ सरहेन्री मॅंगनेटल वालेस ॲण्ड कं. मुं. | × | Free use of gold. | | |
| २० मि० एस्.टी.सदाशिवम् मॅनेजर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, रंगून | × | | × | |
| २१ मदुरा-रामनाद चेंबर ऑफ कॉमर्स मदुरा | | Boycotts Commission | | |
| २२ प्रोफेसर व्ही. जी. सप्रे, सांगली | × | | × | |
| २३ मि० लक्ष्मण बाळाजी जयलपुरी, अहमदाबाद | | Weekly ratio | × | |
| २४ मि० एम्. डी. आळतेकर, मुंबई | Automatic fixation of rate | | × | |
| २५ युनायटेड प्रॉव्हिन्सेस ट्रेडस् असोशिएशन, मसुरी | ! | | | × |
| २६ मि० जी एस्. मराठे, पुणें | ! | | × | |
| २७ प्रोफेसर श्रीधर जी. बेरी व प्रोफेसर सुमंत के. मुरांजन, धारवाड | | × | × | |
| २८ मि० टी. जी. मास्कारेन्हास | Natural ratio | | × | |
| २९ मि० एस्. सुबराम अय्यर, मद्रास ख्रिश्चन कॉलेज, मद्रास | | × | × | |
| ३० मि० विठ्ठलदास क. संस्थानवाला उंबरगांव जि. ठाणें | | × | × | |
| ३१ मि० गोविंद एच्. केसकर | Natural ratio | | Postpone meeting | |
| ३२ मि० पी. एम. राव मद्रास | × | | × | |
| ३३ मि० जगदीश नारायण भार्गव पेशावर | | × | × | |
| ३४ धी बायर्स ॲण्ड शिपर्स चेंबर कराची | Natural ratio | | × | |
| ३५ मि० एस. गोपाळस्वामी | × | | × | |
| ३६ रॉय प्रथम नाथ मल्लिक बहादुर | Any fixed ratio | | × | |
| ३७ मि० एच. ई. मून | | × | × | |
| ३८ प्रोफेसर यू. एल्. भाल दयाळसिंग कॉलेज लाहोर | | × | × | |
| ३९ प्रो०ए. के.सरकार हुगळी कॉ. चिनसुरा | × | | × | |
| ४० मि० नलिनीरंजन सरकार,एम्.एल्.सी. कलकत्ता | × | | × | |
| ४१ मि० एस्. श्रीकंठी अय्यर, मुंबई | | ! | × | |
| ४२ मि० के. एल्. बाळचकर सोलापूर | Natural ratio | | × | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४३ मारवाडी ट्रेडस् असोशिएशन, कलकत्ता | × | | × | |
| ४४ प्रो० जे. सी. दास गुप्त, कृष्णनाथ कॉलेज, बऱ्हाणपूर | | × | ! | |
| ४५ इंडियन मायनिंग फेडरेशन मि० इ. एल्. प्राईस्, कराची | × | | × | |
| ४६ मि० एम्. आर. रे, व रा० ब० के.व्ही. रंगास्वामी अय्यंगार, त्रिवेंद्रम | | × | × | |
| ४७ प्रो० जे. सी. मित्र, विद्यासागर कॉ. कलकत्ता | | × | × | |
| ४८ प्रो०के.बी.सहा,डाका युनिव्हर्सिटी,डाका | | × | × | |
| ४९ मि० बी. टी. ठाकुर, लाहोर | | × | × | |
| ५० मि० हिरेंद्रलाल डे लखनौ युनिव्हर्सिटी लखनौ | Natural ratio | | × | |
| ५१ मि० एस. के. शर्मा त्रिचनापल्ली | × | | × | |
| ५२ राजा जानकीनाथ रॉय कलकत्ता | × During transition | | | |
| ५३ मि० जी. एन्. शिवपुरी बंकीपूर | × | | × | |
| ५४ मि० बी.एन.चतर्जी व मि०दयाशंकर | | × | × | |
| दुबी लखनौ युनिव्हर्सिटी लखनौ | | × | × | |
| ५५ म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स म्हैसूर | ! | | × | |
| ५६ मि० श्री. व्ही. श्रीनिवास अय्यंगार कुंभकोणम् मद्रास | Natural ratio | | × | |
| ५७ मि० बी. सी. रिबेचा, ठाणें | × | | × | |
| ५८ ब्रिटिश इंडियन पीपल्स असो. कलकत्ता | Natural ratio | | × | |
| ५९ मि० केकोबाद कावसजी दिनशा एडन | ! | | × | |
| ६० मि० एन. आर. स्कॉट | × | | × | |
| | २३ | १६ | ५० | २ |

ह्या कोष्टकावरून पाहतां सुवर्णचलनाला अनुकूल ५२ साक्षीदार असून फक्त दोनच साक्षीदार विरुद्ध आहेत. सोळा पेन्सांच्या भावाला २३ साक्षीदार अनुकूल आहेत व १८ पेन्सांच्या भावाला १६ अनुकूल आहेत. दोन साक्षीदारांनी बहिष्कार घातला आहे व एकाच साक्षीदारानें २४ पेन्स हा दर सुचविला आहे. बाकीचे तटस्थ आहेत किंवा आपोआप जो दर ठरेल तोच चालावा असें म्हणणारे आहेत.

'इंडियन करन्सी लीग–महाराष्ट्रशाखा', ह्या संस्थेमार्फत हिंदी चलनविषयक प्रश्नांसंबंधीं निरनिराळीं पत्रकें प्रसिद्ध होतात. राष्ट्रीय महत्त्वाच्या ह्या प्रश्नाचा सर्वत्र अभ्यास होऊन त्यासंबंधीं यथार्थ ज्ञान महाराष्ट्रांतील बहुजनसमाजांत पसरणें अत्यंत अवश्य आहे. म्हणून ज्यांस हिंदी चलनपद्धतीची माहिती करून घेण्याची इच्छा असेल त्यांस हीं पत्रकें वांटण्याची इच्छा केलेली आहे. तरी गरजूंनीं खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकीट पाठवून मागणी केल्यास त्यांस पत्रकें पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.

**प्रो० दत्तात्रेय गोपाळ कर्वे, एम्. ए.**

फर्ग्युसन कॉलेज,

**पुणें ( Deccan Gymkhana )**

किंवा

**सेक्रेटरी, इंडियन करन्सी लीग–महाराष्ट्रशाखा,**

**गायकवाडवाडा, नारायण पेठ, पुणें.**